|---|---|---|---|
| **२. केंद्र शासनाची वित्तीय मान्यता (केंद्र हिस्सा)** | पुनर्जिवीत निधी (२०/१२/२०२१) | पहिला हप्ता (७/७/२०२१) | एकूण |
| अ) सर्वसाधारण प्रवर्ग | १०.९९० | ४.२८० | १५.२७० |
| ब) अनुसूचित जाती प्रवर्ग | १८.१४० | ... | १८.१४० |
| क) अनुसूचित जमाती प्रवर्ग | ४.६०० | ... | ४.६०० |
| **एकूण** | **३३.७३०** | **४.२८०** | **३८.०१०** |

**३. कृषी आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सूचना निर्गमीत पत्र जा.क्र. कृआ/विप्र. २/राअसुअ-वृ. तेल/बा. कार्य, मा.सु. /प्र.क्र. २/२०२१/१९९८७, दिनांक २५ जून, २०२१**

| | केंद्र | राज्य | एकूण |
|---|---|---|---|
| **४. राज्य शासनाची वित्तीय मान्यता शा.नि.क्र.** | **केंद्र** | **राज्य** | **एकूण** |
| **एकूण** | **१९.३४** | **१२.९०** | **३२.२४** |
| **५. आयुक्तालयस्तरावरुन क्षेत्रीय वितरित निधी** | **केंद्र** | **राज्य** | **एकूण** |
| **एकूण** | **१९.३४** | **१२.९०** | **३२.२४** |

| अ. क्र. | घटक/बाब | परिमाण | भौतिक | | आर्थिक (रु. लाख) | | निधीअभावी निर्माण झालेले आर्थिक प्रलंबित दायित्व |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | लक्षांक | साध्य | लक्षांक | प्रत्यक्ष झालेला खर्च | |
| **१)** | **क्षेत्र विस्तार घटक -- अ. वृक्ष निहाय लागवड** | | | | | | |
| | i) करंज (@ रु. २०,०००/हे.) | हेक्टर | ७५ | ३ | १५.०० | ०.४५ | ०.०० |
| | ii) कोकम (@ रु. १५,०००/हे.) | हेक्टर | १८० | ५५ | २७.०० | ७.०१ | ०.०० |
| | iii) महुआ (@ रु. १५,०००/हे.) | हेक्टर | ५० | १५ | ७.५० | २.१८ | ०.०० |
| | **एकूण** | | **३०५** | **७३** | **४९.५०** | **९.६४** | **०.००** |
| **ब.** | **वृक्षजन्य तेलबिया लागवडी पश्चात देखभाल** | | | | | | |
| | i) करंज (@ रु. २,०००/हे.) | हेक्टर | १०२ | ०.०० | २.०४ | ०.०० | ०.०० |
| | ii) कोकम (@ रु. २,०००/हे.) | हेक्टर | ७०० | ३२३ | १३.९९ | ५.६७ | ०.०० |
| | iii) महुआ (@ रु. २,०००/हे.) | हेक्टर | ६३ | ४१ | १.२५ | ०.८१ | ०.०० |
| | | **एकूण -** | **८६५** | **३६४** | **१७.२८** | **६.४७** | **०.००** |
| | | **एकूण (१) -** | **११७०** | **४३७** | **६६.७८** | **१६.११** | **०.००** |
| **२)** | **तंत्रज्ञान प्रसार घटक** | | | | | | |
| | अ) शेतकरी प्रशिक्षण (@ रु. २४,०००/प्रशिक्षण) | संख्या | ६ | ४ | १.४४ | ०.९६ | ०.०० |
| | ब) विस्तार कर्मचारी/अधिकारी/निविष्ठा विक्रेते प्रशिक्षण (@ रु. ३६,०००/प्रशिक्षण) | संख्या | १ | १ | ०.३६ | ०.३६ | ०.०० |
| | | **एकूण (२) -** | **७** | **५** | **१.८०** | **१.३२** | **०.००** |
| **३)** | **फ्लेक्झी निधी** | | | | | | |
| | अ) शेततळी | संख्या | | १८ | ७.९१ | ४.२२ | ३.३६ |
| | ब) पंपसंच | संख्या | .. | ११६ | | ६.९३ | ३.४३ |
| | | **एकूण (३) -** | **..** | **१३४** | **७.९१** | **११.१५** | **६.७९** |
| **४)** | **अभियान व्यवस्थापन खर्च संकीर्ण** | | .. | .. | २.०० | ०.३२ | ०.०० |
| | **एकूण एकंदर** | | **..** | **..** | **७८.४८** | **२८.९०** | **६.७९** |
| | **केंद्र हिस्सा** | .. | .. | .. | ४७.०९ | १७.३४२ | ४.०७ |
| | **राज्य हिस्सा** | .. | .. | .. | ३१.३९ | ११.५६१ | २.७२ |

## विवरणपत्र - १

### राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान (गळीतधान्य व तेलताड) सन २०२१-२२ अंतर्गत "भातपड क्षेत्रामध्ये गळीतधान्य उत्पादन वाढविण्यासाठी कार्यक्रम : TRFA-Oilseeds" अंतिम प्रगती अहवाल माहे मार्च, २०२२ अखेर

(रु. लाखात)

| | केंद्र | राज्य | एकूण |
|---|---|---|---|
| **१. प्रशासकीय मंजुरी :** | **केंद्र** | **राज्य** | **एकूण** |
| अ) केंद्र शासन पत्र क्र. F.No. २-३९/२०२१-NFSM (OS), दि. १३/०८/२०२१ | ७०.००० | ४६.६७० | ११६.६७० |
| ब) राज्य शासन निर्णय क्र. राअसुअ-२०२१/प्र.क्र. ७५/४-अे, दि. ३०/०८/२०२१ | | | |
| **२. केंद्र शासनाची वित्तीय मान्यता (केंद्र हिस्सा)** | पुनर्जिवीत निधी | पहिला हप्ता | एकूण |
| अ) सर्वसाधारण प्रवर्ग | २.८३७ | १०.९५३ | १३.७९० |
| ब) अनुसूचित जाती प्रवर्ग | १०.५४५ | .. | १०.५४५ |
| क) अनुसूचित जमाती प्रवर्ग | ६.३३३ | .. | ६.३३३ |
| **एकूण** | **१९.७१५** | **१०.९५३** | **३०.६६८** |

**३. कृषी आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सूचना निर्गमीत पत्र जा.क्र. विप्र. २ /राअसुअ-गळीत ब. कार्य, मा.सु. /प्र.क्र. १०/२०२१/२९२१३, दिनांक ०६/०९/ २०२१**

| | केंद्र | राज्य | एकूण |
|---|---|---|---|
| **४. राज्य शासनाची वित्तीय मान्यता शा.नि.क्र.** | **केंद्र** | **राज्य** | **एकूण** |
| **एकूण** | **...** | **...** | **...** |
| **५. आयुक्तालयस्तरावरुन क्षेत्रीय स्तरावर वितरित निधी** | **केंद्र** | **राज्य** | **एकूण** |
| **एकूण** | **...** | **...** | **...** |

| अ. क्र. | घटक/बाब | परिमाण | भौतिक लक्षांक | भौतिक साध्य | आर्थिक (रु. लाख) लक्षांक | आर्थिक (रु. लाख) प्रत्यक्ष झालेला खर्च | निधीअभावी निर्माण झालेले आर्थिक प्रलंबित दायित्व |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ.** | **क्षेत्र विस्तार घटक** | | | | | | |
| | १) मोहरी (रु. ३,०००/हे.) | हेक्टर | ८० | .. | २.४० | .. | .. |
| | २) जवस (रु. ३,०००/हे.) | हेक्टर | ६०० | .. | १८.०० | .. | .. |
| | ३) करडई (रु. ३,०००/हे.) | हेक्टर | ३५० | ९२० | १०.५० | २२.९१ | १.९३ |
| | ४) भूईमूग (रु. १०,०००/हे.) | हेक्टर | ६७२ | ८० | ९८.१० | ६.५० | १.४२ |
| | **एकूण (अ)** | | **१७०२** | **१०००** | **९८.१०** | **२९.४१** | **३.३५** |
| **ब.** | **एकात्मिक अन्नद्रव्ये व्यवस्थापन** | | | | | | |
| | १) सूक्ष्म मूलद्रव्ये (रु. ५००/हे.) | हेक्टर | ३७० | ३२८ | १.८५ | १.६० | ०.०४ |
| | २) जैविक कीटकनाशके (Bio Pesticide) (रु. ५००/हे.) | हेक्टर | ४२० | ३३५ | २.१० | १.६३ | ०.०४ |
| | **एकूण (ब)** | | **७९०** | **६६३** | **३.९५** | **३.२३** | **०.०८** |
| **क.** | **सिंचन साधने** | | | | | | |
| | १) पाईप्सचा पुरवठा (रु. २० ते ५०/प्रती मीटर) (रु. ५००/हे.) | मीटर | ३५०० | .. | १.७५ | .. | ०.०० |
| | **एकूण (क)** | | **३५००** | **..** | **१.७५** | **..** | **०.००** |
| **ड** | **कृषि यंत्रसामग्री (ट्रॅक्टरचलित अवजारे)** | | | | | | |
| | i) सीड ड्रील (SMAM प्रमाणे) | संख्या | २ | ० | ०.४० | .. | ०.०० |
| | ii) रोटाव्हेटर (SMAM प्रमाणे) | संख्या | १२ | ७ | ५.४० | ३.४५ | ०.०० |
| | **एकूण (ड)** | | **१४** | **७** | **५.८०** | **३.४५** | **०.००** |
| **इ)** | **प्रशिक्षण** | | | | | | |
| | १) शेतकरी प्रशिक्षण (रु. २४,०००/प्रशिक्षण) | संख्या | २५ | २४ | ५.९९ | २.८७ | ०.५७ |
| | २) अधिकारी प्रशिक्षण (रु. ३६,०००/प्रशिक्षण) | संख्या | ३ | २ | १.०८ | ०.७२ | .. |
| | **एकूण (इ)** | | **२८** | **२६** | **७.०७** | **३.५९** | **०.५७** |
| | **एकूण एकंदर (अ+ब+क+ड+इ)** | | **..** | **..** | **११६.६७** | **३९.६८** | **३.९९** |
| | **केंद्र हिस्सा** | .. | .. | .. | ७०.०० | २३.८१ | २.३९ |
| | **राज्य हिस्सा** | .. | .. | .. | ४६.६७ | १५.८७ | १.६० |

## विवरणपत्र - १
## सन २०२२-२३ राष्ट्रीय खाद्य तेल अभियानांतर्गत (गळीतधान्य)
## मासिक प्रगती अहवाल माहे डिसेंबर, २०२२ अखेर

(रु. लाख)

| | केंद्र | राज्य | एकूण |
|---|---|---|---|
| **१. प्रशासकीय मंजुरी :** | **केंद्र** | **राज्य** | **एकूण** |
| अ) केंद्र शासन पत्र क्र. F.No. २-१४/२०२२-NFSM (OS), दि. २५/५/२०२२ (गळीतधान्य) | ३६५४.००० | २३२९.३३० | ५९८३.३३० |
| ब) राज्य शासन निर्णय क्र. राअसु २०२२/प्र.क्र. ५०/४ अे, मंत्रालय, मुंबई दि. ०२/०६/२०२२ | | | |
| **२. केंद्र शासनाची वित्तीय मान्यता (केंद्र हिस्सा)** | पुर्नजिवीत निधी | पहिला हप्ता | एकूण |
| राज्य शासनाकडून सन २०२१-२२ मधील अखर्चित निधीस २०२२-२३ मध्ये खर्च करण्यास दि. २५/८/२०२२ रोजी मान्यता | **केंद्र** | **राज्य** | **एकूण** |
| अ) सर्वसाधारण प्रवर्ग | ०.२९ | २३.३५ | २३.६४५ |
| ब) अनुसूचित जाती प्रवर्ग | ११४.२८ | १०१.९८ | २१६.२५२ |
| क) अनुसूचित जमाती प्रवर्ग | १४०.१७ | १२२.११ | २६२.२७७ |
| **एकूण** | **२५४.७४** | **२४७.४४** | **५०२.१७** |
| **३. कृषी आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित पत्र जा.क्र. कृआ/विप्र. २ /रा.खा.ते अभियान NMEO/मा.सु. २२-२३/प्र.क्र. /२०१४१, दिनांक ४ जून, २०२२** | | | |
| **४. राज्य शासनाची वित्तीय मान्यता शा.नि.क्र.रा.खा.ते अ.२०२२/प्र.क्र.२/४Aदि.१९/१०/२०२२** | **केंद्र** | **राज्य** | **एकूण** |
| अ) सर्वसाधारण प्रवर्ग | १३६६.७० | ८८७.९७ | २२५४.६७० |
| ब) अनुसूचित जाती प्रवर्ग | .. | .. | .. |
| क) अनुसूचित जमाती प्रवर्ग | .. | .. | .. |
| **एकूण** | १३६६.७० | ८८७.९७ | २२५४.६७० |
| **५. आयुक्तालयस्तरावरुन क्षेत्रीय स्तरावर वितरित निधी** | **केंद्र** | **राज्य** | **एकूण** |
| अ) सर्वसाधारण प्रवर्ग | १३६६.९९ | ९११.३३ | २२७८.३१८ |
| ब) अनुसूचित जाती प्रवर्ग | ११४.२८ | ७६.१८ | १९०.४६२ |
| क) अनुसूचित जमाती प्रवर्ग | १४०.१७ | ९३.४५ | २३३.६१३ |
| **एकूण** | **१३६६.७०** | **१०८०.९६** | **२७०२.३९** |

| अ. क्र. | घटक/बाब | परिमाण | लक्षांक | | प्रत्यक्ष साध्य | | भौतिक साध्याप्रमाणे अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | |
| **अ)** | **एकूण बियाणे घटक** | | | | | | |
| अ) | मूलभूत (पैदासकार) बियाणे खरेदी (@ संपूर्ण खरेदी किंमत) | क्विंटल | १३५४ | १६०.०० | ९६५.९० | .. | ११८.९३ |
| ब) | पायाभूत बियाणे उत्पादन (@ रु. २५००/- प्र.क्विं.) | क्विंटल | ४००० | १००.०० | ३५७० | १.५६ | ८९.२५ |
| क) | प्रमाणित बियाणे उत्पादन (@ रु. २५००/- प्र.क्विं.) | क्विंटल | १९९०० | ४९७.५० | १६३८२ | २.६६ | ४०९.५५ |
| ड) | प्रमाणित बियाणे वितरण (@ रु. १२००/- प्र.क्विं.) | क्विंटल | ६००० | २४०.०० | ३७६८ | ७५.७५ | १५०.७१ |
| | **(अ) एकूण बियाणे घटक** | | **..** | **९९७.५०** | **..** | **७९.९८** | **७६८.४३** |
| **ब)** | **तंत्रज्ञान प्रसार घटक** | | | | | | |
| | **पिक प्रात्यक्षिके** | | | | | | |
| १) | सोयाबीन (@ रु. ६०००/प्रति हे.) | हेक्टर | १३८०० | ८२८.०० | १३६४२ | १६२.८३ | ८१८.५२ |
| २) | भूईमूग (@ रु. १००००/प्रति हे.) | हेक्टर | १४५ | १४.५० | १४० | .. | १४.०० |
| ३) | करडई (@ रु. ३०००/प्रति हे.) | हेक्टर | २०० | ६.०० | ५८२५ | ४.८८ | ३४९.४८ |
| | एकूण पिक प्रात्यक्षिके | | **१४१४५** | **८४८.५०** | **१९६०७** | **१६७.७१** | **११८१.९९** |
| | शेतकरी शेतीशाळा @ रु. १२,५०० शेतीशाळा) | संख्या | १५७ | १९.६० | १५७ | २.७२ | १९.६३ |
| | शेतकरी प्रशिक्षण @ रु. २४००० प्रशिक्षण | | ९५ | २२.८० | ७२ | ०.४८ | १७.२८ |
| | विस्तार अधिकारी प्रशिक्षण @ रु. ३६००० प्रशिक्षण | | १९ | ६.८४ | ११ | १.४० | ३.९६ |
| | **(ब) एकूण तंत्रज्ञान प्रसार घटक ..** | | **१४४१६** | **८९७.७४** | **१९८४७** | **१७२.३१** | **१२२२.८६** |

**विवरणपत्र - १ चालू**

**सन २०२२-२३ राष्ट्रीय खाद्य तेल अभियानांतर्गत (गळीतधान्य)**

**मासिक प्रगती अहवाल माहे डिसेंबर, २०२२ अखेर**

(रु. लाख)

| अ. क्र. | घटक/बाब | परिमाण | भौतिक | | आर्थिक (रु. लाख) | | भौतिक साध्याप्रमाणे अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | लक्षांक | साध्य | लक्षांक | साध्य | |
| **क)** | **उत्पादन वाढीसाठी निविष्ठा घटक** | | | | | | |
| अ) | जिप्सम/पायराईट्स/डोलोमाईट/एस.एस.पी. (@ रु. ७५०/हेक्टर) | हेक्टर | ५००० | ३७.५० | ४०८ | ०.३४ | २.०४ |
| ब) | जैविक खते (रायझोबियम कल्चर)/पी.एस.बी. (@ रु. ३००/प्र.हे.) | हेक्टर | ५००० | १५.०० | १५४५ | ०.२९ | ४.६४ |
| क) | पिक संरक्षण औषधे (तणनाशके व सूक्ष्ममूलद्रव्यासह) (@ रु. ५००/प्र.हे.) | हेक्टर | ५००० | २५.०० | २१४७ | ४.५४ | १०.७४ |
| ड) | जैविक कीड नियंत्रण (@ रु. ५००/प्र.हे.) | हेक्टर | ५००० | २५.०० | ६८० | १.१५ | ३.४० |
| इ) | सुधारित कृषि औजारे (अनुदानाचे मापदंड SMAM प्रमाणे) | | | | | | |
| | i) मनुष्यचलित | संख्या | २०० | २०.०० | १०३ | ४१.९१ | १०.३० |
| | ii) बैल/ट्रॅक्टर चलित | संख्या | ९०० | ६७५.०० | १८१८ | ७००.१० | ८१८.१० |
| उ) | एचडीपीई/पीव्हीसी पाईप (किमतीच्या ५० टक्के किंवा पाईप्सच्या) | मीटर | ४००००० | २००.०० | ८२८०१ | ४२.१७ | ४१.४० |
| | **एकूण उत्पादन वाढीसाठी निविष्ठा घटक (क)** | .. | .. | **९९७.५०** | .. | **७९०.५०** | **८९०.६१** |
| **ड)** | **फ्लेक्झी निधी** | | | | | | |
| अ) | छोट तेल घाणा सयंत्र (अनुदानाचे मापदंड SMAM प्रमाणे) | संख्या | १९ | ३४.२० | .. | .. | .. |
| ब) | डीझेल/इलेक्ट्रीक पंपसंच (अनुदानाचे मापदंड SMAM प्रमाणे) | संख्या | ३२३ | ३२.३० | १५२२ | १५८.२३ | १५२.२० |
| क) | शेततळे | संख्या | ५७ | २८.५० | ३३ | १४.३० | २४.७५ |
| ड) | गोदाम बांधकाम (१२.५० लाख/गोदाम २५० मे. क्षमता) | संख्या | १९ | २३७.५० | ४ | २४.७० | ५०.०० |
| | **एकूण फ्लेक्झी निधी घटक (ड)** | | .. | **३३२.५०** | .. | **१९७.२०** | **२२७.००** |
| **इ)** | **प्रकल्प व्यवस्थापन खर्च** | | | | | | |
| अ) | तांत्रिक सहाय्यता गट (तंत्र सल्लागार/सहाय्यक) | संख्या | २३ | ८८.३३ | २९ | ७६.२३ | ७६.२३ |
| ब) | भाडे तत्त्वावर वाहन घेणे | संख्या | .. | ३.८० | .. | ०.६८ | ०.६८ |
| क) | आकस्मिक खर्च | संख्या | ०० | ६.९४ | .. | १.८९ | १.८९ |
| | **एकूण प्रकल्प व्यवस्थापन खर्च (इ)** | .. | .. | **९९.०७** | .. | **७८.८०** | **७८.८०** |
| | **प) प्रलंबित दायित्व** | | .. | **२६५९.०२** | .. | **१२६३.३४** | **२५४६.००** |
| | **एकूण अ + ब + क + ड + इ + प** | .. | .. | **५९८३.३३** | .. | **२५८२.१७** | **५७३३.६५** |
| | **केंद्र हिस्सा** | .. | .. | **३६५४.००** | .. | **१५४९.३०** | **३४४०.१९** |
| | **एकूण राज्य हिस्सा** | .. | .. | **२३२९.३३** | .. | **१०३२.८७** | **२२९३.४६** |

## प्रपत्र - १
## राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान (गळीतधान्य व तेलताड) सन २०२२-२३ अंतर्गत
## "भातपड क्षेत्रामध्ये गळीतधान्य उत्पादन वाढविण्यासाठी कार्यक्रम : TRFA-Oilseeds"
## मासिक प्रगती अहवाल माहे डिसेंबर, २०२२ अखेर

(रु. लाख)

| | केंद्र | राज्य | एकूण |
|---|---|---|---|
| **१. प्रशासकीय मंजुरी :** | | | |
| अ) केंद्र शासन पत्र क्र. F.No. ८/६/२०२२-NFSM (OS), दि. ४/६/२०२२ (गळीतधान्य) | १००.००० | ६६.६६७ | १६६.६६७ |
| ब) राज्य शासन निर्णय क्र. राअसु २०२२/प्र.क्र.५०/४-अे, दि. ३/०८/२०२२ | | | |

| **२. केंद्र शासनाची वित्तीय मान्यता (केंद्र हिस्सा)** | **पुर्नजिवीत निधी** | **पहिला हप्ता** | **एकूण** |
|---|---|---|---|
| अ) सर्वसाधारण प्रवर्ग | ०.९६८ | ६.०८५ | ७.०५३ |
| ब) अनुसूचित जाती प्रवर्ग | .. | ०.६४५ | ०.६४५ |
| क) अनुसूचित जमाती प्रवर्ग | ८.१५९ | .. | ८.१५९ |
| **एकूण** | **९.१२७** | **६.७३०** | **१५.८५७** |

**३. कृषी आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित पत्र जा.क्र. विप्र. २ /रा.खा.ते .अ.-गळीत/मा.सु./२७४५७/२२ दिनांक १०/०८/२०२२**

| **४. राज्य शासनाची वित्तीय मान्यता शा.नि.क्र.** | **केंद्र** | **राज्य** | **एकूण** |
|---|---|---|---|
| **एकूण** | .. | .. | .. |

| **५. आयुक्तालयस्तरावरुन क्षेत्रीय स्तरावर वितरित निधी** | **केंद्र** | **राज्य** | **एकूण** |
|---|---|---|---|
| **एकूण** | **९.१२** | **६.०८** | **१५.२०** |

| अ. क्र. | घटक/बाब | परिमाण | भौतिक | | आर्थिक (रु. लाख) | | भौतिक साध्याप्रमाणे अपेक्षित |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | लक्षांक | साध्य | लक्षांक | प्रत्यक्ष झालेला | साध्य |
| **अ)** | **समुह गटप्रात्यक्षिके** | | | | | | |
| १) | मोहरी ( रु. ३०००/प्रति हे.) | हेक्टर | १०० | .. | ३.०० | .. | .. |
| २) | जवस ( रु. ३०००/प्रति हे.) | हेक्टर | २७५ | ९१.६० | ८.२४४ | ०.२९७ | २.७५ |
| ३) | करडई ( रु. ३०००/प्रति हे.) | हेक्टर | १२०० | १३९८ | ३६.०० | ०.६०७३ | ४१.९४ |
| ४) | भुईमूग ( रु. १००००/प्रति हे.) | हेक्टर | ९०० | .. | ९०.०० | .. | .. |
| | **एकूण (अ)** | .. | **२४७५** | **१४८९.६०** | **१३७.२४४** | **०.९०४३** | **४४.६८८** |
| **ब)** | **प्रमाणित बियाणे वितरण (रु.४०००/प्रति हे.)** | हेक्टर | **५०** | .. | **२.००** | .. | .. |
| **क)** | **एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन** | | | | | | |
| १) | सुक्ष्म मूलद्रव्ये ( रु. ५००/प्रति हे.) | हेक्टर | १८० | .. | ०.९ | .. | .. |
| २) | जैविक कीटकनाशके (Bio-Pesticide) (रु. ५००/प्रति हे.) | हेक्टर | २०५ | .. | १.०२ | .. | .. |
| | **एकूण (क)** | .. | **३८५** | .. | **१.९२४७** | .. | .. |
| **ड)** | **सिंचन साधने** | | | | | | |
| १) | पाईप्सचा पुरवठा ( रु. २० ते ५०/प्रति मीटर) | मीटर | ५८२० | .. | २.९१ | .. | .. |
| | **एकूण (ड)** | .. | **५८२०** | .. | **२.९१** | .. | .. |
| **इ)** | **कृषि यंत्रसामुग्री** | | | | | | |
| १) | बैलचलित औजारे | .. | १२ | .. | १.२ | .. | .. |
| २) | ट्रॅक्टरचलित औजारे | | | | | | |
| | i) सीड ड्रील (SMAM प्रमाणे) | संख्या | ६ | .. | ४.५० | .. | .. |
| | ii) रोटाव्हेटर (SMAM प्रमाणे) | संख्या | ६ | .. | ४.५० | .. | .. |
| | **एकूण (इ)** | .. | **२४** | .. | **१०.२०** | .. | .. |
| **ई)** | **प्रशिक्षण** | | | | | | |
| १) | शेतकरी प्रशिक्षण (रु. २४०००/-प्रशिक्षण) | संख्या | २५ | १ | ६.०० | .. | ०.२४ |
| २) | अधिकारी प्रशिक्षण (रु. ३६०००/-प्रशिक्षण) | संख्या | २ | ६ | ०.७२ | ०.२२३५ | २.१६ |
| | **एकूण (ई)** | .. | **२७** | **७** | **६.७२** | **०.२२** | **२.४** |
| **प)** | **(प्रलंबित दायित्व २०२१-२२)** | | | | | | |
| | एकूण एकंदर ... (अ+ब+क+ड+इ+ई+प) | .. | ८७८१ | १४९७ | १६६.६६७ | १.१२८ | ४७.०९ |
| | केंद्र हिस्सा | .. | .. | .. | .. | ०.६८ | २८.२५ |
| | राज्य हिस्सा | .. | .. | .. | .. | ०.४५ | १८.८४ |

## राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (वृक्षजन्य तेलबिया) सन २०२२-२३

(रु. लाख)

## मासिक प्रगती अहवाल माहे डिसेंबर, २०२२ अखेर

| | केंद्र | राज्य | एकूण |
|---|---|---|---|
| **१. प्रशासकीय मंजुरी :** | **केंद्र** | **राज्य** | **एकूण** |
| अ) केंद्र शासन पत्र क्र. F.No.९-४/२०२२-NFSM-TBOs), दि. ७/०७/२०२२ | २७.५९० | १८.४०० | ४५.९९० |
| **एकूण** | .. | .. | .. |
| **५. आयुक्तालय स्तरावरून क्षेत्रीय वितरीत निधी** | **केंद्र** | **राज्य** | **एकूण** |
| अ) सर्वसाधारण प्रवर्ग | ०.२८ | ०.१८ | ०.४६ |
| ब) अनुसूचित जाती प्रवर्ग | ३.५६ | २.३७ | ५.९३ |
| क) अनुसूचित जमाती प्रवर्ग | १.८४४ | १.२२९ | ३.०७ |
| **एकूण** | **५.६८** | **३.७९** | **९.४७** |

| अ. क्र. | घटक/बाब | परिमाण | भौतिक | | आर्थिक (रु. लाख) | | भौतिक साध्याप्रमाणे अपेक्षित |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | लक्षांक | साध्य | लक्षांक | प्रत्यक्ष झालेला | साध्य |
| **१.** | **क्षेत्र विस्तार घटक** | | | | | | |
| **अ)** | **वृक्ष निहाय लागवड** | | | | | | |
| | i) करंज (@ रु. २०,०००/ हे.) | हेक्टर | २५ | ५ | ५ | .. | १.०४ |
| | ii) कोकम (@ रु. १५,०००/ हे.) | हेक्टर | १२५ | ११ | १९ | .. | १.६७ |
| | iii) महुआ (@ रु. १५,०००/ हे.) | हेक्टर | १७ | १७ | ३ | ०.१४ | २.५५ |
| | **एकूण (अ)** | .. | **१६७** | **३३** | **२६** | .. | **५.२६** |
| **ब)** | **वृक्षजन्य तेलबिया लागवडी पश्च्यात देखभाल** | | | | | | |
| | i) करंज (@ रु. २,०००/ हे.) | हेक्टर | ३ | .. | ०.०६ | .. | .. |
| | ii) कोकम (@ रु. २,०००/ हे.) | हेक्टर | १२५ | ३.७० | २.५० | ०.०७ | ०.०७ |
| | iii) महुआ (@ रु. २,०००/ हे.) | हेक्टर | १७ | १४.५० | ०.३३ | ०.१० | .. |
| | **एकूण (ब)** | .. | **१४५** | **१८** | **३** | .. | .. |
| | **एकूण (१)** | .. | **३१२** | **५१.५४** | **२९** | .. | **५** |
| **२.** | **तंत्रज्ञान प्रसार घटक** | | | | | | |
| अ) | शेतकरी प्रशिक्षण (@ रु. २४,०००/ प्रशिक्षण) | संख्या | ६ | १.०० | १.४४ | .. | ०.२४ |
| ब) | विस्तार कर्मचारी/अधिकारी/निविष्ठा विक्रेते प्रशिक्षण (@ रु. ३६,०००/ प्रशिक्षण) | संख्या | १ | १.०० | ०.३६ | ०.१७ | ०.३६ |
| | **एकूण (२)** | .. | **७** | **२** | **२** | **०** | **१** |
| **३.** | **फ्लेक्झी निधी** | | | | | | |
| | i) शेततळी | संख्या | १ | .. | ०.७५ | .. | .. |
| | ii) डिझेल पंपसंच | संख्या | ३० | १.०० | ३.०० | .. | १.०० |
| ४. | अभियान व्यवस्थापन खर्च संकीर्ण | .. | .. | .. | १.०० | .. | .. |
| ५. | प्रलंबित दायित्व सन २०२१-२२ | .. | .. | ६.०० | १०.२५ | ०.४० | ६.०० |
| | **एकूण एकंदर** | .. | .. | .. | **४५.९९** | **०.८९०९** | **१२.९४** |
| | केंद्र हिस्सा | .. | .. | .. | २७.५९४ | ०.५३ | ७.७६ |
| | राज्य हिस्सा | .. | .. | .. | १८.३९६ | ०.३६ | ५.१७ |

## (viii) अन्न व पोषण सुरक्षा - व्यापारी पिके अंतर्गत कापूस विकास कार्यक्रम सन २०२२-२३

कापसाचे उत्पादन वाढविण्यासाठी सुधारित मशागत पध्दती व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रती हेक्टरी उत्पादन वाढविणे यासाठी सन २०१३-१४ पर्यंत कापूस तंत्रज्ञान अभियान- II अंतर्गत केंद्र पुरस्कृत सघन कापूस विकास कार्यक्रम राबविण्यात येत होता. १२ व्या पंचवार्षिक योजनेत सदर योजना बंद करण्यात आली असून सन २०१४-१५ पासून अन्न व पोषण सुरक्षा-व्यापारी पिके या अंतर्गत कापूस आधारित पीक पध्दतीस चालना देण्यात येत आहे. सन २०२२-२३ मध्ये १० हेक्टरचा एक प्रमाणे १९९ प्रकल्पांद्वारे रु. ४३८.५० लाखाचा रकमेचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आद्यरेषिय प्रात्यक्षिके (कापूस पिकात आंतरपिके - मूग, उडीद इत्यादी) आणि सरळ वाणाच्या कापसाची अतीघन लागवड पद्धतीच्या चाचण्या हे घटक राबविण्यात येत आहेत.

**या कार्यक्रमाची उद्दीष्टे पुढीलप्रमाणे आहेत :-**

१. १२ व्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याच्या गरजेसोबतच नगदी पिकांचीही गरज भागविण्यासाठी कापूस पिकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

२. या अंतर्गत कापूस आधारित पीक पध्दतीस चालना देणे.

३. कापूस पिकात मूग, उडीद इ. कडधान्याच्या आंतरपिकास प्रोत्साहन देणे.

४. कापूस पिकात एकात्मिक कीड व्यवस्थापन, कापसाच्या सरळ वाणांची अतीघन लागवड, आयोजित करून कापूस उत्पादनास चालना देणे.

**समाविष्ट जिल्हे :** (१) बुलढाणा, (२) अकोला, (३) वाशिम, (४) अमरावती, (५) यवतमाळ, (६) वर्धा, (७) नागपूर, (८) चंद्रपूर, (९) धुळे, (१०) जळगाव, (११) औरंगाबाद, (१२) जालना, (१३) बीड, (१३) नांदेड, (१५) परभणी, (१६) अहमदनगर

### अन्न व पोषण सुरक्षा- व्यापारी पिके अंतर्गत कापूस विकास कार्यक्रम सन २०२२-२३ (६०:४०)

(रक्कम रुपये लाखात)

| अ.क्र | बाब/घटक | परिमाण (एकक) | अनुदान दर | भौतिक | | आर्थिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | लक्ष (सुधारित) | अपेक्षित साध्य | लक्ष (सुधारित) | साध्य |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | एकात्मिक पीक व्यवस्थापन आद्यरेषिय प्रात्यक्षिके (आयसीएम) | हेक्टर | रक्कम रु. ८०००/- प्रती हेक्टर | ५२० | ५२० | ४१.६० | ४१.६० |
| २ | आद्यरेषिय प्रात्यक्षिके कापूस पिकात आंतरपिके (मूग, उडीद) | हेक्टर | रक्कम रु. ८०००/- प्रती हेक्टर | ७२० | ७२० | ५७.६० | ५७.६० |
| ३ | कापसाच्या सरळ वाणांची अतीघन लागवड पद्धतीची प्रात्यक्षिके | हेक्टर | रक्कम रु. १०,०००/- प्रती हेक्टर | ६०० | ६०० | ६०.०० | ६०.०० |
| ४ | पिक संरक्षण औषधे व बायो-एजंटसचे वितरण | हेक्टर | प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% कमाल रु. ५००/हेक्टर | ४३३२० | ४३३२० | २१६.६० | २१६.६० |
| ५ | राज्यस्तरीय अधिकारी/ कर्मचारी प्रशिक्षण | संख्या | रक्कम रु. ४०,०००/- प्रशिक्षण | ३ | ३ | १.२० | १.२० |
| ६ | कॉटन श्रेडर्स | संख्या | * | ३२ | ३२ | २८.८० | २८.८० |
| ७ | देशी व अती लांब धाग्याच्या कापसाचे बीजोत्पादन | हेक्टर | रु. ९००० प्रती हेक्टर | ३० | ३० | २.७० | २.७० |
| ८ | ऑन लाईन पेस्ट मॉनिटरींग ॲण्ड ॲडव्हायझरी सर्व्हिसेस (ओपीएमएएस) | | | | | ३०.०० | ३०.०० |
| | | | **एकूण** | | | ४३८.५० | ४३८.५० |

* अ.जा., अ.ज. व महिला यांच्यासाठी किंमतीच्या ५०% कमाल रु. १.०० लाख/- प्रति युनिटच्या मर्यादेत तर इतर लाभार्थ्यांसाठी किंमतीच्या ४०% कमाल रुपये ०.८० लाख प्रती युनिटच्या मर्यादेत अर्थसहाय्य.

## अन्न व पोषण सुरक्षा- व्यापारी पिके अंतर्गत कापूस विकास कार्यक्रम सन २०२३-२४ (६०:४०)

(रक्कम रुपये लाखात)

| अ.क्र | बाब/घटक | परिमाण (एकक) | अनुदान दर | भौतिक लक्ष सुधा. | आर्थिक लक्ष सुधा. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ७ |
| १ | एकत्मिक पिक व्यवस्थापन आद्यरेषिय प्रात्यक्षिके (आयसीएम) | हेक्टर | रक्कम रु. ८०००/- प्रती हेक्टर | ५२० | ४१.६० |
| २ | आद्यरेषिय प्रात्यक्षिके देशी आणि अती-लांब धाग्यांच्या कापसाचे बिजोत्पादन | हेक्टर | रक्कम रु. ९०००/- प्रती हेक्टर | ३० | २.७० |
| ३ | आद्यरेषिय प्रात्यक्षिके कापूस पिकात आंतर पिके (मुग, उडीद) | हेक्टर | रक्कम रु. ८०००/- प्रती हेक्टर | ७०० | ५६.०० |
| ४ | कापसाच्या सरळ वाणांची अतीघन लागवड पद्धतीची प्रात्यक्षिके | हेक्टर | रक्कम रु. १००००/- प्रती हेक्टर | ९६० | ९६.०० |
| ५ | पिक संरक्षण औषधे व बायो-एजंटसचे वितरण | हेक्टर | प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% कमाल रु. ५००/- हेक्टर | ४५००० | २२५.०० |
| ६ | राज्यस्तरीय अधिकारी/ कर्मचारी प्रशिक्षण | संख्या | रक्कम रु. ४०,०००/- प्रशिक्षण | ३ | १.२० |
| ७ | कॉटन फरदड निर्मुलन प्रात्यक्षिक | हेक्टर | | ३२ | २८.८० |
| ८ | ऑन लाईन पेस्ट मॉनिटरींग ॲण्ड ॲडव्हायझरी सर्व्हिसेस (ओपीएमएएस) | | | .. | ३१.०५ |
| | | | **एकूण** | **४८२.३५** .. | **४८२.३५** |

## अन्न व पोषण सुरक्षा -व्यापारी पिके अंतर्गत ऊस विकास योजना सन २०२२-२०२३ (६०:४०)

ऊस हे महाराष्ट्रातील महत्वाचे नगदी पीक आहे. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीच्या माध्यमातून ग्रामीण भागाची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगती झाली आहे. उसाच्या वाढीस लागणारे अनुकूल हवामान राज्यात उपलब्ध आहे. महाराष्ट्र राज्य आज देशात साखर उत्पादन व साखर उताऱ्याबाबत आघाडीवर आहे. परंतु, सरासरी प्रती हेक्टरी ऊस उत्पादन वाढविण्यासाठी प्रगत ऊस शेती तंत्रज्ञान जास्तीतजास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे अगत्याचे आहे. राज्यात ऊसाखाली सरासरी ११.०० लाख हेक्टर क्षेत्र असून सरासरी उत्पादकता ८७ मे. टन प्रती हेक्टर आहे. सन २०२२-२३ मध्ये ऊस पिकाचा उत्पादन खर्च कमी करून उत्पादकतेत ९५ मे. टनापर्यंत वाढ करण्याच्यादृष्टीने राज्यात अन्न व पोषण सुरक्षा - व्यापारी पिके कार्यक्रमांतर्गत ऊस विकास योजना कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत एक डोळा, पट्टा पध्दतीचा अवलंब करून आंतरपिकाची प्रात्याक्षिके, उती संवर्धित रोपांची निर्मिती, मनुष्यबळ विकास व शुगरकेन लिफ श्रेडर वाटप हे घटक राबविण्यात येत आहेत. उती संवर्धनामुळे उसाच्या सुधारित वाणांची निरोगी रोपे तयार करून ठिकठिकाणी त्यापासून बेणे मळे तयार करणे सुलभ होते.

**योजनेची उद्दिष्टे :-**

(१) उसाच्या उत्पादन खर्चात कपात करून उत्पादकता वाढविणे.

(२) दर्जेदार बेण्याच्या वापरास प्रोत्साहन देणे व बेणे निर्मितीसाठी उती संवर्धित रोपांचे वाटप करणे.

(३) तंत्रज्ञान प्रसारासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे.

(४) तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी क्षेत्रियस्तरावर ऊस पिकात हरभरा इ. आंतरपिकाची प्रात्यक्षिकांचे आयोजन करणे.

**समाविष्ट जिल्हे :-** (१) औरंगाबाद, (२) जालना, (३) बीड, (४) लातूर, (५) उस्मानाबाद, (६) नांदेड, (७) परभणी, (८) हिंगोली, (९) अहमदनगर, (१०) पुणे, (११) सोलापूर, (१२) सातारा, (१३) सांगली, (१४) कोल्हापूर

## (ix) अन्न व पोषण सुरक्षा - व्यापारी पिके अंतर्गत ऊस विकास योजना कार्यक्रम सन २०२२-२३ (६०:४०)

(रुपये लाखात)

| अ.क्र | योजनेतील घटक | परिमाण (एकक) | अनुदानाचा दर | भौतिक | | आर्थिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | लक्ष (सुधारित) | अपेक्षित साध्य | लक्ष (सुधारित) | अपेक्षित साध्य |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | एक डोळा पट्टा पध्दतीचा अवलंब व आंतरपिकाची पीक प्रात्याक्षिके | हेक्टर | रक्कम रु. ९०००/- प्रती हेक्टर | २४५० हेक्टर | २४५० हेक्टर | २२०.५० | २२०.५० |
| २. | उती संवर्धित रोपे | संख्या | रु. ३.५०/- प्रती रोप | ४.१४ लाख | ४.१४ लाख | १४.५० | १४.५० |
| ३. | राज्यस्तरीय प्रशिक्षण | संख्या | रु. ४००००/- प्रती प्रशिक्षण | ४ | ४ | १.६० | १.६० |
| ४. | पिकसंरक्षण व औषधे व बायो एजंटसचे वितरण | हेक्टर | किमतीच्या ५०% | २४९० | २४९० | १२.४५ | १२.४५ |
| ५. | शुगरकेन लिफ श्रेडर वाटप | संख्या | * | १४ | १४ | १५.७५ | १५.७५ |
| ६. | मूलभूत बियाणे उत्पादनासाठी अर्थसहाय्य | हेक्टर | रु. ४०००/- प्रति हेक्टर | १२ | १२ | ४.८० | ४.८० |
| | | | **एकूण** | | | **२६९.६०** | **२६९.६०** |

*अ.जा.,अ.ज., व महिला यांच्यासाठी किंमतीच्या ५०% कमाल रु. १,२५,०००/- प्रती युनिटच्या मर्यादेत तर इतर लाभार्थ्यांसाठी किंमतीच्या ४०% कमाल रु. १,००,०००/- प्रती युनिटच्या मर्यादेत अर्थसहाय्य.

## अन्न व पोषण सुरक्षा - व्यापारी पिके अंतर्गत ऊस विकास योजना कार्यक्रम सन २०२३-२४ (६०:४०) (प्रस्तावित)

(रुपये लाखात)

| अ.क्र | योजनेतील घटक | परिमाण (एकक) | अनुदानाचा दर | भौतिक | | आर्थिक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ |
| १ | एक डोळा पट्टा पध्दतीचा अवलंब व आंतरपिकाची पीक प्रात्याक्षिके | हेक्टर | रक्कम रु. ९०००/- प्रती हेक्टर | २६५० हेक्टर | | २३८.५० |
| २ | उती संवर्धित रोपे | संख्या | रु. ३.५०/- प्रती रोप | ४.१४ लाख | | १४.५० |
| ३ | मूलभूत बियाणे उत्पादनासाठी अर्थसहाय्य | हेक्टर | रु. ४०,०००/- प्रती हेक्टर | १२ लाख | | ४.८० |
| ४ | राज्यस्तरीय प्रशिक्षण | संख्या | रु. ४००००/- प्रती प्रशिक्षण | ४ | | १.६० |
| ५ | पिक संरक्षण औषधे व बायो एजंटसचे वितरण | हेक्टर | किमतीच्या ५०% रु. ५००/- हेक्टर मर्यादेत | ४२८२ | | २१.४१ |
| ६ | शुगरकेन पाचट व खोडवा व्यवस्थापन प्रात्यक्षिक | हेक्टर | | .. | | १५.७५ |
| | | | **एकूण** | .. | .. | **२९६.५६** |

# राष्ट्रीय कृषि विकास योजना (RKVY-RAFTAAR) अंतर्गत कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD)

केंद्र शासनाने शाश्वत कृषी उत्पादकतेसाठी सन-२०१४-१५ पासून राष्ट्रीय सूक्ष्म सिंचन अभियान (NMMI), राष्ट्रीय सेंद्रिय शेती प्रकल्प (NPOF), राष्ट्रीय मृदा आरोग्य व सुपीकता व्यवस्थापन प्रकल्प (NPMSH&F), आणि कोरडवाहू शाश्वत शेती कार्यक्रम (RADP) या योजनांचे एकत्रिकरण करून हवामान बदलाशी सुसंगत कृषी तंत्रज्ञान हा केंद्रबिंदू ठेवून राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान (NMSA) कार्यान्वित केले आहे.

राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानामध्ये (NMSA), खालील चार घटकांचा समावेश करण्यात आला आहे. ह्या चार घटकांची स्वतंत्रपणे अंमलबजावणी करावयाची आहे.

१. कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD)

२. वातावरण बदल व शाश्वत शेती-सनियंत्रण, रचना व संजालन (CCSAMMN)

३. शेती जलव्यवस्थापन (OFWM)

४. मृदा आरोग्य व्यवस्थापन (SHM)

## अभियानाची उद्दिष्टे:

१. स्थानिक परिस्थितीला अनुरुप एकात्मिक शेती पध्दतीद्वारे कोरडवाहू क्षेत्रातील उत्पादकता वाढविणे.

२. कोरडवाहू शेतीमधील जोखीम कमी करून शाश्वतता निर्माण करणे.

३. कोरडवाहू शेती हवामान बदलाच्या परिणामांसाठी सक्षम करणे.

४. सुयोग्य मृदा व्यवस्थापन व जल व्यवस्थापन उपाययोजनांद्वारे नैसर्गिक साधन संपत्तीचा शाश्वत व कार्यक्षम वापर करणे.

५. वातावरणीय बदलाच्या अनुषंगाने सुसंगत कृषि तंत्रज्ञानाच्या आधारे शेतकऱ्यांची क्षमता वाढविणे.

## अ. राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान अंतर्गत कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD)

पर्यावरण, कृषी उत्पादकता आणि लाखो ग्रामीण कुटुंबाच्या उपजिविकांच्या दृष्टीने कोरडवाहू कृषी उत्पादन असणाऱ्या क्षेत्रास महाराष्ट्रात विशेष महत्त्व आहे. राज्याच्या उत्पादक जमिनीपैकी/ क्षेत्रापैकी ८३ टक्के क्षेत्र हे कोरडवाहू आहे.

कोरडवाहू शेती ही अत्यंत जोखमीची व गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. तथापि, या क्षेत्रावर लक्ष केंद्रीत केल्यास कृषी उत्पादनात मोठी वाढ साध्य करता येईल एकात्मिक शेती पध्दतीतून कृषी क्षेत्राचा सर्वांगीण विकास व कृषी आधारित पूरक उद्योगधंद्याची योग्य सांगड घातल्यास उत्पादकतेत वाढ करता येणे शक्य होईल.

केंद्र शासनाने शाश्वत कृषी उत्पादकतेसाठी सन २०१४-१५ पासून हवामान बदलाशी सुसंगत कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान (NMSA) कार्यान्वित केले आहे.

राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत कोरडवाहू शाश्वत शेती विकास कार्यक्रम सन २०११-१२ पासून राज्यामध्ये राबविण्यात येत होता. एप्रिल २०१४ पासून कोरडवाहू शाश्वत शेती विकास कार्यक्रमामध्ये (RADP) आवश्यक बदल करून, कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) हा घटक राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत (NMSA) समाविष्ट करून सन २०१४-१५ पासून राज्यामध्ये राबविण्यात येत आहे.

## ब. कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) घटकाचा उद्देश :

१. शेतकऱ्यांच्या उत्पादकतेत शाश्वत वाढ करून नवीन उपजिविकेच्या साधनांची उपलब्धता करणे व त्याआधारे त्यांचे जीवनमान उंचावणे.

२. बहुवार पीक पध्दती, पीक बदल, आंतर पीक पध्दती यांचा वापर तसेच फळपिके, पशुधन, वनिकी, मधमाशी पालन इ. शेतीपध्दतींचा समावेश करून शेतकऱ्याला शाश्वत उत्पन्न देण्याबरोबरच नैसर्गिक आपत्तींचा सामना करण्यास सक्षम करणे.

३. नैसर्गिक संसाधन तसेच विविध पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन कार्यक्रमातून निर्माण झालेल्या संसाधनांच्या क्षमतेचा प्रस्तावित एकात्मिक शेती पध्दतीस स्थैर्य देण्यासाठी सुयोग्य वापर करणे.

## ● कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) घटकातील समाविष्ट बाबी :

**१. एकात्मिक शेती पध्दती :**

अ) पीक आधारित शेती पध्दती

ब) पशुधन आधारित शेती पध्दती

क) फलोत्पादन आधारित शेती पध्दती

ड) कृषी-वनिकी आधारित शेती पध्दती

**२. मूल्यवर्धन व शेती विकास :-**

अ) मधुमक्षिकापालन

ब) मुरघास युनिट

क) काढणीपश्चात तंत्रज्ञान व प्रक्रिया युनिट

ड) हिरवळीचे खत

इ) गांडूळ खत व सेंद्रिय निविष्ठा उत्पादन

ई) हरीतगृह उभारणी

फ) शेडनेट उभारणी

**टीप :** -- सन २०१४-१५ मध्ये सदर योजना १००% केंद्र पुरस्कृत होती तथापि सन २०१६-१७ पासून ६०:४० केंद्र व राज्य हिस्सा या तत्त्वावर राबविण्यात येत आहे.

**योजनेची प्रगती :--**

**योजनेची प्रगती सन २०२१-२०२२** (रु. लाखात)

| अ.क्र. | केंद्र /राज्य पुरस्कृत योजनेची यादी | मंजूर कार्यक्रम | प्राप्त निधी | खर्च निधी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान (NMSA) अंतर्गत कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) २०२१-२२ | २६६१.२२ | १२२२.९८ | १०५५.६९ |

**नियोजन सन २०२२-२३ व २०२३-२४**

(रु. लाखात)

| अ.क्र. | केंद्र /राज्य पुरस्कृत योजनेची यादी | मंजूर कार्यक्रम | मुक्त निधी | | खर्च निधी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | केंद्र | राज्य | केंद्र | राज्य |
| १ | २ | ३ | ४ | | ५ | |
| १ | राष्ट्रीय कृषि विकास योजना (RKVY-RAFTAAR) अंतर्गत कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) सन २०२२-२३ | ३३३३.३३ | २०००.०० | १३३३.३३ | ४६३.४६ | ३०८.९८ |
| २ | राष्ट्रीय कृषि विकास योजना (RKVY-RAFTAAR) अंतर्गत कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) सन २०२३-२४ | ३६६६.६६ (प्रस्तावित) | .. | .. | .. | .. |

# राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया पिके उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास योजना

कापूस हे महाराष्ट्रातले सर्वाधिक महत्व असलेल्या पिकांपैकी एक आहे. राज्यातील बहुतांश शेतकरी हे पीक घेतात. परंतु उत्पादकता कमी व मूल्य साखळीमध्ये स्थान नसणे यामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित लाभ मिळत नाही. या सर्व बाबींचा विचार करून कापूस पिकाची उत्पादकता वाढ करणे व मूल्य साखळीचा विकास करून त्याचा लाभ सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे तसेच राज्यातील गळीतधान्य पिकाची कमी उत्पादकता असणाऱ्या क्षेत्रातील उत्पादकता इतर प्रगतीशील शेतकऱ्यांच्या बरोबरीने आणण्याच्या दृष्टीने उत्पादकता वाढविणे तसेच, सोयाबीनच्या दरामध्ये होणारी चढ-उतार लक्षात घेता शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची वाजवी किंमत मिळण्याकरिता सोयाबीन पिकाची मूल्यसाखळी विकसीत करणे तसेच यामाध्यमातून शेतकरी ते ग्राहक या साखळीतील कार्यरत सर्व घटकांना लाभ देणे. कार्यरत सर्व घटकांना लाभ देणे. या हेतूने राज्य शासनातर्फे सन २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत राज्यातील कापूस उत्पादक जिल्ह्यांतील २.६० लाख हेक्टर क्षेत्रावर तसेच सोयाबीन व इतर गळीतधान्य उत्पादक जिल्ह्यांतील ३.०० लाख हेक्टर क्षेत्रावर सदरील योजना राबविण्यात येणार आहे.

या तीन वर्षाच्या कालावधीसाठी कापूस पिकासाठी रु. ४५० कोटी तर सोयाबीन व इतर गळीतधान्य पिकासाठी रु. ५५० कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदरील योजना समूह आधारित संकल्पनेनुसार (Cluster Based Approach) राबविण्यात येत आहे.

## कापूस उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास योजना :

**उद्देश :-**

१. कापूस आधारित पीक पद्धतीस चालना देवून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे.

२. कापूस पिकातील उत्पादकता वाढविणे.

३. कापूस पिकातील मूल्यसाखळीस चालना देणे.

४. कापूस पिकातील नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रचार व प्रसिद्धी करणे.

५. शेतकऱ्यांना कापसाच्या गुणवत्तेनुसार दर मिळणेबाबत प्रयत्न करणे.

६. कापूस विकणेऐवजी कापसाच्या गाठी करून विकणेस शेतकरी गटांना व शेतकरी उत्पादक कंपनींना प्रोत्साहित करणे

**समाविष्ट जिल्हे :** (१) नाशिक (२) धुळे (३) नंदूरबार (४) जळगाव (५) अहमदनगर (६) औरंगाबाद (७) जालना (८) बीड (९) उस्मानाबाद (१० ) नांदेड (११) परभणी (१२) हिंगोली (१३) बुलढाणा (१४) अकोला (१५) वाशिम (१६) अमरावती (१७) यवतमाळ (१८) वर्धा (१९) नागपूर (२०) चंद्रपूर (२१) गडचिरोली

**सन २०२२-२३ कार्यक्रम अंमलबजावणी**

| अ. क्र. | बाब/घटक | परिणाम (एकक) | अनुदान दर | भौतिक लक्ष | भौतिक अपेक्षित साध्य | आर्थिक (रक्कम रुपये लाखात) लक्ष | आर्थिक (रक्कम रुपये लाखात) अपेक्षित साध्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उत्पादकता वाढ आधारित प्रात्यक्षिक | हेक्टर | रक्कम रु. ७००० प्रति हे. | ८०५०० | ९१७७१ | ५६३५.०० | ५८७२.६९ |
| २ | अतिघन लागवड आधारित प्रात्यक्षिक | हेक्टर | रक्कम रु. १००००/- प्रति हेक्टर | ११३०० | १५०० | १०८२.०० | १२८.५० |
| ३ | सेंद्रिय शेती आधारित प्रात्यक्षिक | हेक्टर | रक्कम रु.१००००/- प्रति हेक्टर | ३०१०० | ११२० | ३०१०.०० | ९३.९९ |
| ४ | शेतीशाळा | संख्या | (रु. १२५००/- प्रति शेतीशाळा) | ४९१६ | २२१५ | ६०९.५० | २८४.७८ |
| ५ | समूह प्रवर्तक नेमणूक | | | १२०० | ४४२६ | ७२.०० | २७.५४ |
| ६ | शेतकरी प्रशिक्षण | | | १२०० | ६०३४ | ३००.०० | ७१.०० |
| ७ | प्रक्षेत्र भेट | | | १२०० | ८२ | ६००.०० | १७.५० |
| | औरंगाबाद प्रकल्प | | | | | १०००.०० | १०००.०० |
| | आयुक्तालय स्तर | | | | | ४.०० | ४.०० |
| | | एकूण | | | | १२३१२.५० | ७५००.०० |

टिप : सन २०२२-२३ मध्ये एकूण कार्यक्रम रु.१९९.३१ कोटी राबविणे प्रस्तावित आहे. तथापी रु.७५.०० कोटी कार्यक्रम राबविण्यात आला आहे. उर्वरित रक्कम रु.१२४.३१ कोटी सन २०२२-२३ मधील शिल्लक आणि सन २०२३-२४ मधील रक्कम रु.१६२.४४ कोटीचा प्रस्तावित कार्यक्रम अशी एकत्रित रक्कम रु.२८६.७५ कोटी तरतूद सन २०२३-२४ करीता आवश्यक आहे.

## सोयाबीन व इतर तेलबिया पिके उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास योजना

**उद्देश :-**

१. सोयाबीन व इतर गळीतधान्य आधारित पीक पद्धतीस चालना देवून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे.

२. उत्पादकता वाढविणे (प्रामुख्याने कमी उत्पादकता असलेल्या जिल्हा व तालुक्यांवर भर देणे).

३. सोयाबीन व इतर गळीतधान्य पिकातील मूल्यसाखळीस चालना देणे.

४. काढणी पश्चात नुकसान टाळण्यासाठी साठवणूक सुविधा उपलब्ध करून देणे.

५. नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रचार व प्रसिद्धी करणे.

६. दरातील चढ-उतारा पासून संरक्षणासाठी धान्य पावती तारण योजनेची सूविधा उपलब्ध करून देणे.

७. विद्यापीठ, शासकीय संस्था/एफ.पी.ओ. यांच्याकडे बिजोत्पादनाकरिता पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे.

८. एफ.पी.ओ. स्तरावर प्राथमिक प्रक्रिया व साठवणूक सुविधा निर्माण करणे.

९. शेतकरी उत्पादक कंपन्यांचे मूल्यसाखळी बळकटीकरण करण्याकरिता प्रोत्साहनपर अनुदान देणे.

१०. शेतकरी उत्पादक कंपन्यांना वायदे बाजाराशी जोडणे.

११. वखार महामंडळांमार्फत एकत्रित साठवणूक सुविधा निर्माण करणे.

१२. प्रक्रिया धारकांना योग्य दर्जाच्या मालाचा पुरवठा सुनिश्चित करणे.

१३. प्रक्रियेमुळे मिळणाऱ्या मूल्यवर्धनाचा हिस्सा शेतकऱ्यांना मिळवून देणे.

**समाविष्ट जिल्हे** : १) नाशिक, २) धुळे, ३) नंदुरबार, ४) जळगाव, ५) सोलापूर, ६) पुणे, ७) अहमदनगर, ८) सातारा, ९) सांगली, १०) कोल्हापूर, ११) औरंगाबाद, १२) जालना, १३) बीड, १४) लातूर, १५) उस्मानाबाद, १६) नांदेड, १७) परभणी, १८) हिंगोली, १९) बुलढाणा, २०) अकोला, २१) वाशीम, २२) अमरावती, २३) यवतमाळ, २४) वर्धा, २५) नागपूर, २६) चंद्रपूर.

**सन २०२२-२३ मधील कार्यक्रम अंमलबजावणी**

| अ.क्र. | बाब | परिमाण | सन २०२२-२३ साठी आवश्यक निधी (रु. लाखात) भौतिक | आर्थिक |
|---|---|---|---|---|
| **अ) तेलबिया पिके** | | | | |
| १ | **पिक प्रात्यक्षिक** | | | |
| | सोयाबिन | हेक्टर | ९६४०० | ६२५०.०० |
| | भुईमुग | | ३५० | २०.०० |
| | **एकूण प्रात्यक्षिक** | | **९६७५०** | **६२७०.००** |
| २ | शेतीशाळा (सोयाबीन) | संख्या | २३८४ | ३२०.०० |
| ३ | शेतकरी प्रशिक्षण | संख्या | २९३४ | २५०.०० |
| ४ | प्रकल्प भेट | संख्या | १२७३ | ८०.०० |
| ५ | कृषी प्रवर्तक मानधन | संख्या | ६१९ | ३५.०० |
| ६ | संकीर्ण | ----- | ----- | ४५.०० |
| | **एकूण.....(अ) तेलबिया** | | ----- | **७०००.००** |

टिप : सन २०२२-२३ मध्ये एकूण कार्यक्रम रु.१६३.०० कोटी राबविणे प्रस्तावित आहे. तथापी रु.७०.०० कोटी कार्यक्रम राबविण्यात आला आहे. उर्वरित रक्कम रु.९३.०० कोटी सन २०२२-२३ मधील शिल्लक आणि सन २०२३-२४ मधील रक्कम रु.२७३.२३ कोटीचा प्रस्तावित कार्यक्रम अशी एकत्रित रक्कम रु.३६६.२३ कोटी तरतूद सन २०२३-२४ करीता आवश्यक आहे.

## पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप )

**१. प्रास्ताविक :-** पावसाची अनियमितता, त्यामध्ये पडणारा खंड आणि त्यानुसार हवामानात होणारे चढ-उतार यामुळे पिकांवरील कीड आणि रोगांच्या वाढीकरिता विशिष्ट अनुकूल परिस्थिती निर्माण होऊन पिकांचे कीड-रोगांमुळे नुकसान होते. कीड रोगांपासून वारंवार होणारे नुकसान टाळण्यासाठी तसेच सोयाबीन, कापूस, भात, तूर व हरभरा या पिकांखालील क्षेत्र व त्यांचे आर्थिक महत्त्व लक्षात घेता राज्यात सन २००९-१० पासून राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत (राकृवियो) पीकांवरील कीड-रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प राबविण्यात आला. प्रकल्पाची उपयुक्तता विचारात घेऊन सन २०१३-१४ पासून सदर प्रकल्पाची अंमलबजावणी नियमित राज्य योजनेतून करण्यात येत आहे.

**२. उद्देश :-** १. शेतकऱ्यांमध्ये कीड-रोगांची ओळख निर्माण करणे, त्यांना प्रशिक्षित करून कीड-रोगांचे वेळीच व्यवस्थापन करणे.

२. कीड-रोगांच्या प्रादूर्भावाबाबत जागरुकता निर्माण करणे व पुढील संभाव्य नुकसान टाळून उत्पादनात वाढ करणे.

३. सोयाबीन, कापूस, भात, तूर, हरभरा, मका, ज्वारी व ऊस या पिकांचे सर्वेक्षण करून प्रमुख कीड-रोगांच्या व्यवस्थापनाच्या दृष्टिने शेतकऱ्यांना वेळीच उपाययोजना सूचविणे.

४. कीड-रोग प्रादुर्भावित क्षेत्रासाठी आपत्कालीन परिस्थितीत DBT तत्त्वावर पीक संरक्षण औषधे उपलब्ध करून देणे.

५. कीड-रोगांच्या आकस्मिक प्रादूर्भावामुळे शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक नुकसान टाळणे.

६. वारंवार येणाऱ्या कीड रोगांबाबत सांख्यिकी माहिती संकलित करणे व कायम स्वरुपाच्या व्यवस्थापनाबाबत कृषि विद्यापीठांच्या सहाय्याने शिफारशी निश्चित करणे.

७. राष्ट्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्र (भारतीय कृषी संशोधन परिषद), नवी दिल्ली, राज्यातील कृषी विद्यापीठे, राज्याचा कृषि विभाग, केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर, केंद्रीय कोरडवाहू शेती संशोधन केंद्र, हैद्राबाद, राष्ट्रीय वनस्पती आरोग्य व्यवस्थापन संस्था, हैद्राबाद; इत्यादी संस्थांच्या मदतीने सोयाबीन, कापूस, भात, तूर, हरभरा, मका, ज्वारी व ऊस या पिकांवरील कीड रोगांचे सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना उपाययोजना सुचविणे, कीड व्यवस्थापनाबाबतच्या शिफारशी तयार करणे आणि या अनुषंगाने कृषी खात्यातील कर्मचारी व शेतकरी यांना प्रशिक्षण देणे.

**३. प्रकल्पाचे कार्यक्षेत्र :- खरीप :** राज्यातील सोयाबीन, कापूस, भात, तूर, मका, ज्वारी व ऊस पिकांखालील संपूर्ण पेरणी क्षेत्र.

**रब्बी :-** कोकण विभाग वगळता राज्यातील हरभरा, रब्बी ज्वारी व मका पिकाखालील संपूर्ण पेरणी क्षेत्र.

**नियतव्यय :** रक्कम रु. लाखात

| सन २०२१-२२ | | | सन २०२२-२३ | सन २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| मंजूर तरतूद | प्राप्त निधी | प्रत्यक्ष खर्च | मंजूर तरतूद | प्रस्तावित तरतूद |
| २५००.०० | १२५०.०० | १२४५.६५ | २५००.०० | ४०००.०० |

**४. प्रमुख बाबी :-** (१) कीडींचे सर्वेक्षण, व्यवस्थापन व सल्ला पध्दती-

(२) शेतकऱ्यांमध्ये कीडरोगाबाबत जागरूकता निर्माण करणे.

(३) आपत्कालीन परिस्थितीत शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर कीटकनाशकांचा पुरवठा करणे.

**५. सहभागी संस्था**

(१) कृषी विभाग, महाराष्ट्र शासन

(२) राष्ट्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्र, नवी दिल्ली

(३) केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर

(४) केंद्रीय कोरडवाहू शेती संशोधन केंद्र, हैद्राबाद

(५) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी

(६) महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी

(७) डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

(८) डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली

(९) राष्ट्रीय वनस्पती आरोग्य व्यवस्थापन संस्था, हैद्राबाद

**६. योजनेचे कार्यक्षेत्र व सर्वेक्षणासाठीच्या प्रमुख किडी व रोग :-** राज्यातील सोयाबीन, कापूस, भात, तूर, हरभरा, मका, ज्वारी व ऊस पिकाखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणावर होणारा कीड व रोगांचा प्रादुर्भाव नियंत्रणात आणणे.

| अ. क्र. | पीकाचे नाव | क्षेत्र (लाख हे.) | प्रमुख कीडी व रोग |
|---|---|---|---|
| १ | सोयाबीन | ४१.४३ | तंबाखूवरील पाने खाणारी अळी, हेलिकोव्हर्पा उंट अळी, खोड माशी व चक्री भुंगा, |
| २ | कापूस | ४२.११ | तंबाखूवरील पाने खाणारी अळी, तुडतुडे, फुलकिडे व पांढरी माशी, शेंदरी बोंडअळी, ठिपक्याची व अमेरिकन बोंडअळी, |
| ३ | भात | १५.१८ | खोड किडा, गादमाशी, लष्करी अळी, तुडतुडे, निळे भुंगेरे, करपा, जीवाणूजन्य करपा व तपकिरी ठीपके |
| ४ | तूर | १३.०० | शेंगा पोखरणारी अळी, शेंगमाशी, पाने व फुले गुंडाळणारी अळी |
| ५ | हरभरा | २१.५८ | घाटे अळी व मर रोग |
| ६ | मका | ११.५० | अमेरिकन लष्करी अळी |
| ७ | ज्वारी | २०.५२ | अमेरिकन लष्करी अळी |
| ८ | ऊस | ११.०० | हुमणी व अमेरीकन लष्करी अळी |
| | **एकूण** | **१७६.३२** | |

## बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील)

**१. योजनेचे संक्षिप्त स्वरूप** : अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांकरिता आदिवासी उपयोजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) सन १९९२-९३ पासून राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यातील ठाणे, पालघर, रायगड, नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव, पुणे, अहमदनगर, नांदेड, अमरावती, यवतमाळ, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या १६ जिल्ह्यात आदिवासी उपयोजना (क्षेत्रांतर्गत) व ठाणे, पालघर, रायगड, नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव, अहमदनगर, पुणे, सोलापूर, औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या २९ जिल्ह्यात आदिवासी उपयोजना (क्षेत्राबाहेरील) योजना राबविण्यात येते.

सदर योजना दीर्घ कालावधीपासून राबविण्यात येत असल्याने योजनेच्या पुनर्विलोकनासाठी शासनाने समिती गठीत केली होती. सदर समितीच्या शिफारसी व प्राप्त परिस्थितीत शेतकऱ्यांना स्वयंपूर्ण करण्यासाठी आवश्यक बाबी विचारात घेवून दि. ९/८/२०१७ चे शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ पासून आदिवासी उपयोजना सुधारित केली आहे, तसेच दिनांक ३०/१२/२०१७ चे शासन पूरक पत्रान्वये सदर योजना बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना या नावाने राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

**२. योजनेची प्रमुख उद्दिष्टये** : अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना सिंचनाची शाश्वत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना राबविण्यात येत आहे.

**३. योजनेत समाविष्ट असलेले घटक व घटकनिहाय आर्थिक मापदंड खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | बाब | | अनुदान मर्यादा रुपये |
|---|---|---|---|
| १ | नवीन विहीर | | रु. २,५०,०००/- च्या मर्यादेत |
| २ | जुनी विहीर दुरुस्ती | | रु. ५०,०००/- च्या मर्यादेत |
| ३ | इनवेल बोअरिंग | | रु. २०,०००/- च्या मर्यादेत |
| ४ | वीज जोडणी आकार | | रु. १०,०००/- च्या मर्यादेत |
| ५ | शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण | | रु. १,००,०००/- च्या मर्यादेत |
| ६ | परसबाग | | रु. ५००/- च्या मर्यादेत |
| ७ | सूक्ष्म सिंचन संच | अ. ठिबक सिंचन | रु. ५०,०००/- च्या मर्यादेत किंवा |
| | | ब. तुषार सिंचन | रु. २५,०००/- च्या मर्यादेत |
| ८ | पंप संच | | रु. २०,०००/- च्या मर्यादेत |
| ९ | एचडीपीई/पीव्हीसी पाईप | | रु. ३०,०००/- च्या मर्यादेत |

**४. लाभार्थी निवड करण्यासाठीचे निकष** :

४.१) लाभार्थी हा आदिवासी शेतकरी असला पाहिजे. शेतकऱ्याजवळ त्याच्या स्वत:च्या नावे ६.०० हेक्टर पेक्षा कमी किंवा ०.२० हेक्टरपेक्षा जास्त शेतजमीन असावी. (नवीन विहिरीच्या लाभासाठी किमान क्षेत्र ०.४० हेक्टर आवश्यक)

४.२) अनुसूचित जमाती शेतकऱ्यांच्या बाबतीत ज्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन रुपये १,५०,०००/- पर्यंत आहे अशा शेतकऱ्यांना संबंधित तहसिलदार यांचेकडून उत्पनाचा दाखला घेणे बंधनकारक राहिल.

**५. लाभार्थ्याची निवड :- सदर योजनांतर्गत ऑनलाईन पद्धतीने महाडीबीटी पोर्टलवर अर्ज स्विकारण्यात येतात.**

लाभार्थी निवड महाडीबीटी पोर्टलद्वारे करण्यात येते.

## बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील)

### ६. नियतव्यय

(रु. लाखात)

| अ.क्र. | योजनेचे नाव | सन २०२१-२२ | | सन २०२२-२३ | सन २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर | खर्च | मंजूर कार्यक्रम | प्रस्तावित |
| १ | बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत) | ६०९०.८० | ६०९०.८० | ५८२३.०७ | ६४०५.३८ |
| २ | बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्राबाहेरील) | २८८१.४६ | २८८१.४६ | ३३९०.८१ | ३७२९.८९ |

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना

**१. योजनेचे संक्षिप्त स्वरुप** : अनुसूचित जाती/नवबौद्ध शेतकऱ्यासाठी सन १९८२-८३ पासून राबविण्यात येत असलेली अनुसूचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना) व मा. मंत्री (वित्त) यांनी घोषित केलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना या दोन योजना स्वतंत्रपणे न राबविता बदललेल्या परिस्थितीची गरज विचारात घेवून जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्याच्या दृष्टीकोनातून (Moisture Security) सध्याची प्रचलित विशेष घटक योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना या नावाने राबविण्यास शासनाने दि. ५/१/२०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.

**२. योजनेची प्रमुख उद्दिष्टे** : अनुसूचित जाती/नवबौद्ध शेतकऱ्यांना सिंचनाची शाश्वत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना राबविण्यात येते.

**३. योजनेत समाविष्ट असलेले घटक व घटकनिहाय आर्थिक मापदंड खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | बाब | | अनुदान मर्यादा रुपये |
|---|---|---|---|
| १ | नवीन विहीर | | रु. २,५०,०००/- च्या मर्यादेत |
| २ | जुनी विहीर दुरूस्ती | | रु. ५०,०००/- च्या मर्यादेत |
| ३ | इनवेल बोअरींग | | रु. २०,०००/- च्या मर्यादेत |
| ४ | पंप संच | | रु. २०,०००/- च्या मर्यादेत |
| ५ | वीज जोडणी आकार | | रु. १०,०००./- च्या मर्यादेत |
| ६ | शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण | | रु. १,००,०००/- च्या मर्यादेत |
| ७ | सूक्ष्म सिंचन संच | अ) ठिबक सिंचन किंवा<br>ब) तुषार सिंचन | रु. ५०,०००/- च्या मर्यादेत किंवा<br>रु. २५,०००/-च्या मर्यादेत |

**४. लाभार्थी निवड करण्यासाठीचे निकष :--**

४.१ **जमीन धारणा :** ज्या शेतकऱ्याजवळ त्याच्या स्वत:च्या नावे ६.०० हेक्टर पेक्षा कमी किंवा ०.२० हेक्टरपेक्षा जास्त शेतजमीन असेल अशा शेतकऱ्यांची निवड करावी. जमीन धारणेसाठी ७/१२ व ८अ उतारा घेण्यात यावा. (नवीन विहिरीच्या लाभासाठी किमान ०.४० हे क्षेत्र आवश्यक)

४.२ **जातीबाबतचा दाखला :** लाभार्थी हा अनुसूचित जाती/नवबौद्ध शेतकरी असला पाहिजे. दारिद्र्यरेषेखालील (बीपीएल) यादीमध्ये अनुसूचित जातीच्या/ नवबौद्ध व्यक्तीचे नाव असेल त्याला ग्रामसेवक/तलाठी/गट विकास अधिकारी यांचे सहीचे कागदपत्र ग्राह्य धरले जातील. याच धर्तीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेंतर्गत दारिद्र्यरेषेखालील अनुसूचित जातीच्या व्यक्तीसाठी ज्या योजना असतील त्या योजनेकरिता समाजकल्याण विभागाच्या दिनांक ७ जानेवारी, १९९७ चे परिपत्रकातील सूचनांप्रमाणे पुन्हा तहसिलदार यांच्या सहीचा जातीचा दाखला आवश्यक राहणार नाही.

४.३ **उत्पनाचा दाखला :** अनुसूचित जाती व नवबौद्ध शेतकऱ्यांच्या बाबतीत ज्या शेतकऱ्यांची जमीनधारणा ६ हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी आहे आणि ज्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन रुपये १,५०,०००/- पर्यंत आहे अशा शेतकऱ्यांना संबंधित तहसिलदार यांचेकडून उत्पनाचा दाखला घेणे बंधनकारक राहील.

**५. लाभार्थीची निवड :-**

सदर योजनेंतर्गत ऑनलाईन पद्धतीने महाडिबीटी पोर्टलवर अर्ज स्वीकारण्यात येतात. लाभार्थी निवड महाडीबीटी पोर्टलद्वारे करण्यात येते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना

**६. नियतव्यय**

(रु. लाखात)

| अ.क्र. | योजनेचे नाव | सन २०२१-२२ | | सन २०२२-२३ | सन २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर | खर्च | मंजूर कार्यक्रम | प्रस्तावित |
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना | २३०४०.५३ | २३०४०.५३ | २३०३७.७५ | २४७३३.७७ |

## राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत देण्यात येणारे विविध कृषी पुरस्कार

राज्यात दरवर्षी कृषी व संलग्न क्षेत्रात अति उल्लेखनिय कार्य करणाऱ्या शेतकरी/संस्था/गटास महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत कृषिरत्न, कृषीभूषण, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), जिजामाता कृषिभूषण, शेतीमित्र, शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडीत, कृषी सेवारत्न, युवा शेतकरी इ. पुरस्कार मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते प्रदान करुन सन्मानित करण्यात येते.

वर नमूद केलेल्या पुरस्कारांची माहिती व स्वरुप थोडक्यात पुढीलप्रमाणे विषद करण्यात येत आहे.

### १. पीक स्पर्धा-

राज्यात सन १९५९-६० पासून पिकस्पर्धा राबविण्यात येत आहे. रब्बी हंगाम सन २०२२ पासून पिकस्पर्धेचे स्वरूप व निकष बदलण्यात आलेले आहेत. शेतकऱ्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अधिकाधिक उत्पादन घेण्यासाठी स्पर्धात्मक वातावरणाची निर्मिती करणे व त्यांना प्रोत्साहन देणे या उद्देशाने राज्य, जिल्हा व तालुका पातळीवर पिकस्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यामध्ये ज्या पिकाखालील लागवड क्षेत्र १००० हेक्टरहून अधिक आहे, अशा सर्व पिकांकरिता पिकस्पर्धा आयोजित केली जात आहे.

*खरीप व रब्बी हंगामात पुढील पिकांचा समावेश राहील. (एकूण १६ पिके)

खरीप पिके-भात, ज्वारी, बाजरी, नाचणी,मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भूईमूग, सूर्यफुल (एकूण-११ पिके) रब्बी पिके-ज्वारी, गहू, हरभरा, करडई, जवस, (एकूण-५ पिके)

*स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी किमान आवश्यक क्षेत्र : भात पिकासाठी २० आर (०.२० हेक्टर) सर्व पिकांसाठी ४० आर. (०.४० हेक्टर)

*पिकस्पर्धासाठी तालुका पातळीवर सर्वसाधारण गटातील किमान १० स्पर्धक तर आदिवासी गटातील किमान ५ स्पर्धकांचा सहभाग आवश्यक असून त्यामध्ये सहभाग घेण्यासाठी रु. ३०० प्रति शेतकरी प्रति पिक याप्रमाणे प्रवेश शुल्क आहे.

**पारितोषिकाच्या स्वरूप खालीलप्रमाणे-**

| अ. क्र. | स्पर्धा पातळी | सर्वसाधारण व आदिवासी गट बक्षिस रुपये | | |
|---|---|---|---|---|
| | | पहिले | दुसरे | तिसरे |
| १. | तालुका पातळी | ५,००० | ३,००० | २,००० |
| २. | जिल्हा पातळी | १०,००० | ७,००० | ५,००० |
| ३. | राज्य पातळी | ५०,००० | ४०,००० | ३०,००० |

***सन २०१९ अखेर देण्यात आलेले एकूण पुरस्कार-३१८**

## २. डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार - (एकूण द्यावयाची पुरस्कार संख्या-१)

कृषी क्षेत्रातील कृषि विस्तार, कृषी प्रक्रीया, निर्यात, कृषी उत्पादन, पीक फेरबदल, कृषी उत्पादनामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी मध्ये अति उल्लेखनिय कार्य करणाऱ्या शेतकरी अथवा संस्थेस हा पुरस्कार देण्यात येतो. धनादेश रक्कम रुपये ७५,०००/-, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, सपत्नीक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरुप असून सन २०१९ अखेर २३ कृषिरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आलेले आहेत.

## ३. वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार : (एकूण द्यावयाची पुरस्कार संख्या-०८)

कृषी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्य व्यवसाय विकास, फलोत्पादन व ग्रामिण विकास, ज्यामध्ये बायोगॅसचा वापर, शेतकऱ्यांचा विकास इत्यादी संलग्न क्षेत्रात अद्वितीय कार्य करणाऱ्या शेतकरी / संस्था / गटांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. धनादेश रक्कम रोख रुपये ५०,०००/-, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र सपत्नीक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरुप असून सन २०१९ अखेर २९२ पुरस्कार प्रदान करण्यात आलेले आहेत.

## ४. कृषिभूषण (सेंद्रीय शेती) पुरस्कार : (एकूण द्यावयाची पुरस्कार संख्या-०८)

विविध माध्यमातून सेंद्रीय शेतीचा अवलंब, इतर शेतकऱ्यांना मार्गदर्शन तसेच या संकल्पनेचा प्रचार व प्रसिद्धी करणाऱ्या निवडक शेतकऱ्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. धनादेश रक्कम रोख रुपये ५०,०००/-, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, सपत्नीक असे या पुरस्काराचे स्वरुप असून सन २०१९ अखेर ७८ पुरस्कार प्रदान करण्यात आलेले आहेत.

## ५. जिजामाता कृषिभूषण पुरस्कार : (एकूण द्यावयाची पुरस्कार संख्या -०८)

शेती क्षेत्रातील महिलांचा वाढता सहभाग लक्षात घेऊन त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव व्हावा व अशा महिलांच्या कार्याने प्रभावित होऊन इतर महिलांमध्ये जागृती निर्माण करण्याकरिता या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. धनादेश रक्कम रोख रुपये ५०,०००/-, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, पतीसह सत्कार असे या पुरस्काराचे स्वरुप असून सन २०१९ अखेर १११ पुरस्कार प्रदान करण्यात आलेले आहेत.

## ६. वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार : (एकूण द्यावयाची पुरस्कार संख्या -०८)

ज्या व्यक्ती / संस्था शेती, पत्रकारीतेद्वारे किंवा इतर अन्य मार्गाने कृषी क्षेत्रात बहुमोल कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांना / व्यक्तींना / संस्थाना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. धनादेश रक्कम रोख रुपये ३०,०००/-, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, सपत्नीक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरुप असून सन २०१९ अखेर ८१ पुरस्कार प्रदान करण्यात आलेले आहेत.

## ७. उद्यान पंडित पुरस्कार (एकूण द्यावयाची पुरस्कार संख्या -८)

फलोत्पादन क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणारे शेतकऱ्यांमध्ये स्पर्धेची भावना निर्माण करुन फलोत्पादनास प्रोत्साहन देण्यासाठी सन २००१ पासून उद्यान पंडित पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे. धनादेश रक्कम रोख रुपये २५,०००/-, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, सपत्नीक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरुप असून सन २०१९ अखेर २२३ पुरस्कार प्रदान करण्यात आलेले आहेत.

## ८. वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार : (एकूण द्यावयाची पुरस्कार संख्या - ४०)

**उद्देश :** शेतीमध्ये आधुनिक तंत्राचा वापर, शेती पुरक व्यवसाय, स्वत:च्या कल्पनेने नवनवीन पद्धतीने पीक लागवड व इतर शेतकऱ्यांना शेती तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन करणाऱ्या शेतकऱ्यांना / संस्थांना शेतीनिष्ठ पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. धनादेश रक्कम रोख रुपये ११,०००/-, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, सपत्नीक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरुप असून सन २०१९ अखेर १४७१ पुरस्कार प्रदान करण्यात आलेले आहेत.

## ९. युवा शेतकरी पुरस्कार : (एकूण द्यावयाची पुरस्कार संख्या -०८)

१८ ते ४० वयोगटातील युवा शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनिय कार्याबद्दल प्रोत्साहन मिळावे म्हणून या शेतकऱ्यांना सन २०२० पासून "युवा शेतकरी" पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. धनादेश रक्कम रु. ३०,०००/- स्मृती चिन्ह, सन्मानपत्र, सपत्नीक/पतीसहअसे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

**१०. पद्‌मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार : (एकूण द्यावयाची पुरस्कार संख्या - ९)**

**उद्देश :** राज्यातील शेतीविषयक उत्पन वाढविण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे व मोलाचे कार्य करणाऱ्या कृषी विभागातील एका अतिउत्कृष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यास सन २०१४ पासून हा पुरस्कार देऊन गौरविणेत येत आहे. स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, सपत्नीक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरुप असून सन २०१९ अखेर १३ पुरस्कार प्रदान करण्यात आलेले आहेत.

## शेतकरी मासिक

**१) प्रास्ताविक :** सन १९६५ सालापासून कृषी विभागामार्फत शेतकरी मासिक नियमित प्रकाशित करण्यात येत आहे. मे, २००९ पासून संपूर्ण ५६ पानी मासिकाची चाररंगी छपाई करण्यात येत आहे. कृषिविषयक आधुनिक तंत्रज्ञान, विविध शासकीय योजना, निरनिराळ्या यशोगाथा, शेतकऱ्यांच्या समस्यांना उत्तरे इत्यादी माध्यमातून ज्ञान तळागाळाच्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या मासिकाच्या माध्यमातून करण्यात आला व शेतकऱ्यांचा त्यास अतिशय उत्तम प्रतीसाद मिळत असून हे मासिक वाचून आधुनिक तंत्रज्ञानाचा शेती पध्दतीत वापर करून उत्पन्न यशस्वीरित्या वाढविले आहे. त्यामुळे हे महत्त्वपूर्ण मासिक यापुढेही नियमित चालविण्याची आवश्यकता आहे.

**वित्तीय आवश्यकता :-**

(रुपये लाखात)

| वर्ष | सरासरी वर्गणीदार संख्या | वर्गणीद्वारे जमा रक्कम रुपये | जाहिरातीद्वारे जमा रक्कम | एकूण जमा रक्कम |
|---|---|---|---|---|
| २०१६-१७ | १११२८८ | २७८.२२ | ८.५५ | २८६.७७ |
| २०१७-१८ | ११२१५० | १९४.६९ | २.४६ | १९७.१५ |
| २०१८-१९ | ५४९९८ | १३७.४६ | १.९६ | १३९.४२ |
| २०१९-२० | ४८३७२ | १२०.९३ | २.१४ | १२३.०७ |
| २०२०-२१ | ५८३२९ | १४५.८२ | २.१४ | १४७.९६ |
| २०२१-२२ | ५९४९२ | १४८.७३ | १.४५ | १५०.१८ |
| २०२२-२३ (अंदाजित) | ७०००० | १७५.०० | १.८० | १७६.८० |

सन २०२१-२२ साठी वर्गणीदारांकडून व जाहिरातीपोटी रुपये १५०.१८ लाख महसूल जमा झालेला आहे.

सध्या कार्यालयात १६ पदे मंजूर असून त्यामध्ये १० पदे रिक्त आहेत. सन २०२१-२२ मध्ये सरासरी ५९४९२ वर्गणीदार करण्यात आलेले आहे.

वर्गणी व जाहिरातीद्वारे माहे मार्च-२०२२ अखेर रुपये १५०.१८ लाख महसूल जमा झाला आहे. सन २०२२-२३ साठी रु. ४३२.६४ लाख तरतूद केली असून रु. ३९३.४० लाख इतका निधी मंजूर झाला. तसेच सन २०२३-२४ करिता ४६७.१४ लाख इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे.

### शेतकरी मासिक कार्यालयातील पदांबाबतची माहिती

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पदे स्थायी | मंजूर पदे अस्थायी | मंजूर पदे एकूण | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| | **वर्ग-१** | | | | | |
| १ | कृषी उपसंचालक | १ | .. | १ | .. | १ |
| | **वर्ग-२** | | | | | |
| २ | तंत्र अधिकारी | १ | .. | १ | १ | .. |
| ३ | कृषी अधिकारी | २ | .. | २ | १ | १ |
| | **वर्ग-३** | | | | | |
| ४ | अनुवादक (कृषी अधिकारी स्तर) | .१ | .. | १ | .. | १ |
| ५ | अधीक्षक | .. | १ | १ | .. | १ |
| ६ | लघुलेखक (निम्नश्रेणी) | .. | १ | १ | .. | १ |
| ७ | कृषी पर्यवेक्षक | .. | १ | १ | १ | .. |
| ८ | कृषी सहाय्यक | .. | १ | १ | .. | १ |
| ९ | वरिष्ठ लिपीक | १ | १ | २ | २ | .. |
| १० | लिपीक | १ | १ | २ | .. | २ |
| ११ | शिपाई | .. | ३ | ३ | १ | २ |
| | एकूण | ७ | ९ | १६ | ६ | १० |

# कृषी सांख्यिकी

शेतीविषयक साधनांची उपलब्धता, शेतीविषयक संशोधन व विस्तार, शेतीमालासंबंधित व्यापार, शेतीविषयक नियोजन इत्यादींसाठी विश्वसनीय आकडेवारीची आवश्यकता असते. या माहितीचा उपयोग, आयात निर्यात धोरण ठरविण्यासाठी व स्वयंपूर्णतेच्या दृष्टीने करावयाचे नियोजन इत्यादिसाठी करण्यात येतो. पीक कापणीच्या प्रयोगांचे क्षेत्रकाम प्रामुख्याने मंडळ निरीक्षक/कृषि सहाय्यक व ग्रामसेवकास देण्यात येते. पीक कापणी प्रयोगांचे क्षेत्रकामाचे पर्यवेक्षण प्रामुख्याने कृषी, महसूल व ग्रामविकास खात्यातील अधिकारी करतात. यासंबंधी गोळा करण्यात आलेल्या माहितीचे संकलन व विश्लेषण अहवाल सांख्यिकी विभागामार्फत तयार करण्यात येतो.

महाराष्ट्रातील शेती ही प्रामुख्याने नैऋत्य मान्सुनच्या पावसावर अवलंबून आहे. निरनिराळ्या ठिकाणी पडणाऱ्या पावसाची नोंद महसूल मंडळस्तरावर स्थापन केलेल्या स्वयंचलीत हवामान केंद्रात करण्यात येते. राज्यात सद्य:स्थितीत प्रत्येक महसूल मंडळास एक अशाप्रमाणे एकूण २१२७ ठिकाणी पर्जन्यमापक केंद्रे कार्यरत आहेत. सदरची माहिती जून ते ऑक्टोबर या कालावधीत दररोज शासनास सादर केली जाते.

राज्यात हंगामनिहाय, जिल्हानिहाय, पेरणी झालेल्या पिकांची माहिती विनाविलंब उपलब्ध व्हावी या दृष्टीने कृषी विभागाचे सांख्यिकी विभागामार्फत राज्यातील पीक परिस्थितीची साप्ताहिक माहिती विभागीय कार्यालयाकडून गोळा केली जाते व त्या माहितीवर आधारित राज्यातील हवामान, पेरणी व पीक परिस्थितीचा साप्ताहिक अहवाल शासनास सादर केला जातो.

---

## (अ) कृषी उत्पादन

कृषी उत्पादन वाढविण्याच्या दृष्टिने राज्यात अनेक प्रकारच्या योजना राबविल्या जात आहेत. त्यामुळे कृषी उत्पादन वाढविण्याच्या कामात गती येते. सन २०१८-२०१९ ते २०२१-२२ चे अंतिम अहवाल व सन २०२२-२३ चे द्वितीय पुर्वानुमान (खरीप + रब्बी) अहवाल तसेच पीकनिहाय उत्पादनाचे लक्षांक व साध्य खाली नमूद केल्याप्रमाणे आहे.

(उत्पादन लाख टनात)

| | २०१८-१९ (अंतिम) | | २०१९-२० (अंतिम) | | २०२०-२१ (अंतिम) | | २०२१-२२ (अंतिम) | | २०२२-२०२३ (खरीप + रब्बी) द्वि. पु. अ. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य |
| तांदूळ (खरीप) | ३८.४० | ३१.४४ | ३४.१० | २७.०२ | ३४.८८ | ३०.२७ | ३७.२० | ३१.३२ | ३४.१० | ३४.८० |
| गहू | २०.४९ | १२.४९ | १७.२३ | १७.९३ | १७.२३ | २०.७१ | १७.२३ | २१.४४ | २७.३० | २१.८४ |
| खरीप ज्वारी | ५.७५ | ४.३० | ४.१० | २.७३ | ६.०० | ३.८१ | ६.६० | २.६२ | ४.२३ | १.४० |
| रब्बी ज्वारी | २०.०२ | ७.६८ | १९.११ | १५.९२ | १९.५७ | १८.०५ | २०.९३ | १८.७८ | २३.१० | १४.०६ |
| बाजरी | ९.४३ | ३.३२ | ६.५८ | ५.१२ | ६.८३ | ९.०६ | ६.५० | ६.०० | ८.३२ | ४.४७ |
| नाचणी | १.१४ | ०.९४ | २.०३ | ०.८७ | १.८८ | ०.९४ | २.०३ | १.०३ | १.२५ | ०.९६ |
| मका (खरीप+रब्बी+उन्हाळी) | ३८.७४ | १७.६६ | ४०.०९ | १९.६० | ३८.४७ | ३५.८८ | ४३.०१ | ३५.८५ | ४४.२५ | ३७.३० |
| एकूण तृणधान्य खरीप | ८५.०२ | ५३.८६ | ७८.५२ | ४६.४८ | ८०.९३ | ७०.५० | ८४.९१ | ६३.०१ | ८२.३४ | ६९.०४ |
| एकूण रब्बी तृणधान्य | ४८.३४ | २४.०१ | ४४.४३ | ४१.८४ | ४३.५५ | ४७.४९ | ४८.०२ | ५३.१२ | ५८.८४ | ४६.०८ |

| | २०१८-१९ (अंतिम) | | २०१९-२० (अंतिम) | | २०२०-२१ (अंतिम) | | २०२१-२२ (अंतिम) | | २०२२-२०२३ (खरीप+रब्बी) द्वि. पु. अ. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य |
| कडधान्ये खरीप | २८.८२ | १२.३४ | २०.८५ | १५.३७ | २२.०१ | १९.७४ | २३.४७ | २१.०६ | २२.२१ | १३.२० |
| कडधान्ये रब्बी + उन्हाळी | २१.४० | १४.४९ | २१.४१ | २३.१२ | २१.४१ | २४.७१ | २३.१० | २७.८० | २९.५२ | ३७.२५ |
| **एकूण कडधान्ये** (खरीप + रब्बी + उन्हाळी) | **५०.२२** | **२६.८३** | **४२.२५** | **३८.४९** | **४३.४२** | **४४.४४** | **४६.५६** | **४८.८७** | **५१.७२** | ५०.५० |
| **एकूण अन्नधान्ये** (खरीप + रब्बी + उन्हाळी) | **१८७.१७** | **१०६.३०** | **१६७.४०** | **१३०.६७** | **१७०.११** | **१६६.४६** | **१८२.०१** | **१६९.४९** | **१९८.९५** | १६५.६० |
| कापूस (रुई) | १०६.४० | ६५.९३ | १०५.८८ | ६६.३९ | १०७.४० | १०१.१० | १०५.८८ | ७७.९१ | १११.१८ | ८१.९२ |
| ऊस | ८२०.०० | ८९७.७१ | ९१३.५० | ६९३.१३ | ८२२.०० | ११११६.४२ | ९०२.५० | १३९१.५९ | १०५०.०० | १४४५.१८ |
| तेलबिया (खरीप + रब्बी + उन्हाळी) | ५२.८८ | ४८.८५ | ५७.७० | ५१.७८ | ५८.२२ | ६७.१९ | ६०.९० | ५९.५४ | ७२.५७ | ६८.२० |

कापसाचे उत्पादन लाख गाठीत असून एक गाठ १७० किलोची आहे.

**टीप** :- (१) सन २०१८-१९ ते २०२१-२२ मधील खरीप, रब्बी व उन्हाळी पिकांचे उत्पादनाचे अंदाज अंतिम पुर्वानुमान आधारित आहेत. (२) सन २०२२-२३ मधील (खरीप + रब्बी) पिकांचे उत्पादनाचे अंदाज द्वितीय पुर्वानुमान अहवालानुसार आहेत.

## (ब) प्रमुख पिकांचे क्षेत्रफळ वेळेवर कळविण्याची योजना (१००% केंद्र योजना)

राज्यातील प्रमुख पिकांच्या क्षेत्राची आकडेवारी बिनचूक व वेळेवर उपलब्ध व्हावी यादृष्टीने सदर योजना सन १९६८-६९ पासून भारत सरकारचे १०० टक्के आर्थिक सहाय्याने कार्यान्वित झाली. तद्नंतर सन १९७९-८० ते २००६-०७ पर्यंत एकूण खर्चाच्या ५० टक्के अनुदान केंद्र शासनाकडून व उर्वरित ५० टक्के अनुदान राज्य शासनाकडून प्राप्त होत होते. सदरची योजना सन २००७-०८ पासून १००% केंद्र योजना म्हणून राज्यात राबविण्यात येत आहे. ही योजना वेतनाधीन असून योजनेतील नियमित काम करण्यासाठी मंजूर असलेल्या अधिकारी/कर्मचारी वर्ग यांचे वेतन व भत्ते भागविणेसाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते.

सर्वेक्षण पद्धतीने प्रमुख पिकाखालील क्षेत्राची हंगामनिहाय आकडेवारी गोळा करण्यात येऊन क्षेत्राचे अंतिम अंदाज तयार करून केंद्र व राज्य शासनास सादर करणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. हंगामनिहाय क्षेत्राच्या अंतिम आकडेवारीचा उपयोग शासनाच्या विविध धोरणांच्या अंमलबजावणीसाठी करण्यात येतो. या योजने अंतर्गत कृषी विभागाने विहित केलेल्या क्षेत्राच्या नमुना कार्डद्वारे राज्यातील एकूण गावांपैकी दरवर्षी निवडलेल्या २० टक्के गावांची हंगामनिहाय क्षेत्राची आकडेवारी महसूल विभागाकडील क्षेत्रीय कर्मचाऱ्यांकडून प्राप्त करून घेण्यात येते. ही आकडेवारी जिल्हा/विभाग स्तरावर हंगामनिहाय संकलित करून आयुक्तालयस्तरावर पिकनिहाय/जिल्हानिहाय/तालुकानिहाय क्षेत्राचे अंदाज दरवर्षी हंगामनिहाय अंतिम करण्यात येतात. तसेच जमिनीच्या वापरानुसार नऊ प्रकारचे वर्गीकरण क्षेत्राची अंदाजित आकडेवारी अंतिम करणेकामी वरीलप्रमाणेच नमुना कार्डाद्वारे महसूल विभागाकडून आकडेवारी प्राप्त करून घेण्यात येते व अंदाज अंतिम करण्यात येतात.

**भौतिक व आर्थिक लक्ष्य व साध्य**

रक्कम रु. लाखात

| अ.क्र. | बाब | २०२१-२२ | | २०२२-२३ | | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य |
| १ | पर्यवेक्षीय कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण | १६ | १६ | १६ | .. | १६ |
| २ | यादृच्छिक गावांची निवड | ८,८०० | ८,८०० | ८,८०० | ८,८०० | ८,८०० |
| ३ | तक्त्यांची छाननी व नोंदणी | २६,४०० | २६,४०० | २६,४०० | काम प्रगती | २६,४०० |
| ४ | तक्त्यांचे संकलन व पृथ:करण | २६,४०० | २६,४०० | २६,४०० | पथावर आहे. | २६,४०० |
| ५ | अहवाल तयार करणे | ५ | ५ | ५ | .. | ५ |
| ६ | आर्थिक लक्ष्य/साध्य (रु. लाखात) | ४००.०० | २६२.७३ डिसेंबर, २०२२ अखेर | ४६०.०० | ७७.८८ डिसेंबर, २०२२ अखेर | ५००.०० |

## (क) पिकाचे आकडेवारीत सुधारणा करण्याची योजना (१०० टक्के केंद्र योजना)

सदर योजना सन १९७५ मध्ये केंद्र शासनाने १०० टक्के अनुदानाने सुरू केली आणि पुढे सन १९७९-८० पासून एकूण खर्चाच्या ५० टक्के एवढे अनुदान दरवर्षी सन २००६-०७ पर्यंत मिळत होते. सन २००७-०८ पासून १०० टक्के केंद्र योजना म्हणून राज्यात राबविण्यात येत आहे. योजनेच्या कामाचे स्वरूप व नियोजन एन.एस.एस.ओ. फरीदाबाद यांच्याकडून कळविले जाते व त्यानुसार राज्यांतील सर्व जिल्ह्यांमध्ये तिन्ही हंगाम मिळून तलाठ्यांनी केलेल्या पीक पाहणीचे पर्यवेक्षण १३२० गावे व मंडळ निरीक्षक/ ग्रामसेवक यांनी केलेल्या पीक कापणी प्रयोगाचे पर्यवेक्षण (खरीप व रब्बी मिळून १३०० प्रयोग) कृषी खात्यातील कृषी पर्यवेक्षकांकडून केले जाते तेवढेच पर्यवेक्षण एन.एस.एस. ओ. कडील अधिकाऱ्यामार्फत केले जाते. अशा प्रकारच्या उपलब्ध होणाऱ्या माहितीचे आधारे अभ्यास करून पिकांचे आकडेवारीत सुधारणा घडवून आणण्याच्यादृष्टीने दरवर्षी होणाऱ्या उच्चस्तरीय समितीमध्ये चर्चा केली जाते व उपाययोजना सूचविली जाते.

योजनेचा मुख्य उद्देश पटवाऱ्यांनी पीक पाहणीत नोंदविलेले क्षेत्र तसेच मंडळ निरीक्षक व ग्रामसेवक यांनी केलेल्या पीक कापणी प्रयोगाची शास्त्रशुध्द पूर्व नियोजित पद्धतीने पर्यवेक्षण करून आकडेवारी मिळविणे व पर्यवेक्षणातून उपलब्ध होणाऱ्या माहितीच्या आधारे प्रमुख पीकांचे क्षेत्रफळाबाबतचे व उत्पन्नाचे अंदाज तयार करण्याच्या पद्धतीमध्ये व आकडेवारीमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करणे.

सदरची योजना वेतनाधीन असून योजनेतील नियमित काम करणेसाठी मंजूर असलेला अधिकारी/कर्मचारीवर्ग यांचे वेतन व भत्ते भागविण्यासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते.

**भौतिक व आर्थिक लक्ष्य व साध्य**

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | २०२१-२२ | | २०२२-२३ | | २०२३-२४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य |
| १ | पर्यवेक्षिय कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग | १६ | १६ | १६ | १६ | १६ | .. |
| २ | यादृच्छिक गावांची निवड | ८८०० | ८८०० | ८८०० | ८८०० | ८८०० | .. |
| ३ | क्षेत्रीय कामाची तपासणी | | | | | | |
| | अ) क्षेत्र प्रगणन केलेली गावे | १३२० (ख+र+उ) | ११५३ | १३२० (ख+र+उ) | २४९ | १३२० (ख+र+उ) | .. |
| | ब) पीक कापणी प्रयोग | १३०० (ख+र) | ११२४ | १३०० (ख+र) | १९४ | १३०० (ख+र) | .. |
| ४ | गाव नमुना नं. ११ ची तपासणी | १३२० | ११५३ | १३२० (ख+र+उ) | २४९ | १३२० (ख+र+उ) | .. |
| ५ | आर्थिक लक्ष्य व साध्य (रु. लाखात) | २५५.०० | १२८.०६ डिसेंबर, २०२२ अखेर | २६०.०० | १७५.१९ डिसेंबर, २०२२ अखेर | २७०.०० | .. |

## (ड) महाराष्ट्र राज्यातील शेतमाल उत्पादन खर्चाचा अभ्यास करण्यासाठी कायमस्वरुपी यंत्रणा निर्माण करण्याची कायमस्वरुपी योजना (अे. पी. सी.)

**१) योजना सुरू होण्याचे वर्ष** ... सन १९७९

**२) कृषी खात्याचा सहभाग** ... सदर सर्वेक्षणासाठी त्रैवार्षिक गाव समूहाचे नियोजन करण्यासाठी लागणारी क्षेत्रविषयक माहिती गोळा करून नियोजन करणे व निरनिराळ्या कृषी विद्यापिठांसाठी निवडलेले गाव समूह सहसंचालक शेतमाल भाव समिती कक्ष यांना पाठविणे.

**३) उद्दिष्टे** ... योजनेत समाविष्ट पिकांच्या किमती किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी झाल्यास पणन संचालनालयामार्फत शेतमाल किमान आधारभूत दराने खरेदी करून शेतकऱ्यांना संरक्षण देणे.

**४) लक्ष्य** ... दर तीन वर्षांसाठी २७९ गांवाचे समूह (क्लस्टर) निवडून, निवडलेल्या पिकांचे प्रती हेक्टरी क्विंटल उत्पादन खर्च काढून केंद्रिय शेतमाल खर्च व किंमत आयोगास किमान आधारभूत किंमत ठरविण्यासाठी शिफारस करणे. सन २०२१-२२ ते २०२३-२४ या कालावधीसाठी २७९, गावसमूहांची निवड करून सहसंचालक शेतमालभाव समिती कक्ष, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

**५) साध्य** ... सन २०२१-२२ ते २०२३-२०२४ या तीन वर्षांसाठी गाव समूह निवड करण्यात आली आहे. उत्पादन खर्च काढण्यासाठी आवश्यक माहिती एकत्रित करून संकलन करण्याची कार्यवाही चालू.

**६) आर्थिक तरतूद** ... या योजनेतील मंजूर पदे कृषी खात्याच्या एक खिडकी योजनेंतर्गत विलीन झाल्यामुळे या योजनेसाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्यात येत नाही.

**७) योजनेची अंमलबजावणी** ... योजनेची अमंलबजावणी मंत्रालय स्तरावरील शेतमाल भाव समिती कक्ष, कृषी आयुक्तालय व राज्यातील चार कृषी विद्यापीठे यांचे संयुक्त सहकार्याने करण्यात येते.

## (इ) पीक सर्वेक्षण योजना--महाराष्ट्र राज्यातील पिकांच्या उत्पन्नाचा अंदाज व आढावा काढण्याची योजना

**१) योजनेची सुरूवात** ... सन १९४४.

**२) उद्दिष्टे** ...

१) जिल्हा पातळीवर व राज्य पातळीवर निरनिराळ्या पिकांच्या दर हेक्टरी सरासरी उत्पन्नाचे विश्वासार्ह अंदाज काढणे.

२) पिकांच्या पूर्वानुमानासाठी आवश्यक लागणारी बिनचूक माहिती वेळेवर उपलब्ध करणे

३) पिकांची पैसेवारी निश्चित करण्यासाठी तालुका पातळीवर ५ वर्षांची पिकांच्या सरासरी उत्पन्नाची आकडेवारी उपलब्ध करणे.

४) निरनिराळ्या पिकांसाठी निवडलेल्या गावात शेतकऱ्यांनी अवलंबिलेल्या मशागतीसंबंधी तसेच बी-बियाणे, खताचा वापर इत्यादिसंबंधी माहिती गोळा करणे.

५) पिकांची नुकसानभरपाई निश्चित करण्यासाठी मंडळ स्तरावरील ३ ते ५ वर्षांची सरासरी उत्पन्नाची आकडेवारी उपलब्ध करणे.

६) पीक विमा योजनेसाठी चालू वर्षाची पिकांची दर हेक्टरी सरासरी उत्पन्नाची माहिती कळविणे.

**३) समाविष्ट पिके** ... सध्या या पद्धतीचा वापर करून राज्यातील खालील पिकांवर राज्यव्यापी पीक कापणी प्रयोग घेण्यात येत आहेत.

(१) भात (२) बाजरी (३) खरीप ज्वारी (४) रागी (नाचणी) (५) रब्बी ज्वारी (६) गहू (७) हरभरा (८) कापूस (९) ऊस (१०) तंबाखू (११) भुईमूग (१२) तूर (१३) तीळ (१४) जवस (१५) खुरासणी (१६) करडई (१७) सूर्यफुल (१८) मका (१९) उन्हाळी भात (२०) उन्हाळी सूर्यफुल (२१) उन्हाळी भुईमूग (२२) मूग (२३) उडीद (२४) सोयाबीन, (२५) र. तीळ (२६) र. सूर्यफूल (२७) र. मका.

**४) साध्य** ... सन २०२१-२२ मध्ये खरीप हंगामात ७१०७२ रब्बी हंगामात २९९४६ व उन्हाळी हंगामात ३२८४ असे एकूण ९९३०२ पीक कापणी प्रयोग घेण्यात आले. तर सन २०२२-२३ या खरीप हंगामात ८८५१९, रब्बीमध्ये ३१४०९ तर ४५९६ उन्हाळी हंगामात असे एकूण १२४५२४ एवढ्या प्रयोगांचे आयोजन केले आहे.

**५) आर्थिक तरतूद** ... योजनेसाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्यात येत नाही तथापि मजुरी या शिर्षाखाली (डी-३००१) संचालन व प्रशासन, (००) (०१) कृषी आयुक्तालय (२४०१ ०१३६) या लेखाशिर्षाखाली रु. १३.४० लाख एवढी आर्थिक तरतूद सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी करण्यात आली आहे.

## (फ) प्रधानमंत्री पीक विमा योजना

खरीप हंगाम २०१६ पासून प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे.

**योजनेत समाविष्ट पिके**

**अन्नधान्य (तृणधान्य व कडधान्य) :** खरीप व उन्हाळी भात, खरीप व रब्बी ज्वारी (जिरायत व बागायत) बाजरी, गहू, (बागायत) नाचणी, मका, तूर, मूग, उडीद, हरभरा.

**गळीत धान्य :** कारळे, खरीप व उन्हाळी भूईमूग, तीळ, सोयाबीन

**नगदी पिके :** कापूस व कांदा.

**योजनेचा उद्देश :**

१. नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे.

२. शेतकऱ्यांना नाविन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामुग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे.

३. पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे.

४. कृषी क्षेत्रासाठीच्या पतपुरवठ्यात सातत्य राखणे.

**योजनेची वैशिष्ट्ये :**

१. कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे.

२. खातेदारांचे व्यतिरिक्त कुळांसाठी सुद्धा ही योजना खुली ठेवण्यात आलेली आहे.

३. विमा संरक्षित रक्कम ही प्रत्येक पिकाच्या मंजूर कर्ज मर्यादेइतकी राहील.

४. शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता दर हा खरीप हंगाम २ टक्के व रब्बी हंगाम १.५ टक्के व नगदी पिकांसाठी ५ टक्के असा मर्यादित ठेवण्यात आला आहे.

५. या योजने अंतर्गत ७० टक्के जोखिमस्तर देय राहील.

६. अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांचे उंबरठा उत्पन्न हे मागील ७ वर्षापैकी सर्वाधिक उत्पन्नाचे ५ वर्षाचे सरासरी उत्पन्न गुणीले त्या पिकाचा जोखिमस्तर विचारात घेऊन निश्चित केले जाईल.

७. खरीप व रब्बी २०२२-२३ हंगामासाठी राज्यात (Cup and cap Model (80:110) राबविण्यात येत आहे.

**योजनेत सहभागी शेतकरी :**

अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित पिके घेणारे (कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसह) सर्व शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजना ऐच्छिक राहील.

**प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत मागील तीन वर्षातील योजनेचे आर्थिक लक्ष्य व साध्य (राज्य शासन हिस्सा)**

| प्रधानमंत्री पीक विमा वर्ष | अनुदान (रु. लाख) लक्ष्य (राज्य हिस्सा) | अनुदान (रु. लाख) साध्य | योजनेचे आर्थिक लक्ष्य व साध्य मंजूर नुकसानभरपाई रक्कम (रु. लाख) |
|---|---|---|---|
| २०१९-२० | २३४५८४.१६ | २३४५८४.१६ | ५५३७२८.०० |
| २०२०-२१ | १७४५६७.४१ | १७४५६७.४१ | *१११६३५.०० |
| २०२१-२२ | १९९९९९.९९ | १९९९९९.९९ | *३४८४३२.०१ |
| २०२२-२३ | १९८०३०.७२ | १९८०३०.७२ | २७६०९४.७४ |

*अंतरिम दि. ०१-०२-२०२३ अखेर

**मागील तीन वर्षातील योजनेचे भौतिक साध्य**

| हंगाम | अधिसूचित पीक तालुके | अधिसूचित पीक मंडळ |
|---|---|---|
| खरीप - २०१९ | २५३ | १०९५२ |
| रब्बी - २०१९-२०२० | २९५ | २९०६ |
| *खरीप - २०२० | १८८ | १०१५९ |
| रब्बी - २०२०-२०२१ | ३८५ | ४३३१ |
| खरीप - २०२१ | १८६ | १०९४८ |
| रब्बी - २०२१-२०२२ | ३९१ | ४६५१ |
| खरीप - २०२२ | १८९ | ११०८० |
| रब्बी - २०२२-२०२३ | ३९१ | ४६९६ |

## (ज) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना

शेती व्यवसाय करतांना होणारे अपघात तसेच वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, जनावरांच्या चावण्यामुळे (रेबीज) मृत्यू, वाहन अपघात व इतर कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, तसेच नक्षली हल्ले, दंगल यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांचा मृत्यू ओढवतो किंवा अपंगत्व येते. घरातील कर्त्या व्यक्तिस झालेल्या अपघातामुळे कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होऊन अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघातग्रस्त शेतकऱ्यांस/त्याच्या कुटुंबास लाभ देण्याच्या दृष्टीने शासनाने गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सन २०१५-२०१६ पासून सुरू केली आहे.

सन २०१८-१९ मध्ये दिनांक ०८ डिसेंबर २०१८ ते ०७ डिसेंबर २०१९ या कालावधीसाठी ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि. पुणे यांचेकडे रु. ४७.२६ कोटी विमा हप्ता रक्कम भरण्यात आली असून योजनेची अंमलबजावणी पूर्ण झालेली आहे.

सन २०१९-२० मध्ये दिनांक १० डिसेंबर २०१९ ते ०९ डिसेंबर २०२० या कालावधीत युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स लि. यांचेकडे रु. ९७.९८ कोटी विमा हप्ता रक्कम भरण्यात आली असून योजनेची अंमलबजावणी सुरू आहे.

सन २०२१-२२ मध्ये दि. ७ एप्रिल, २०२१ ते ६ एप्रिल, २०२२ या कालावधीत युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स लि. यांचेकडे रु. ८८.३७ कोटी विमा हप्ता रक्कम भरण्यात आली असून योजनेची अंमलबजावणी सुरू आहे.

**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचा सन २०१५-१६ पासून प्रगती अहवाल पुढीलप्रमाणे आहे (माहे डिसेंबर, २०२२ अखेर)**

| वर्ष | विमा कंपनीचे नाव | प्राप्त दावे | मंजूर दावे | कार्यवाहीत | नामंजूर | अपूर्ण प्रस्ताव |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१८-१९ | ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि., पुणे | ३८५७ | २८३६ | .. | ९९४ | .. |
| २०१९-२० | दि युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी लि. | ६११८ | ४२७४ | १७ | १४०३ | ४२७ |
| २०२१-२२ | दि युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी लि., नवी मुंबई | ६५४६ | ३३१६ | १५९ | ११३१ | १९४० |

-----------------

# जागतिक कृषी गणना (१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना)

**१. प्रास्ताविक**

जागतिक कृषी गणना हा राष्ट्रीय कार्यक्रम महाराष्ट्र राज्यांत १९७०-७१ मध्ये सुरू करण्यात आला. दर पाच वर्षांनी कृषी गणना करण्यात येते. महाराष्ट्रात आतापर्यन्त एकूण १० कृषी गणनेचे काम करण्यात आलेले आहे.

सन २०१५-२०१६ मध्ये घेण्यात आलेली कृषी गणना ही महाराष्ट्रातील १० वी कृषी गणना आहे. केंद्र शासनाचे नियत वेळापत्रकानुसार अकरावी कृषी गणना २०२०-२१ चे काम जुलै २०२१ पासून सुरू होणार होती. तथापि, कोरोना प्रादुर्भावामुळे २०२०-२१ मधील कृषी गणना सन २०२१-२२ मध्ये राबविण्यात येत आहे. कृषी गणनेमध्ये महसूल खात्यातील गाव पातळीवरील भूमि अभिलेख्यांच्या सर्व नोंदीनुसार संकलन करून पुनर्वर्गीकरण केले जाते. यासाठी वहिती खाते हा घटक धरण्यात येतो.

शेतीच्या रचनेचे स्वरूप व स्थिती यासंबंधी वहिती खाते घटक धरुन राज्यातील सर्व वहिती खात्यांची **एका ठराविक वर्षासाठी सांख्यिकीय पध्दतीने माहिती गोळा करण्याचा शासन प्रणित उपक्रम म्हणजे कृषी गणना होय.** कृषी गणनेची खालीलप्रमाणे उद्दिष्टे आहेत.

१) शेतीची रचना आणि शेतीच्या संबंधी वहिती खात्याच्या विशेष बाबीमधील खातेदारांची संख्या व जमिनीचा वापर, पशुधन, कृषी यंत्रसामुग्री आणि औजारे, रासायनिक खतांचा वापर इ. सांख्यिकीय आकडेवारीचा तपशील देणे.

२) नवीन कृषी विकास कार्यक्रम तयार करण्यासाठी आणि सदर कार्यक्रमाचे मूल्यमापनासाठी आवश्यक असलेले मूल्यस्थिर चिन्ह (बेंचमार्क) आकडेवारी देणे.

३) भविष्यात कृषी सर्वेक्षण घेण्यासंबंधात कुटुंबे व वहिती खाते यांचा मूलभूत साचा पुरविणे.

४) चालू कृषी सांख्यिकीय योजनेचा विस्तार करण्यासाठी पायाभूत आकडेवारी पुरविणे.

५) लघुक्षेत्र धारकांच्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांच्या कृषिविषयक प्रगतीच्या योजना आखणे.

६) जिल्हावार विकासाकरिता दीर्घ मुदतीच्या नियोजनासाठी अंमलात आणावयाचे धोरण ठरविणे.

कृषी गणना २०१०-२०११ प्रमाणेच कृषी गणना २०१५-२०१६ चे काम करण्यात आले आहे. यामध्ये राज्यातील गावांमधील वहिती खातेदार, वहिती क्षेत्र व त्यांचे आकारमान गटाप्रमाणे तसेच सामाजिक गटनिहाय माहिती विहित प्रपत्रात गोळा केली जाते. नमुना पध्दतीच्या कृषी गणनेसाठी २० टक्के निवडलेल्या गावातून वहिती खातेदारनिहाय विखुरलेले वहिती क्षेत्र वहिवाटीनुसार वहिती क्षेत्र तसेच जमिनीच्या वापरानुसार वर्गीकरण व पिकवार क्षेत्राची माहिती गोळा केली जाते. इनपूट सर्व्हेसाठी राज्यात ७ टक्के निवडलेल्या प्रत्येक गावातून निवडलेले २० वहिती खातेदार वापर करीत असलेले बी-बियाणे, खते, औषधे तसेच अवजारे, यंत्रे व घेतलेले कर्ज यासंबंधी माहिती गोळा केली जाते.

कृषी गणनेचे काम महसूल विभागामार्फत करण्यात येते. त्याप्रमाणेच कृषी गणना २०१५-१६ चे काम महसूल विभागामार्फत करण्यात आले आहे. व तद्नंतर इनपूट सर्व्हे २०१६-१७ चे काम कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

**२. वित्तीय आवश्यकता** :- (आकडे लाखांत)

| सन २०२०-२१ मध्ये प्रत्यक्ष झालेला खर्च | सन २०२१-२२ मध्ये प्रत्यक्ष झालेला खर्च | सन २०२२-२३ मध्ये अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १३२.११ | १२५.९० | ३६५.०० |

**३. कार्यक्रमाच्या कार्यभाराचा गोषवारा व वित्तीय आवश्यकतेचे स्पष्टीकरण :--**

कार्यालयीन खर्च, प्रवास भत्ता, वेतन, इंधन, प्रशिक्षणे याव्यतिरिक्त कृषी गणनेचे काम करण्यासाठी सूचनापुस्तिका व प्रपत्रे छपाई व वितरण करणे तसेच कृषी गणनेच्या कामाप्रित्यर्थ क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांना मानधनाचे वाटप करणे इत्यादी यासाठी निधीची आवश्यकता असते.

**४. कर्मचारीविषयक गोषवारा :--**

सदर योजनेमध्ये १३ मंजूर पदे असून मंजूर पदांची नावे वेतनश्रेणी व संख्या पुढीलप्रमाणे :--

| अ.क्र | पदनाम | | वेतनश्रेणी | मंजूर पदे |
|---|---|---|---|---|
| १ | उप आयुक्त, कृषी गणना (एम.ए.एस.वर्ग-१) (सहसंचालकाचे पदावनत केलेले पद) | ... | एस्-२३ रु. ६७७००-२०८७०० | १ |
| २ | सांख्यिक, कृषी गणना (एम.ए.एस.वर्ग-१) | ... | एस्-२० रु. ५६१००-१७७५०० | १ |

| अ.क्र | पदनाम | | वेतनश्रेणी | मंजूर पदे |
|---|---|---|---|---|
| ३ | तंत्र अधिकारी (सांख्यिक) (एम.ए.एस.वर्ग-२) | ... | एस्-१६ ४४९००-१४२४०० | १ |
| ४ | वरिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (वर्ग-२) कनिष्ठ | ... | एस्-१५ ४१८००-१३२३०० | १ |
| ५ | सांख्यिकी पर्यवेक्षक (वर्ग-३) | ... | एस्-१३ ३५४००-११२४०० | २ |
| ६ | सहाय्यक अधीक्षक (वर्ग-३) | ... | एस्-१३ ३५४००-११२४०० | १ |
| ७ | वरिष्ठ लिपिक / लघु टंकलेखक, गट-क | ... | एस्-८ २५५००-८११०० | १ |
| ८ | लघुलेखक (उच्चश्रेणी) (वर्ग-३) | ... | एस्-१५ ४१८००-१३२३०० | १ |
| ९ | लिपिक गट-क (वर्ग-३) | ... | एस्-६ १९९००-६३२०० | १ |
| १० | वाहनचालक गट-क | ... | एस्-६ १९९००-६३२०० | १ |
| ११ | शिपाई गट-ड | ... | एस्-१ १५०००-४७६०० | २ |
| | | | **एकूण** | **१३** |

**वहिती खातेदार व वहिती क्षेत्राबाबतची माहिती -** सन १९७६-७७ ते २०१५-१६ पर्यंत

| आकारमान गट | वहिती खातेदार व वहिती क्षेत्राबाबतची माहिती | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वहिती खातेदार संख्या (लाखात) वहिती क्षेत्र (लाख हेक्टर) | | | | | | | | |
| | १९७६-१९७७ | १९८०-१९८१ | १९८५-१९८६ | १९९०-१९९१ | १९९५-१९९६ | २०००-२००१ | २००५-२००६ | २०१०-२०११ | २०१५-२०१६ |
| अत्यल्प खातेदार | १५.०५ | १९.२६ | २४.८८ | ३२.७५ | ४२.६६ | ५३.०६ | ६१.१८ | ६७.०९ | ७८.१५ |
| (० ते ०.९९ हेक्टर पर्यंत) क्षेत्र | ७.०६ | ९.७३ | १२.३२ | १६.१८ | २०.८७ | २६.४७ | २८.०१ | ३१.८६ | ३४.४९ |
| अल्प खातेदार | ११.४२ | १५.४१ | २१.०४ | २७.२८ | ३१.७६ | ३६.०६ | ४१.५० | ४०.५२ | ४३.३९ |
| (१.०० ते १.९९ हेक्टर पर्यंत) क्षेत्र | १६.७६ | २३.३४ | ३१.३५ | ३९.८३ | ४६.०६ | ५१.२७ | ५२.४८ | ५७.३९ | ५७.७१ |
| अंशत: मध्यम खातेदार | १३.३९ | १६.८६ | १९.५७ | २१.२६ | २१.५२ | २२.७४ | २४.५२ | २१.५९ | २३.२७ |
| (२.०० ते ३.९९ हेक्टर पर्यंत) क्षेत्र | ३८.३३ | ४८.१८ | ५५.२० | ५८.८० | ५८.७२ | ६१.०९ | ६१.३० | ५७.६५ | ६०.२६ |
| मध्यम खातेदार | १३.५२ | १३.९२ | १३.१७ | ११.७१ | ९.४३ | ८.६५ | ९.२५ | ७.१० | ७.३४ |
| (४.०० ते ९.९९ हेक्टर पर्यंत) क्षेत्र | ८३.३८ | ८४.४९ | ७८.६२ | ६८.५६ | ५४.३६ | ४८.८० | ४८.८५ | ३९.९३ | ४०.९९ |
| मोठा खातेदार | ४.२६ | ३.१८ | २.३६ | १.७१ | १.१६ | ०.८७ | ०.७० | ०.६८ | ०.६९ |
| (१०.०० हेक्टर व त्यापेक्षा अधिक) क्षेत्र | ६५.५२ | ४७.८८ | ३६.०३ | २५.८८ | १८.७९ | १३.३८ | ९.४१ | १०.८४ | ११.६१ |
| एकूण खातेदार | ५७.६४ | ६८.६३ | ८१.०२ | ९४.७१ | १०६.५३ | १२१.३८ | १३७.१५ | १३६.९८ | १५२.८५ |
| एकूण वहिती क्षेत्र | २११.०५ | २१३.६२ | २१३.५२ | २०९.२५ | १९८.८० | २०१.०१ | २००.०५ | १९७.६७ | २०५.०६ |

## २०१५-२०१६ च्या कृषी गणनेनुसार राज्य पातळीवरील संक्षिप्त माहिती खालीलप्रमाणे आहे

(आकडे लाखात)

| अ.क्र. | बाब | | क्षेत्र (हे. आर.) | टक्केवारी | खातेदार (संख्या) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ |
| **१** | **एकूण वहिती** | ... | २०५.०६ | .. | १५२.८५ | .. |
| | अ) निव्वळ पेरलेले | ... | १७९.५५ | ८७.५६ | .. | .. |
| | ब) चालू पड | ... | १४.७६ | ७.२० | .. | .. |
| | **निव्वळ पिकाखालील** | ... | १९४.३४ | ९४.७७ | .. | .. |
| | क) पिकाखाली नसलेले | ... | १०.७२ | ५.२३ | .. | .. |
| | ड) गैर कास्तकारी | ... | N.A. | N.A. | .. | .. |
| **२** | **ओलिताखालील** | ... | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ. ना. |
| | अ) पूर्णत: ओलित | ... | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ. ना. |
| | ब) अंशत: ओलित | ... | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ. ना. |
| **३** | **विहिरीखालील ओलित** | ... | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ. ना. |
| **४** | **वापरातील विहिरींची संख्या** | ... | उ. ना. | .. | .. | .. |
| | अ) मोटारपंप असलेल्या विहिरींची संख्या | ... | उ. ना. | उ. ना. | .. | .. |
| | ब) डिझेलपंप असलेल्या विहिरींची संख्या | ... | उ. ना. | उ. ना. | .. | .. |
| | क) पंप संच नसलेल्या विहिरींची संख्या | ... | उ. ना. | उ. ना. | .. | .. |
| **५** | **एकूण पिकाखालील** | ... | २२८.१३ | .. | २५०.९४ | .. |
| | **१) एकूण खाद्यपिके** | ... | १३९.१४ | ६०.९९ | १६३.६९ | ६५.२३ |
| | अ) तृणधान्य | ... | ७९.८८ | ३५.०१ | ८५.४३ | ३४.०४ |
| | ब) कडधान्य | ... | ३५.४९ | १५.५६ | ५२.८० | २१.०४ |
| | क) इतर | ... | २३.७७ | १०.४२ | २५.४६ | १०.१४ |
| | **२) एकूण अखाद्यपिके** | ... | ८८.९९ | ३९.०१ | ८७.२५ | ३४.७७ |
| | **३) प्रमुख खाद्यपिके** | ... | .. | .. | .. | .. |
| | १) ज्वारी | ... | ३३.६७ | १४.७६ | ३२.६९ | १३.०२ |
| | २) तांदूळ | ... | २०.९१ | ९.१७ | १६.३२ | ६.५० |
| | ३) गहू | ... | ८.७२ | ३.८२ | ७.७८ | ३.१० |
| | ४) हरभरा | ... | १४.७१ | ६.४५ | १२.५६ | ५.०१ |
| | ५) तूर | ... | १२.९६ | ५.६८ | २६.५० | १०.५६ |
| **६** | **खात्याच्या वर्गीकरणानुसार** | | एकूण व. क्षेत्र | | एकूण व. खातेदार | |
| | **१) वहिती खातेदार** | | २०५.०६ | | १५२.८५ | |
| | अ) वैयक्तिक खाती | ... | १९३.०६ | ९४.१४ | १४४.९८ | ९४.८५ |
| | ब) संयुक्त खाती | ... | १०.९३ | ५.३३ | ७.५९ | ४.९६ |
| | क) संस्थेची खाती | ... | १.०७ | ०.५३ | ०.२८ | ०.१९ |
| | **२) भू-आकारमान गटनिहाय** | | | | | |
| | अ) अत्यल्प भू-धारक | ... | ३४.४९ | १६.८१ | ७८.१६ | ५१.१३ |
| | ब) अल्प भू-धारक | ... | ५७.७१ | २८.१४ | ४३.३९ | २८.३९ |
| | क) इतर | ... | ११२.८६ | ५५.०४ | ३१.३१ | २०.४८ |
| | **३) सामाजिक गटनिहाय** | | | | | |
| | अ) अनुसूचित जाती | ... | १२.७९ | ६.२४ | १०.३० | ६.७४ |
| | ब) अनुसूचित जमाती | ... | १५.१० | ७.३६ | ८.५६ | ५.६० |
| | क) इतर | ... | १७६.१० | ८५.८७ | १३३.७१ | ८७.४७ |
| | ड) संस्था | ... | १.०७ | ०.५३ | ०.२८ | ०.१९ |

उ. ना. उपलब्ध नाही.

# राज्याच्या कृषी विस्तार कार्यक्रमांना विस्तारविषयक सुधारणांकरिता सहाय्य (आत्मा)

आत्मा यंत्रणांना कृषी विस्ताराच्या नावीन्यपूर्ण बाबी राबविण्याकरिता विकेंद्रीत नियोजन व अंमलबजावणीसाठी मुभा देणेत आली आहे. सोबतच जिल्ह्याचा यथार्थदर्शी संशोधन व विस्तार आराखडा (SREP) तयार करणे, गरजेवर आधारित "Carfeteria" कृति कार्यक्रमही ठरवून देण्यात आला आहे. त्यात याथार्थदर्शी संशोधन व विस्तार आराखडा (SREP) तयार करणे, शेतकरी प्रशिक्षण, प्रात्याक्षिके, शेतकरी अभ्यास दौरे, शेतकरी गट संघटन, शेतकरी-शास्त्रज्ञ सुसंवाद आणि शेतीशाळा अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे. हे उपक्रम ठरवून देताना त्यासाठी गरजेनुरुप विषय निवडीचे स्वातंत्र्य आत्मा संस्थांना आहे.

महाराष्ट्रातील शेती स्पर्धाक्षम व्हावी, शेतकऱ्यांच्या शेती उत्पादनाची कार्यक्षमता वाढावी, या कामी विविध संशोधन संस्था, कृषी विद्यापीठे, प्रयोगशील शेतकरी यांचे सहकार्य लाभावे, उत्पादन वाढीसोबत उत्पन्न वाढावे आणि हे साध्य करण्यासाठी सक्षम, संवेदनशील, सहभागी कृषी विस्तार यंत्रणा उभी रहावी तसेच संशोधन, कृषी व संलग्न विभाग आणि शेतकऱ्यांमध्ये कार्यक्षम समन्वय प्रस्थापित करावयाची कार्यवाही करणेत येत आहे. शेतकऱ्यांच्या गटांचे रुपांतर शेतकरी उत्पादक संघ (FPO)/ शेतकरी उत्पादक कंपन्यांमध्ये (FPCs) होऊन स्वयंपूर्ण, सशक्त शेतकरी वर्ग निर्माण व्हावा, पर्यायाने कृषी उत्पादन व निव्वळ उत्पन्नात वाढ करणे हा आत्मा संस्था स्थापनेमागचा मूळ उद्देश आहे.

(रु. लाखात)

| अ.क्र. | वर्ष | मंजूर कार्यक्रम | शिल्लक | उपलब्ध निधी | खर्च झालेला निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०२०-२१ | रु. १२७२८.१७<br>(केंद्र-७३७६.५९)<br>(राज्य - ५३५१.५८) | १ एप्रिल, २०२० रोजी<br>**एकूण-१००८.२३**<br>(केंद्र-६०४.९४)<br>(राज्य- ४०३.२९) | ..<br>**एकूण-७३०१.२५**<br>(केंद्र- ४३८०.७५)<br>(राज्य- २९२०.५०) | (मार्च २०२१)<br>**एकूण-४९७३.९५**<br>(केंद्र- २९१९.६४)<br>(राज्य- २०५४.३१) |
| २ | २०२१-२२ | रु. १२५१२.१३<br>**(केंद्र-७२४६.९६)**<br>(राज्य - ५२६५.१७) | **एकूण-४०८५.१०**<br>(केंद्र-२१३०.५४)<br>(राज्य-१९५४.५६) | **एकूण- ३६००.८३**<br>(केंद्र-२२३५.००)<br>(राज्य-१३६५.८३) | (मार्च २०२२ अखेर)<br>**एकूण-५६६२.५१**<br>(केंद्र-३३१३.५०)<br>(राज्य-२३४९.०१) |
| ३ | २०२२-२३ | रु. १५३१८.१८<br>(केंद्र-८९३०.५९)<br>(राज्य - ६३८७.५९) | **एकूण-२०८२.८६**<br>(केंद्र-१०८७.३८)<br>(राज्य- ९९५.४८) | **एकूण-३२९०.८५**<br>(केंद्र- १९००.००)<br>(राज्य- १३९०.८५) | (जानेवारी २०२३ अखेर)<br>**एकूण-४४४७.४९**<br>(केंद्र- २६३५.९४)<br>(राज्य- १८११.५५) |

## गट शेतीस प्रोत्साहन व सबलीकरणासाठी शेतकऱ्यांच्या गट शेतीस चालना देणे (१०० टक्के राज्य पुरस्कृत योजना) (लेखाशिर्ष- २४०१ अे ७८२)

**१) योजनेची माहिती व उद्देश :**

सन २०२२ पर्यंत राज्यातील शेतकऱ्यांचे उत्पन दुप्पट करण्याच्या केंद्र शासनाच्या दृष्टीकोनास अनुसरुन पुरक उत्पादन वाढविण्यासाठी निविष्ठा, प्रशिक्षण, सिंचन, यांत्रिकीकरण, काढणीपश्चात तंत्रज्ञान, कृषिमाल प्रक्रिया व पणन यासाठी सामुहिक स्वरूपाची व्यवस्था निर्माण करणे. राज्यातील शेतकऱ्यांची जमिनधारणा कमी असल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादनात भरीव वाढ होण्यासाठी सामुहिक शेती, शेती करण्याची आधुनिक पद्धती व काटेकोर नियोजन याचा अवलंब करणे. एका समुहातील शेतकऱ्यांनी एकत्र येवून शिवारातील संलग्न भौगोलिक क्षेत्रामध्ये सामुहिकरित्या नियोजनबद्ध शेती करणे. त्यादृष्टीने शेतकरी गटांमार्फत उत्पादक कंपनीमार्फत गट शेतीस प्रोत्साहन देणे या योजनेंतर्गत सन २०१७-१८ व २०१८-१९ मध्ये निवड करण्यात आलेल्या शेतकरी गट/उत्पादक कंपन्यांना विविध उपक्रम राबविण्यासाठी अनुदान देण्यात येत आहे. या योजने अंतर्गत प्रति शेतकरी गटास रु. १.०० कोटी पर्यंत अनुदान देय आहे.

**२) वित्तीय आवश्यकता :**

| | |
|---|---|
| सन २०२०-२१ मधील प्रस्तावित मागणी - | रुपये २४०८३.४४ लाख |
| सन २०२०-२१ मधील मंजूर तरतूद - | रुपये ११०००.०० लाख |
| सन २०२०-२१ मधील उपलब्ध निधी - | रुपये ४१२५.०० लाख |
| सन २०२०-२१ मधील खर्च - | रुपये ४१२५.०० लाख |
| सन २०२०-२१ मधील सर्मपित निधी - | रुपये ०.०० लाख |
| सन २०२१-२२ वर्षातील प्रस्तावित मागणी | रुपये ३५३४२.५१ लाख |
| सन २०२१-२२ मधील मंजूर तरतूद | रुपये ७५००.०० लाख |
| सन २०२१-२२ वर्षात प्राप्त निधी | रुपये ४२६३.५४ लाख |
| सन २०२१-२२ मधील खर्च निधी<br>(मागील उर्वरित कार्यक्रमासाठी)<br>**(Spillover Programme)** | रुपये २८७७.९३ लाख |
| सन २०२१-२२ मधील सर्मपित निधी - | रुपये १३८५.६१ लाख |
| सन २०२२-२३ वर्षातील प्रस्तावित मागणी | रुपये ७५००.०० लाख |
| सन २०२२-२३ मधील मंजूर तरतूद | रुपये ३५००.०० लाख |
| सन २०२२-२३ वर्षात प्राप्त निधी | रुपये ................ लाख |
| सन २०२२-२३ मधील खर्च निधी | रुपये ................ लाख |
| **(Spillover Programme proposed new scheme)** | |
| सन २०२३-२४ मधील प्रस्तावित मागणी | रुपये १३०००.०० लाख |
| **(Spillover Programme proposed new scheme)** | |

## वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था

**१) योजनेची माहिती व उद्देश :**

राज्यातील कृषी विकासाच्या कार्यक्रमाचे महत्त्व लक्षात घेऊन कृषी आणि कृषि संलग्न विभागाशी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने नागपूर येथे वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था दिनांक १ जुलै, १९९२ पासून कार्यान्वित करण्यात आली. दिनांक २९ मे, १९९८ च्या शासन निर्णयान्वये कृषी विभागाची पुनर्रचना करण्यात आली. या शासन निर्णयान्वये वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था ही राज्यातील शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून घोषित करण्यात आली.

वनामती ही शिखर संस्था एक अग्रणी आणि नामांकित प्रशिक्षण संस्था म्हणून तातडीने विकसित करून यशदा, पुणे तथा मॅनेज, हैद्राबाद या अग्रगण्य संस्थांच्या धर्तीवर कार्यान्वित होण्यासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. वनामती नागपूर व तिच्या सात संलग्न प्रशिक्षण संस्था (नागपूर, औरंगाबाद, अमरावती, नाशिक, कोल्हापूर, खोपोली व पुणे) करिता इमारतीचे बांधकाम, नूतनीकरण, वसतिगृह तसेच साधनसामग्री इ. बाबींसाठी वनामती नागपूर यांना या योजनेंतर्गत सहायक अनुदान उपलब्ध करून देण्यात येते.

**वित्तीय आवश्यकता**

| | |
|---|---|
| सन २०२०-२१ मधील मंजूर तरतूद | रु. ६०० लाख |
| सन २०२०-२१ मधील उपलब्ध तरतूद | -- |
| सन २०२१-२२ मधील मंजूर तरतूद | रु. ६०० लाख |
| सन २०२१-२२ मधील उपलब्ध तरतूद | -- |
| सन २०२२-२३ मधील मंजूर तरतूद | रु. ६०० लाख |
| सन २०२२-२३ मधील उपलब्ध तरतूद | -- |
| सन २०२३-२४ मधील प्रस्तावित मागणी | रु. ८५६९.९९ लाख |

## राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत अधिकारी, क्षेत्रिय कर्मचारी तसेच आत्मा समिती सदस्यांच्या प्रशिक्षणांचा व क्षमताबांधणीचा कार्यक्रम वनामती व रामेती येथे राबविणे (पूर्वीची कृषी प्रशिक्षण संस्थांचे बळकटीकरण करणे ही योजना)

**१) योजनेची माहिती व उद्देश :**

कृषी विभागातील मानवी साधनसंपत्तीचा आधुनिक कृषी तंत्रज्ञान प्रसारासाठी प्रभावी वापर होण्याच्या दृष्टीने अधिकारी/कर्मचारी यांचे व्यावसायिक ज्ञान वाढविणे आणि त्यादृष्टीने आवश्यक सोई-सुविधांचा विस्तार करून प्रशिक्षण संस्था बळकट करणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. राज्यातील कृषी विकासाच्या कार्यक्रमाचे महत्त्व लक्षात घेवून कृषि आणि कृषी संलग्न विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने **नागपूर येथील राज्यस्तरीय शिखर संस्था वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था आणि तिच्या सात संलग्न प्रादेशिक कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था** अनुक्रमे नागपूर, पुणे, औरंगाबाद, अमरावती, कोल्हापूर, नाशिक व खोपोली या ठिकाणी राज्यात कार्यरत आहेत. या आठही प्रशिक्षण संस्थांद्वारे कृषी आणि कृषी संलग्न विषयाचे प्रशिक्षणविषयक कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी तसेच गरजेनुरूप प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये फेरबदल करून राज्याच्या कृषी-विषयक प्रशिक्षण गरजा विचारात घेऊन या आठही कृषी प्रशिक्षण संस्थांमध्ये विविध प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात येते. ही योजना राज्यात सन २०००-२००१ पासून राबविण्यात येत असून सन २०१३-१४ पासून सदरची योजना राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत राबविण्यात येत आहे.

**२) वित्तीय आवश्यकता**

| | | |
|---|---|---|
| सन २०१९-२० वर्षातील मंजूर तरतूद | : | रुपये ७४९.०० लाख |
| सन २०१९-२० मधील खर्च | : | रुपये ६६६.०६ लाख (८२.९४ शिल्लक) |
| सन २०२०-२१ मधील उपलब्ध निधी | : | ०.०० |
| सन २०२०-२१ मधील खर्च | : | रुपये ८२.९४ लाख (सन २०१९-२० मधील शिल्लक निधी) |
| सन २०२१-२२ प्रस्तावित मागणी | : | रुपये ७५५.९२ लाख (सन २०२१-२२ मध्ये प्रकल्प मंजूर नाही.) |
| सन २०२२-२३ वर्षातील मंजूर तरतूद | : | रुपये ६२६.५५ लाख |
| सन २०२२-२३ मधील उपलब्ध निधी | : | रुपये ६२६.५५ लाख |
| सन २०२२-२३ मधील खर्च | : | रुपये २३४.१० लाख (माहे डिसेंबर, २०२२) |

## राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत तांत्रिक प्रशिक्षणासाठी शासकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे

**१) योजनेची माहिती व उद्देश :**

राज्य शासन सेवेत सर्वस्तरावर कार्यक्षमता वाढवून गतिमान प्रशासन होण्याकरिता राज्यातील सर्व स्तरावर प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्यासाठी दिनांक २३-९-२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरण जाहीर केले आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र. २.२ नुसार विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना तांत्रिक प्रशिक्षण देण्याची जबाबदारी संबंधित विभागावर सोपविण्यात आली आहे. त्यानुषंगाने राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत तांत्रिक प्रशिक्षणासाठी शासकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे ही योजना राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत कृषि विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांशी संबंधित तांत्रिक बाबींचे प्रशिक्षण देण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येतो.

**२) वित्तीय आवश्यकता :**

| | |
|---|---|
| सन २०२०-२१ वर्षातील मंजूर तरतूद | रुपये १००.०० लाख |
| सन २०२०-२१ मधील उपलब्ध निधी | रुपये ३७.५० लाख |
| सन २०२०-२१ मधील खर्च | रुपये ३७.५० लाख |
| सन २०२१-२२ (मंजूर तरतूद) | रुपये १००.०० लाख |
| सन २०२१-२२ मधील उपलब्ध निधी | योजना स्थगित |
| सन २०२२-२३ मधील मंजूर तरतूद | रुपये ५००.०० लाख |
| सन २०२२-२३ मधील उपलब्ध निधी | रुपये ४३०.०० लाख |
| सन २०२२-२३ मधील खर्च निधी | रुपये ४२८.६५ लाख (माहे डिसेंबर २०२२ अखेर) |
| सन २०२३-२४ मधील प्रस्तावित मागणी | रुपये ५४२.४० लाख |

## तालुका बीजगुणन प्रक्षेत्र १०० टक्के राज्य पुरस्कृत योजना (२४०१ ०२६१ अनिवार्य)

**१) प्रस्तावना व उद्देश :**

राज्यामध्ये एकूण १८३ तालुका बीज गुणन प्रक्षेत्रे आहेत. तसेच आन्विक्षा-नि-प्रात्याक्षिके प्रक्षेत्रे ९ आहेत. असे एकंदर १९२ प्रक्षेत्रे आहेत.

निरनिराळ्या अन्नधान्य पिकांच्या सुधारलेल्या जातीच्या उत्तम प्रतीचे खात्रीशीर बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध व्हावे तसेच आधुनिक पद्धतीने शेती करण्याच्या पद्धती शेतकऱ्यांना प्रशिक्षण व व प्रात्यक्षिकद्वारे दाखविणे, परिसरातील शेतकऱ्यांना बिजोत्पादन तंत्रज्ञानाची माहिती देणे हा सुद्धा तालुका बीज गुणन प्रक्षेत्राचा उद्देश आहे. तसेच या योजने अंतर्गत प्रक्षेत्रावर वेतन, मजुरी, अतिकालीक भत्ता, दुरध्वनी, वीज आणि पाणी शुल्क, प्रवास खर्च, कार्यालयीन खर्च, भाडे कर तसेच गौण बांधकामे, सामुग्री व पुरवठा या बाबीसाठी अनुदान असून विविध पिकांचे बीजोत्पादन करणे तसेच शेती संलग्न पुरक कार्यक्रम जसे गांडूळ कल्चर, गांडूळ खत उत्पादन, जैविक नियंत्रणाचे घटक उतपादित करणे, नाडेप पद्धतीने कंपोष्ट खत तयार करणे, निम पावडर, निम आर्क उत्पादन करणे असे विविध उपक्रम घेऊन तालुका बीज गुणन प्रक्षेत्रावर राबविणेत येतात.

**२) वित्तीय आवश्यकता**

| योजनेचे नाव | सन २०२१-२२ तरतूद (रु. लाखात) | सन २०२१-२२ खर्च्र (रु. लाखात) | सन २०२२-२३ तरतूद (रु. लाखात) | सन २०२२-२३ खर्च (रु. लाखात) |
|---|---|---|---|---|
| तालुका बीज गुणन प्रक्षेत्र योजनेतर योजना (२४०१ ०२६१) १०० टक्के राज्यपुरस्कृत योजना | ४३८६.२० | ३४६८.०० | ४७९५.२० | २९४९.०० |

## केंद्र पुरस्कृत कृषी उन्नत्ती योजनांतर्गत बियाणे व लागवड साहित्य योजना (SPM)

**१) प्रस्तावना व उद्देश :**

राष्ट्रीय कृषी विस्तार व तंत्रज्ञान अभियानांतर्गत (एनएमएईटी) २०१४-१५ पासून बियाणे व लागवड साहित्य-उप-अभियान राबविण्यात येत आहे. गुणवत्तापूर्ण / प्रमाणित बियाणेचे उत्पादन वाढविणे, बियाणे बदल दर वाढविणे (एस.आर.आर.) विशेषत: भात, हरभरा, भुईमूग इ. पिकांचा बियाणे बदल दर वाढविणे, ग्राम बिजोत्पादनाच्या माध्यमातून बियाणे उत्पादनात वाढ आणि शेतकऱ्यांकडील स्वत:च्या बियाणेची गुणवत्ता वाढविणे, शेतकऱ्यांकडील बियाणेवर बीज प्रक्रिया मोहीम राबविणे, सार्वजनिक व खाजगी बियाणे क्षेत्रास आर्थिक सहाय्य देऊन बियाणे साखळी बळकट करणे, प्रचलित वाणाऐवजी नवीन वाणाचा वापर वाढविणेसाठी नवीन संशोधित वाणास प्रसिद्धी देणे, बियाणे उत्पादने प्रक्रियेमध्ये अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रवृत्त करणे.

**२) वित्तीय आवश्यकता सन २०१९-२० मधील साध्य :** (रुपये लाखात)

| अ.क्र. | योजनेचे नाव | मंजूर तरतूद | | | वितरीत निधी | | | दि. ३१-०३-२०१९ अखेर खर्च | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | केंद्र | राज्य | एकूण | केंद्र | राज्य | एकूण | केंद्र | राज्य | एकूण |
| १ | अनु. जाती | ६०० | ४०० | १००० | ४८०.६४ | २००.०० | ६८०.६४ | २७८.८५ | १८५.९ | ४६४.७५ |
| २ | अनु. जमाती | १५६.९३ | १०४.६२ | २६१.५५ | १७०.२८ | ३४.५२ | २०४.८० | ५१.८८ | ३४.५२ | ८६.३० |
| ३ | सर्वसाधारण | १६०० | १०६६ | २६६६ | ८१५.६२ | ५३३.०० | १३४८.६२ | ३८५.५९ | २५७.०६ | ६४२.६५ |
| | **एकूण-** | **२३५६.९३** | **१५७०.६२** | **३९२७.५५** | **१४६६.५४** | **७६७.५२** | **२२३४.०६** | **७१६.२२** | **४७७.४८** | **११९३.७०** |

**टीप :** भौतिक साध्य- हरभरा-१७२२५ क्विंटल, गहू- १८६७१ क्विंटल, भुईमूग-३८३०७ क्विंटल, (एकूण बियाणे वितरण- ३९७२७ क्विंटल)

***सन २०२१-२२ चे नियोजन :** (रुपये लाखात)

| अ.क्र. | योजनेचे नाव | मंजूर तरतूद | | | वितरीत निधी | | | दि. ३१-१२-२०२१ अखेर खर्च | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | केंद्र | राज्य | एकूण | केंद्र | राज्य | एकूण | केंद्र | राज्य | एकूण |
| १ | अनु. जाती | ६०० | ४०० | १००० | ३७१.६५ | ४००.०० | ३७१.६५ | ३७१.६५ | ४००.०० | ७७१.६५ |
| २ | अनु. जमाती | १८५१ | ४०० | २२५१ | १७०.२८ | १४२.१३ | १७०.२८ | १५५.२९ | १४२.१३ | २९७.४२ |
| ३ | सर्वसाधारण | २००० | १३०० | ३३०० | १९०.५७ | २८६.६८ | ४९०.५७ | ४९०.५७ | २८६.६८ | ७७७.२४ |
| | **एकूण** | **२३५६.९३** | **२१००** | **६५५१** | **१०३२.५०** | **८२८.८१** | **१०३२.५०** | **१०१७.५१** | **८२८.८०** | **१८४६.३१** |

या योजने अंतर्गत खरीप २०२२ मध्ये केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध न झाल्याने खरीप २०२२ मध्ये ग्रामबिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात आला नाही.

## तक्ता क्रमांक १

## पैदासकार, पायाभूत व प्रमाणित बियाणे उत्पादन

(आकडे क्विंटलमध्ये)

| अ. क्र. | बियाण्याचा प्रकार | पीक | २०१९-२०२० (प्रत्यक्ष) | २०२०-२०२१ (प्रत्यक्ष) | २०२१-२०२२ (अंदाजित) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पैदासकार बियाणे | तृणधान्य | २.३७ | २.९६ | १.६० | |
| | | कडधान्य | ७.५० | ८.२० | ७.३० | |
| | | तेलबिया | ०.०९ | ०.१७ | ०.४० | |
| | | कपाशी | १.०५ | ०.८५ | ०.०० | |
| | | एकूण | ११.०१ | १२.१८ | ९.३० | |
| २. | पायाभूत बियाणे | तृणधान्य | ११५२६ | १३०५६ | ९३२४ | |
| | | कडधान्य | १६२७२ | १८३९८ | १६४९१ | |
| | | तेलबिया | ३१३२० | १४७०४ | १०८०५ | |
| | | कपाशी | ५३ | ६ | .. | |
| | | ज्युट | ७७ | ११९ | १३२ | |
| | | एकूण | ५९२४८ | ४६२८३ | ३६७५२ | |
| ३. | प्रमाणित बियाणे | तृणधान्य | १६५०२४ | १४९०५२ | १०२७२४ | |
| | | कडधान्ये | १९८४०१ | २०३३७९ | २२७२९२ | |
| | | तेलबिया | २८३२२९ | १७४७३८ | ६७८४४ | |
| | | कपाशी | ६३९ | २४२ | ११७ | |
| | | ज्युट | ३९७ | ६५० | ९२३ | |
| | | हिरवळीची खते | ७३४७ | ६५० | २८४३ | |
| | | चारा पिके | १०२०० | ६१०५ | ४५६४ | |
| | | एकूण | ६६५२३७ | ५३४८१६ | ४०६३०७ | |

## तक्ता क्रमांक २

## महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला यांची माहिती

(आकडे रु. लाख)

| अ. क्र. | वर्ष | प्रमाणित बियाणे उत्पादन (क्विंटल) | बिजोत्पादनाखालील क्षेत्र (हे.) | विक्रीची किंमत (रु. लाख) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २०१९-२०२० | ६६५२३७ | ९०३९८ | ५२३७५ | |
| २. | २०२०-२०२१ | ५३४८१६ | ९०६२९ | ३९११८ | |
| ३. | २०२१-२०२२ | ४०६३०७ | ७३३९७ | ३६०५० | |

## तक्ता क्रमांक ३

## महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ अकोला, यांचेकडील भाग भांडवलापोटी खालीलप्रमाणे रकमा जमा

| अ. क्र. | वर्ष | रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|
| १. | २०१९-२०२० | ४१८.४४ | |
| २. | २०२०-२०२१ | ४१८.४४ | |
| ३. | २०२१-२०२२ | ४१८.४४ | |

## बियाणे व लागवड साहित्य उप अभियान (SMSP) अंतर्गत
## बिज प्रक्रिया केंद्र व बियाणे साठवण केंद्र उभारणी (१०० टक्के केंद्र पुरस्कृत)

**१. योजनेचा उद्देश व ठळक वैशिष्ट्ये :**

कृषी क्षेत्रामध्ये विविध पिकांचे उत्पादन व उत्पादकता वाढीसाठी शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर उच्चप्रतीचे गुणवत्तापूर्ण व जास्त उत्पादन देणाऱ्या जातींचे प्रमाणित/ सत्यप्रत, बियाणे उपलब्ध करुन देणे.

सदर योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत असून ५०० मेट्रीक टन क्षमतेच्या प्रत्येक बियाणे प्रक्रिया व साठवण केंद्रासाठी रु. ६०.०० लाख किंवा प्रत्यक्ष उभारणीसाठी येणारा खर्च यापैकी जे कमी असेल तितके अर्थसहाय्य देय आहे. **अ.** मशिन किंमत (अंदाजे) - २४.०० लाख

**ब.** बांधकाम किंमत (अंदाजे) - ३६.०० लाख.

**२. योजनेचे स्वरुप - लाभार्थी पात्रता व निकष :**

**अ.** सदर बिज प्रक्रिया केंद्र विविध शेतकरी बियाणे उत्पादन संस्था, शेतकरी उत्पादन कंपन्या (FPO), स्वयंसहाय्यता गट (SHG), अनधान्य उत्पादक संघ (CIG), सहकारी संस्था, राज्य शासनाची मान्यता असलेली व कृषी क्षेत्राशी संबंधित असलेल्या उपक्रमामध्ये कार्यरत असलेली संस्था यांचेमार्फत उभारणी केल्यास अर्थसहाय्य देय राहील.

**ब.** सदर योजनेचा लाभ घेणाऱ्या संस्थेकडे संस्थेच्या नावाने स्वत:ची जमीन व आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध असणे आवश्यक आहे.

**३. वित्तीय आवश्यकता :** योजनेचे प्राप्त निधी व खर्च + सुधारित

| वर्ष | आर्थिक (रु. कोटी) | | भौतिक | |
|---|---|---|---|---|
| | प्राप्त निधी | खर्च | मंजूर प्रकल्प | प्रकल्प पूर्ण |
| २०१९-२०२० व २०२०-२१ | १६.९३ | ९.३३ | २० | १६ |
| २०२१-२०२२ व २०२२.२३ | १४.४० | ११.३९ | २५ | १८ |

## रासायनिक खतांचा संरक्षित साठा करणे

१. योजनेचा उद्देश : ऐन खरीप व रब्बी हंगामात खताचा तुटवडा भासू नये म्हणून रासायनिक खतांचा संरक्षित साठा करणे.

२. योजनेचे घटक : (१) महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र स्टेट को ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन व विदर्भ को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन या नोडल एजंसी यांना खत खरेदीसाठी बँक गॅरंटी देणे.

(२) रासायनिक खताचा साठा करण्यासाठी या एजंसीना राज्यात खताची वाहतूक, गोदामामध्ये रासायनिक खताची चढाई व उतराई इ. बाबीकरिता येणारा खर्चाची प्रतिपूर्ती करणे.

३. योजनेची संक्षिप्त माहिती :

ऐन हंगामात केंद्र शासनाकडून किंवा खत पुरवठादार कंपन्यांकडून खताचा मागणीप्रमाणे पुरवठा न झाल्यास खत टंचाई भासू नये म्हणून संरक्षित खत साठा करणेबाबत मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात येतो.

४. सन २०२२-२३ करीता रक्कम रुपये ३०००.०० लाख तरतूद आहे.

सन २०२३-२४ करीता रक्कम रुपये ३०००.०० लाख तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

-------------

## केंद्र पुरस्कृत कृषी विस्तार व तंत्रज्ञान अभियानांतर्गत कृषी यांत्रिकीकरण उपअभियान २०२०-२१

**१. योजनेचे संक्षिप्त स्वरूप** : राज्यात कृषी यांत्रिकीकरण सेवा-सुविधा निर्माण करणे व अनुदानावर कृषी अवजारांचा शेतकऱ्यांना पुरवठा करणे.

**२. योजनेची प्रमुख उद्दिष्ट्ये** : राज्यातील कृषी क्षेत्रातील ऊर्जा वापर वाढविणे. भाडे तत्त्वावर कृषी औजारांच्या सेवा-सुविधांसाठी केंद्रे स्थापित करणे. कृषी यांत्रिकीकरणास प्रोत्साहन देण्याचे दृष्टीने शेतकऱ्यांना कृषी यंत्रे/औजारे खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य करणे.

**३. योजनेत मंजूर घटक** : १. शेतकऱ्यांना कृषी यंत्रे/अवजारे खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य करणे.

२. शेतकऱ्यांना भाडे तत्वावर कृषी अवजारांच्या सेवा-सुविधांसाठी कृषी औजारे बँक स्थापित करण्यासाठी अर्थसहाय्य.

सदर उपअभियानात केंद्र हिस्सा ६० टक्के व राज्य हिस्सा ४० टक्के आर्थिक सहभाग आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांत नमूद केलेली अवजारे खरेदी करण्यासाठी लाभार्थींना अनुदान दिले जाते. सदर उपअभियानांतर्गत मंजूर घटकांसाठी अनुदानाची मर्यादा खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | घटक | अनुदान मर्यादा |
|---|---|---|
| १ | शेतकऱ्यांना कृषी यंत्रे/अवजारे खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य करणे. | केंद्र शासनाने औजारे प्रकारनिहाय विहीत केलेल्या मर्यादेनुसार |
| २ | भाडे तत्त्वावर कृषी औजारांच्या सेवा-सुविधांसाठी केंद्रे स्थापन करणे. | |
| | १. रु. १०.०० लाखपर्यंत अवजारांच्या गुंतवणुकीचे केंद्रासाठी एकूण रकमेच्या ४० टक्के | रु. ४.०० लाखपर्यंत |
| | २. रु. २५.०० लाखपर्यंत अवजारांच्या गुंतवणुकीचे केंद्रासाठी एकूण रकमेच्या ४० टक्के | रु. १०.०० लाखपर्यंत |
| | ३. रु. ४०.०० लाखपर्यंत अवजारांच्या गुंतवणुकीचे केंद्रासाठी एकूण रकमेच्या ४० टक्के | रु. १६.०० लाखपर्यंत |
| | ४. रु. ६०.०० लाखपर्यंत अवजारांच्या गुंतवणुकीचे केंद्रासाठी एकूण रकमेच्या ४० टक्के | रु. २४.०० लाखपर्यंत |

३. निवडक गावांमध्ये कृषि यांत्रिकीकरणास प्रोत्साहन (कृषि औजारे बँक) रु. ८.०० लाखापर्यंत

४. उच्च तंत्रज्ञान व उच्च उत्पादनक्षम औजारांचा हब स्थापन करण्यासाठी अर्थसहाय्य रु. ४०.०० लाखापर्यंत

सन २०२२-२३ मध्ये रु. ८७६३.७९ लाख निधी पुनर्जीवित करून केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. तसेच सन २०२२-२३ करिता पहिला हप्ता म्हणून रु. ५९२१.१२ लाख निधीच्या वार्षिक कृती आराखड्यास मान्यता दिलेली आहे.

# राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण कार्यक्रम

राज्यात शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. तथापि, शेती कामासाठी मजूरांचा प्रश्न गंभीर आहे. सध्याचे मजूरीचे दर व त्यामुळे शेतीसाठी येणारा खर्च, मजूरांच्या अभावामुळे शेतीची कामे वेळेवर न होणे आणि प्रत्यक्ष शेतीतून मिळणारे उत्पन्न यामुळे शेती व्यवसाय हा खडतर होत आहे.

सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे केंद्र शासनाचे उद्दिष्ट असून शेतीकरिता लागणाऱ्या निविष्ठाचा खर्च कमी करून उत्पादनामध्ये वाढ करावयाची झाल्यास पारंपारीक शेतीमध्ये बदल करून आधुनिक पद्धतीने यांत्रिकीकरणाद्वारे शेती करणे आवश्यक आहे. त्यासाठी पेरणी, कापणी पश्चात प्रक्रिया यांत्रिकीकरणाद्वारे करणे गरजेचे आहे. यांत्रिकीकरणाचा मोठ्या प्रमाणावर वापर केल्यास शेती उत्पादनामध्ये वाढ होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होणे शक्य आहे.

महाराष्ट्रात सुमारे ८०% शेतकरी हे अल्प व अत्यल्प भूधारक आहेत. यांत्रिकीकरणासाठी लागणारे यंत्र/अवजारे शेतकरी त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे खरेदी करू शकत नाहीत. त्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करणे गरजेचे आहे. केंद्र पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण उपअभियानांतर्गत कृषी यांत्रिकीकरणाचा कार्यक्रम राज्यात राबविण्यात येतो. त्याचप्रमाणे, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, राष्ट्रीय तेलबिया व तेलताड अभियान व एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रम या अंतर्गत सुद्धा अल्प प्रमाणात यांत्रिकीकरणाचा कार्यक्रम राबविण्यात येतो. तथापि, शेतकऱ्यांकडून असणाऱ्या मागणीच्या प्रमाणात या योजनांमधून शेतकऱ्यांना कृषी औजारांचा पुरवठा करणे शक्य होत नाही. यापूर्वी राष्ट्रीय कृषी विकास योजनेमधून कृषी यांत्रिकीकरणासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात येत होता. तथापि, सद्यस्थितीत राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून देण्यात येणाऱ्या निधीमध्ये मोठ्या प्रमाणावर घट झाली आहे. त्यामुळे, कृषी यांत्रिकीकरणासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेमधून फारसा निधी उपलब्ध करून देणे शक्य होत नाही. तसेच, राष्ट्रीय कृषी विकास योजनेमध्ये ट्रॅक्टर, ऊस कापणी यंत्र, पॉवर टिलर यासारख्या जास्त किंमतीच्या यंत्राना अनुदान अनुज्ञेय नाही. परंतु, सदर यंत्राची मागणी मोठ्या प्रमाणात असल्यामुळे केंद्र शासन पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजना प्रभावीपणे राबविण्यास मर्यादा आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांकडून कृषी औजाराची करण्यात येत असलेली मागणी विचारात घेऊन राज्य शासनाची स्वतंत्र कृषी यांत्रिकीकरण योजना राबविण्याचा निर्णय सन २०१८-१९ पासून घेण्यात आला असून दरवर्षी किमान ५० कोटी निधी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे.

सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या कृषी यांत्रिकीकरण उप अभियानाच्या मार्गदर्शक सूचनानुसारच करावयाची असून याअंतर्गत कृषी यंत्र औजारांच्या खरेदीसाठी अर्थसहाय्य आणि कृषी औजारे बँकेच्या स्थापनेसाठी अर्थसहाय्य या घटकांची अंमलबजावणी करण्यात येते.

सन २०१९-२० मध्ये सदर कार्यक्रमासाठी रु. ४०.०० कोटी आणि २०२०-२१ मध्ये रु. ३८.०० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. सन २०२१-२२ साठी रु. ११२.५० कोटी निधीच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सन २०२२-२३ साठी रु. ४००.०० कोटी निधीची अर्थसंकल्पीय तरतूद असून रु. २४० कोटी निधीच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

# कृषी यांत्रिकीकरण उपअभियान

(रक्कम रु. लाखात)

| अ. क्र. | योजनेचे नाव | केंद्र/राज्य हिस्सा | स्त्रोत | वर्गीकरण | लेखाशीर्ष | सन २०२१-२०२२ पुर्नजिवित अर्खचित निधी | सन २०२१-२०२२ प्राप्त २०२१-२०२२ च्या मंजूर कार्यक्रमासाठी प्रत्यक्ष प्राप्त निधी | सन २०२१-२०२२ एकूण उपलब्ध निधी | सन २०२१-२०२२ प्रत्यक्ष खर्च | सन २०२२-२०२३ पुर्नजिवित अर्खचित निधी | सन २०२२-२०२३ प्रशासकीय मान्यता (पुर्नजिवित निधीसह) | सन २०२२-२०२३ मार्च २०२३ अखेर अपेक्षित खर्च | सन २०२३-२०२४ आवश्यक नियतव्यय (मागणी) विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र | अविभाज्य | एकूण (१४ ते १७) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| १ | कृषी यांत्रिकीकरण उपअभियान | केंद्र | केंद्र शासन | सर्वसाधारण | २४०१-२५१३ | २८३९.०८ | ६३४८.१६ | ३७९५.३८ | ४२३७.६० | ४९४९.६४ | ८५०२.३१ | ८५०२.३१ | २५६४.२५ | २०८८.३५ | ५९९७.४० | .. | १०६५०.०० |
| | | | | विघयो | **२४०१ बी १८८** | २२९३.६५ | १८००.०० | २४५२.२२ | १११४.५३ | २९७९.१२ | २९७९.१२ | २९७९.१२ | ५७७.८६ | ४७०.६१ | १३५१.५३ | .. | २४००.०० |
| | | | | टीएसपी | २४०१ ऐ४५९ | ८५४.३९ | १०००.०० | १४१९.४१ | १०१९.३६ | ८३५.०३ | ८३५.०३ | ८३५.०३ | ४६९.५१ | ३८२.३८ | १०९८.११ | .. | १९५०.०० |
| | | | | ओटीएसपी | | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| | | | | **एकूण** | | **५९८७.१२** | **९१४८.१६** | **७६६७.०१** | **६३७१.४९** | **८७६३.७९** | **१२३१६.४६** | **१२३१६.४६** | **३६११.६२** | **२९४१.३४** | **८४४७.०४** | **..** | **१५०००.००** |
| | | राज्य | राज्य स्तर | सर्वसाधारण | २४०१-८७३६ | १८९२.७३ | ४२३२.१० | ६१२४.८३ | २८२५.०७ | ३२९९.७६ | ५६६८.२१ | ५६६८.२१ | १७०९.५० | १३९२.२३ | ३९९८.२७ | .. | ७१००.०० |
| | | | | विघयो | **२४०१ बी १९७** | १५२९.१० | १२००.०० | २७२९.१० | ७४३.०२ | १९८६.०८ | १९८६.०८ | १९८६.०८ | ३८५.२४ | ३१३.७४ | ९०१.०२ | .. | १६००.०० |
| | | | | टीएसपी | २४०१ अे ४४१ | ५६९.९३ | ६६६.६७ | १२३६.६० | ६७९.५८ | ५५७.३५ | ५५७.३५ | ५५७.३५ | ३१३.०१ | २५४.९२ | ७३२.०७ | .. | १३००.०० |
| | | | | ओटीएसपी | | | | | | | | | | | | | |
| | | | | **एकूण** | | **३९९१.७६** | **६०९८.७७** | **१००९०.५३** | **४२४७.६७** | **५८४३.१९** | **८२११.६४** | **८२११.६४** | **२४०७.७५** | **१९६०.८९** | **५६३१.३६** | **..** | **१००००.००** |
| | | | डीपीडीसी | सर्वसाधारण | | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| | | | | विघयो | | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| | | | | टीएसपी | | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| | | | | ओटीएसपी | | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| | | | | एकूण | | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| | | **एकूण राज्य हिस्सा** | | | | **३९९१.७६** | **६०९८.७७** | **१००९०.५३** | **४२४७.६७** | **५८४३.१९** | **८२११.६४** | **८२११.६४** | **२४०७.७५** | **१९६०.८९** | **५६३१.३६** | **..** | **१००००.००** |
| | | **एकूण (केंद्र/राज्य हिस्सा)** | | | | **९९७८.८८** | **१५२४६.९३** | **१७७५७.५४** | **१०६१९.१६** | **१४६०६.९८** | **२०५२८.१०** | **२०५२८.१०** | **६०१९.३७** | **४९०२.२३** | **१४०७८.४०** | **..** | **२५०००.००** |
| **राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण कार्यक्रम** | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | **राज्य स्तर** | | **सर्वसाधारण** | **२४०१ अे ९१३** | **३८००.००** | **११२५०.००** | **११२५०.००** | **१०७८५.५७** | **४२६४.४३** | **२४०००.००** | **२८२६४.४३** | **१०३८९.६०** | **९४८४.४०** | **२०१२६.००** | **..** | **४००००.००** |

## जैविक कीडनियंत्रक प्रयोगशाळेचे बळकटीकरण कार्यक्रम २०२२-२०२३

राज्यात एकूण दहा जैविक कीडनियंत्रण प्रयोगशाळा आहेत. सदर प्रयोगशाळेमध्ये जैविक खते व जैविक कीडनाशकांचे उत्पादन करून शेतकऱ्यांना पुरवठा करण्यात येत आहे. सदर प्रयोगशाळा औरंगाबाद, वर्धा, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, धुळे, जळगांव, परभणी, नांदेड व अहमदनगर या ठिकाणी कार्यरत आहेत. सदर प्रयोगशाळेत वर्षनिहाय खालीलप्रमाणे जैविक घटकांचे उत्पादन केले जाते. सन २०१६-१७ पासून प्रयोगशाळांमध्ये द्रवरुप जैविक खतांचेदेखील उत्पादन सुरु करण्यात आले आहे.

| अ.क्र. | घटक/युनिट | युनिट | जैविक घटक उत्पादन (किलो) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ |
| १ | ट्रायकोडर्मा | किलो | १२०८९९.०० | .. | .. | .. | २६९८ |
| २ | बिव्हेरिया | किलो | २६३४८.०० | ३४५७० | .. | ७९३५ | .. |
| ३ | व्हर्टिसिलीयम | किलो | २६२१४.०० | ४४१४७ | ८८१२ | १२०११ | .. |
| ४ | सुडोमोनास | किलो | १०००.०० | .. | .. | .. | .. |
| | | एकुण | १७४४६१.०० | ७८७१७ | ८८१२ | १९९४६ | २६९८ |
| महसूल जमा (रु. लाख) | | | १६३.१३ | १०१.६३ | १३.३९ | २५.०० | ०.४० |

***द्रवरूप जैविक खते उत्पादन -**

**सन २०१६-१७ ते २०२०-२१ मधील तपशील खालीलप्रमाणे आहे :-**

| अ.क्र. | जैविक खत | उत्पादन (लिटर) २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रायझोबियम | ८८२२.४ | २१०५ | ५७८४.४० | ३४ | ४०८७ | .. |
| २. | अॅझोटोबॅक्टर | ५४२९.३५ | ३०१२.२५ | १७७५.८० | १२० | २३९ | .. |
| ३. | ऑसिटोबॅक्टर | ९७०.०० | १००३ | १९७०.०० | .. | ६८० | .. |
| ४. | पीएसबी | १२०६४.०० | ५४४८ | ७९४५.५ | ५३६ | ७८६ | .. |
| ५. | द्रवरुप जिवाणू संघ | ९८८८६.०० | १३३५७१ | ११७४८६.५० | ६६४६५ | ८१६६२ | ८३६९७ |
| ६. | के.एम.बी. | .. | ४००.०० | १०१९ | .. | .. | .. |
| | **एकुण** | **१२६५७१.७५** | **१४६१५८.२५** | **१३४९६२.२०** | **६७१५५** | **८७४५४** | **८३६९७** |
| **महसूल जमा (रु. लाख)** | | **६०९.७२** | **४८७.१४** | **१७२.६५** | **५३५.६३** | **१५२.७९** | **१००** |

## राज्यातील गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळा बळकटीकरण कार्यक्रम

## (बीज परीक्षण, खत नियंत्रण, कीटकनाशक चाचणी प्रयोगशाळा व कीडनाशक उर्वरित अंश चाचणी प्रयोगशाळा)

**योजनेची माहिती व उद्देश -** महाराष्ट्र राज्याचे कृषी विभागात बीज परीक्षण, खत नियंत्रण व कीटकनाशकांच्या एकूण १२ प्रयोगशाळा आहेत. त्या खालीलप्रमाणे आहेत.

**बीज परीक्षण प्रयोगशाळा -** महाराष्ट्र राज्यात पुणे, परभणी व नागपूर येथे अधिसूचित बीज परीक्षण प्रयोगशाळा आहेत. या प्रयोगशाळांची ५३००० बियाण्याचे नमुने तपासण्याची वार्षिक क्षमता आहे. या सर्व प्रयोगशाळांमध्ये बियाणे अधिनियम, १९६६ व बियाणे नियम, १९६८ अन्वये गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांनी घेतलेले व बीज प्रमाणिकरणासाठी उत्पादकांनी पाठविलेले खाजगी नमुने तपासले जातात.

**खत नियंत्रण प्रयोगशाळा -** महाराष्ट्र राज्यात पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व कोल्हापूर येथे खत नियंत्रण प्रयोगशाळा आहेत. यांची नमुने तपासण्याची वार्षिक क्षमता एकूण २२,००० नमुने आहे. या सर्व प्रयोगशाळेमधून खत (नियंत्रण) आदेश १९८५ अन्वये गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांनी घेतलेले तसेच शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेल्या खत नमुन्यांची तपासणी केली जाते. सर्व खत नियंत्रण प्रयोगशाळेत जैविक खत परीक्षणाची सोय निर्माण करण्यात आली असून या प्रयोगशाळेत जैविक खतांच्या नमुन्यांचे विश्लेषण केले जाते. तसेच सर्व खत चाचणी प्रयोगशाळेत सूक्ष्म मूलद्रव्य तपासणी करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

**राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत सन २०२२-२३ साठी केलेली आर्थिक तरतूद**

| आर्थिक तरतूद | प्रशासकीय मान्यता |
|---|---|
| रु. १९९.९२ लाख | रु. १९९.९२ लाख |

**कीटकनाशक चाचणी प्रयोगशाळा -** महाराष्ट्र राज्यात पुणे , ठाणे , औरंगाबाद व अमरावती येथे कीटकनाशक चाचणी प्रयोगशाळा आहेत. त्यांची एकूण ८००० नमुने तपासण्याची वार्षिक क्षमता आहे. या प्रयोगशाळेमधून कीटकनाशक अधिनियम १९६८ अन्वये गुणवत्ता नियंत्रण निरिक्षकांनी घेतलेले तसेच मोहिमे अंतर्गत घेतलेले कीटकनाशकांचे नमुने तपासले जातात.

प्रयोगशाळांसाठी अत्याधुनिक उपकरणे खरेदी करण्यात आल्यामुळे प्राप्त होणारे नमुने ३० दिवसाचे आत तपासणे शक्य झाल्यामुळे नमुने कालबाह्य होण्याचे प्रमाणात लक्षणीय घट झालेली आहे.

## कीडनाशक उर्वरित अंश तपासणी प्रयोगशाळेची बळकटीकरण करणे

**४. योजनेची माहिती व उद्दिष्ट :-** आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मालाची निर्यात करण्यासाठी कीडनाशक उर्वरित अंश तपासणीची सुविधा उपलब्ध करून देणे, मालाची साठवण योग्यप्रकारे करण्याकरिता तसेच पॅकींग, ग्रेडिंग, वाहतूक इ. साठी उच्च तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी सुविधा निर्माण करणे. या बाबी शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाची मूल्यवृध्दी होण्यासाठी गरजेच्या आहेत. याकरिता पुणे व नागपूर येथे कीडनाशक उर्वरित अंश तपासणी प्रयोगशाळा स्थापन करण्यात आल्या. परदेशात कीडनाशक उर्वरित अंश विरहित अथवा सहनशक्ती कमाल मर्यादेच्या आत असलेल्या शेतमालाला मोठ्या प्रमाणात मागणी असल्याने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत शेतीमाल पाठविण्यापूर्वी कीडनाशक उर्वरित अंशाची तपासणी करून त्याची गुणवत्ता तपासल्यास शेतकरी व निर्यातदारांना त्याचा निश्चित फायदा होतो.

प्रयोगशाळेत अद्ययावत उपकरणांमुळे एका नमुन्यातून १४७ कीटकनाशकांचे उर्वरित अंश तपासणी केली जात आहे.

सदर प्रयोगशाळांसाठी लेखाशिर्ष २४०१-०३०५ योजनेत्तर योजनेंतर्गत मंजूर तरतूद व प्राप्त अनुदान खालीलप्रमाणे :--

| आर्थिक तरतूद | पूरक मागणी | प्रशासकीय मान्यता | प्राप्त अनुदान |
|---|---|---|---|
| रु. २६७४.८० लाख | -- | रु. २६७४.८० लाख | रु. २३३५.२९ लाख (माहे जानेवारी-२०२३ अखेर) |

## मृद सर्वेक्षण व मृद चाचणी योजना

राज्यामध्ये १९५७ मध्ये पुणे येथे व सन १९५९ मध्ये नागपूर येथे मृद चाचणी प्रयोगशाळेची स्थापना करण्यात आली. शासन निर्णय क्र. आकृती/१२९८/प्रक्र.६१/१५अे, दिनांक २९/५/१९९८ आदेशान्वये कृषी विभागाच्या पुनर्रचनेनुसार मृद सर्वेक्षण व मृद चाचणी योजनेचे एकत्रीकरण करण्यात आलेले असून प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक अशा एकूण ३१ मृद सर्वेक्षण मृद चाचणी प्रयोगशाळा कार्यान्वित आहेत. जिल्हा स्तरावरील मृद सर्वेक्षण व मृद चाचणी योजनेचे काम जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी यांचेकडे देण्यात आलेले असून विभागीयस्तरावर विभागीय कृषी सहसंचालक यांचे नियंत्रण आहे. आयुक्तालयस्तरावर कृषी उपसंचालक मृद सर्वेक्षण व मृद चाचणी यांचे तांत्रिक नियंत्रण आहे. सदरची योजना कृषी संचालक (निवगुनि) यांच्या अधिपत्याखाली कार्यरत आहे. योजनानिहाय माहिती खालीलप्रमाणे.

### (अ) मृद चाचणी योजना

**उद्देश-** मृद चाचणी योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातील मृद नमुन्यांचे पृथ:करण करून प्रमुख पीक अन्नद्रव्यांचे प्रमाण निश्चित करणे व त्याचे आधारे निरनिराळ्या पिकाकरिता खताच्या शिफारशी देणे तसेच जमिनीत काही विशेष दोष आढळून आल्यास ते शेतकऱ्यांच्या नजरेस आणून त्यावर योग्य ती उपाययोजना सुचविणे.

शासनाचे नवीन धोरणानुसार सन २०१४-१५ पासून शेतकऱ्यांच्या मृद नमुन्याची तपासणी नत्र, स्फूरद, पालाश, सामु व क्षारता या गुणधर्मासाठी प्रती नमुना रु. ३५/- प्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत आहे. तसेच शेतकऱ्यांच्या मृद नमुन्यांच्या महत्त्वाच्या भौतिक व रासायनिक गुणधर्मासाठी सखोल तपासणी करण्याची सोय प्रती नमुना रु. २७५/- प्रमाणे शुल्काची आकारणी करण्यात येत आहे. जमिनीत आढळून आलेल्या अन्नद्रव्याच्या प्रमाणानुसार कृषी विद्यापीठाने केलेल्या शिफारसीमध्ये सहास्तरीय पध्दतीनुसार योग्य तो बदल करून पिकांचे उत्पादन मिळण्यासाठी खताची शिफारशी देण्यात येतात. जमिनीची सुपीकता कायम ठेवून भरघोस पीक उत्पादनासाठी खताचा समतोल वापर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

अलिकडील काळामध्ये बागायती पिके तसेच फळबाग पिकांच्या उत्पादनामध्ये सूक्ष्म मूलद्रव्यांना सुध्दा महत्त्व प्राप्त झाले आहे. तेव्हा जस्त,लोह, तांबे व मंगल या चार सूक्ष्म मूलद्रव्यांसाठी मृद नमुन्यांची तपासणी प्रती नमुना रु. २००/- या प्रमाणे शुल्क आकारणी करून घेण्यात येते. (कोणत्याही एका घटकात रु. १००/-) राज्यातील ३१ मृद चाचणी प्रयोगशाळेत सूक्ष्म मूलद्रव्ये तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सिंचनासाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्याची प्रत शेतकऱ्यास माहिती असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने पाणी नमुन्याचा आम्ल-विम्ल निर्देशांक, एकूण विद्राव्य क्षारांचे प्रमाण व प्रकार इ. गुणधर्मासाठी प्रती नमुना रु. ५०/- प्रमाणे शुल्क आकारणी करून सर्व प्रयोगशाळेत तपासण्याची सोय करण्यात आलेली आहे.

## राज्यातील योजनेतर योजना :-- अ मृद सर्वेक्षण आणि अन्वेक्षा मृद विश्लेषण रसायन प्रयोगशाळा योजना

या योजनेंतर्गत प्रयोग शाळेच्या दैनंदिन खर्चासाठी, सर्वेक्षणासाठी तसेच प्रयोग शाळेकडील कर्मचारी यांचे वेतन भत्ते, प्रयोगशाळांचे भाडे व कर इतर आकस्मिक खर्चासाठी राज्याकडून योजनेतर योजना मृद सर्वेक्षण आणि अन्विक्षा यातून अनुदान उपलब्ध होते. बाबी खालीलप्रमाणे.

(१) ०१ - वेतन

(२) ०२ - मजुरी

(३) ०३ - अतिकालीक भत्ता

(४) ०६ - दूरध्वनी, वीज व पाणी शुल्क

(५) ११ - देशातंर्गत प्रवास खर्च

(६) १३ - कार्यालयीन खर्च

(७) १४ - भाडेपट्टी व कर

(८) १६ - प्रकाशने

(९) २१ - सामुग्री व पुरवठा

(१०) २७ - लहान बांधकामे

(११) ५१ - मोटार वाहने

(रक्कम रुपये लाख)

| अ. क्र. | योजनेचे नाव | प्रत्यक्ष खर्च २०२०-२१ | प्रत्यक्ष खर्च २०२१-२२ | मंजूर तरतूद २०२२-२३ | प्रस्तावित २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|
| १ | (००) १०१, मृद सर्वेक्षण मृद चाचणी, (००)(०२) मृद सर्वेक्षण आणि अन्वेषण व मृद विश्लेषण प्रयोगशाळा, दत्तमत (२४०२ ००३२) (योजनेत्तर) | २९२८.४६ | २९२८.४६ | ३१३६.६६ | २५००.०० |
| २ | कृषी उनती योजना-मृदा आरोग्य पत्रिका (कें.पु.) ६०:४० टक्के केंद्र व राज्य (२४०२अे०४१) (२४०२अे०५९) | ७२३.४१ | १३३३.०० | १०५७.२५ | १३३३.०० |
| ३ | मृद आरोग्य व्यवस्थापन (उपअभियान) ६०:४० टक्के केंद्र व राज्य (२४०२ १०४६) (२४०२ - अे ०१२) | .. | ५००.०० | ५००.०० | ५००.०० |

### (ब) जमीन आरोग्यपत्रिका योजना :-

**जमीन आरोग्यपत्रिका अभियान :-** महाराष्ट्र शासनाने मृद चाचणीचे महत्त्व लक्षात घेवून जमिनीची आरोग्यपत्रिका शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे ही संकल्पना राबविण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. राज्यातील शेतकऱ्यांना सध्या दिले जाणारे मृद पृथ:करण अहवाल एका हंगामापुरती माती तपासणी करून पुढील पीकासाठी खतांच्या शिफारशी देण्यापुरत्या मर्यादित आहेत. सन २०१५-१६ ते २०१६-१७ या दोन वर्षामध्ये राज्यातील सर्व शेतकऱ्यांच्या शेत मातीची बागायत क्षेत्र २.५ हे. व जिरायत क्षेत्रासाठी १०.०० हे. क्षेत्रामधून प्रत्येकी एक मृद नमुना काढण्यात येणार असून त्याचे विश्लेषण करून त्या क्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांना जमीन आरोग्यपत्रिका वाटप करण्यात येऊन खत वापराविषयी, व जमिनीचे आरोग्य टिकवणे विषयी मार्गदर्शन करण्यात येत आहे. सन २०१५-१६ पासून त्यासाठी नवीन केंद्र पुरस्कृत योजना कार्यरत आहे. सदर योजनेसाठी केंद्र व राज्य शासनाकडून निधीची उपलब्धतेचे प्रमाण ६० : ४०% असे आहे.

राज्यामध्ये मृद चाचणी तपासणीसाठी शासकीय ३२ व योजनंतर्गत समाविष्ट असलेल्या नोंदणीकृत अशासकीय २१२ अशा एकूण २४४ मृद चाचणी प्रयोगशाळा आहेत. सदर प्रयोगशाळांची मृद नमुने तपासणीची वार्षिक क्षमता २१.१० लाख आहे.

सन २०१५-१६ व २०१६-१७ (1st Cycle) मध्ये एकूण देण्यात आलेल्या २३.४७ लाख उद्दीष्टांनुसार २७.२२ लाख मृद नमुन्यांची तपासणी करुन एकूण १३१.४५ लाख शेतकऱ्यांना जमिनी आरोग्यपत्रिकेचे वितरण करण्यात आलेले आहे.

मृद आरोग्यपत्रिका योजनेची (2nd Cycle) (सन २०१७-१८ व २०१८-१९) चे काम माहे एप्रिल २०१७ पासून सुरु झाले असून (2nd Cycle) मधील एकूण देण्यात आलेल्या उद्दिष्ट - २८.५२ लाख, त्यापैकी काढण्यात आलेले मृद नमुने २७.८२ लाख, एकूण जमीन आरोग्यपत्रिकाचे उद्दिष्ट १३०.९८ लाख असून त्यापैकी १३०.५३ लाख जमीन आरोग्य पत्रिका शेतकऱ्यांना वितरित करण्यात आलेल्या आहेत.

**जमीन आरोग्य पत्रिका (पथदर्शी प्रकल्प) २०१९-२० :-** सन २०१९-२० पासून जमीन आरोग्यपत्रिका (पथदर्शी प्रकल्प) योजने अंतर्गत राज्यातील ३५१ तालुक्यामध्ये प्रत्येकी एक गाव याप्रमाणे ३५१ गावांची निवड करण्यात आलेली आहे. त्या गावामधील शेतकऱ्यांच्या शेत जमिनीतील २.०७ लाख मृद नमुने काढण्याचे व तपासणीचे उद्दिष्टे होते. २५ फेब्रुवारी, २०२० पर्यंत २.०१ लाख मृद नमुने तपासणी करून २.०१ जमीन आरोग्यपत्रिकेचे वितरण शेतकऱ्यांना करण्यात आले. निवडलेल्या गावात प्रति गाव ५० हे. याप्रमाणे एकूण १५,२७८ हे. वर जमीन आरोग्य पत्रिके आधारीत पीक प्रात्याक्षिकांचे व प्रति गाव एक शेतकरी मेळावा याप्रमाणे ३३४ मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले.

**जमीन आरोग्य पत्रिका (पथदर्शी प्रकल्प) २०२०-२१ :-** केंद्र शासनाने २०२०-२१ मध्ये कोविड १९ मुळे माती नमुने काढणे, तपासणे व जमीन आरोग्य पत्रिका वितरण करणेही बाब स्थगित केली आहे. सन २०२०-२१ मध्ये केंद्र शासनाच्या सुचनेनुसार योजनेत राज्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये १० गावांची निवड करून प्रति गाव १ प्रशिक्षण, १ प्रात्याक्षिक अशा एकूण ३५०९ प्रशिक्षण व प्रात्याक्षिक आयोजन करण्यात आले.

सन २०२२-२३ नियोजन- राष्ट्रीय कृषि विकास योजनेतर्गत सन २०२२-२३ करिता जमीन आरोग्य पत्रिका व व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत राज्यातून २.०६ लाख मृद नमुन्यांचे विशलेषण करून जमीन आयोग्य पत्रिकेचे वितरण करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमांव्यतिरिक्त राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभिमान, एकात्मिक उत्पादकता वाढ व मुल्य साखळी विकास कार्यक्रम, सेंद्रिय शेती व इतर योजनेतर्गत एकूण २, ७१,८७७ मृद नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेकडे प्राप्त झालेले आहेत. याकरिता रक्कम रु. ९९९.६४ लाख चा वार्षिक कृति आराखडा मंजुर केला आहे.

**(क) मृद आरोग्य व्यवस्थापन योजना :-**

एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन आणि खताचा संतुलित वापर या पीक उत्पादन वाढीच्या प्रमुख सूत्राच्या वापरास प्रोत्साहन देणेच्या उद्देशाने केंद्र शासनाने राष्ट्रीय जमिनीचे आरोग्य व सुपीकता व्यवस्थापन प्रकल्प हा कार्यक्रम सन २००८-०९ या वर्षापासून देशात व राज्यभरात राबविण्यात येत आहे. सदरचा उपक्रम पूर्ण झाला असून त्यातील काही बाबींच्या अंतर्भावासह सन २०१४-१५ पासून राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान अंतर्गत जमीन आरोग्य व्यवस्थापन कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्यातील बाबी खालीलप्रमाणे सदर घटकांसाठी केंद्र व राज्य निधी उपलब्धतेचे प्रमाण ६० : ४०% असे आहे.

(१) मृद चाचणीची सुविधा निर्माण करण्यासाठी फिरत्या तसेच स्थायी स्वरुपाच्या मृद चाचणी प्रयोगशाळांची स्थापना करणे.

(२) शासकीय मृद चाचणी प्रयोगशाळांचे बळकटीकरण.

(३) एकात्मिक अनद्रव्य व्यवस्थापन आणि खताचा संतुलित वापरावर आधारित शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन करणे.

(४) एकात्मिक अनद्रव्य व्यवस्थापन आणि खताचा संतुलित वापरावर आधारित अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण आयोजन करणे.

(५) एकात्मिक अनद्रव्य व्यवस्थापन आणि खताचा संतुलित वापरावर आधारित पीक प्रात्याक्षिकांचे आयोजन करणे.

(६) खत नियंत्रण प्रयोगशाळांची स्थापना करणे.

सन २०१७-१८ मध्ये योजनेसाठी केंद्र हिस्सा रु. ७२०.०० लाख व राज्य हिस्सा रु. ४८०.०० लाख अशी एकूण रु. १२००.०० लाख रक्कम अर्थसंकल्पीय तरतूद केलेली आहे. यामध्ये स्थायी मृद चाचणी प्रयोगशाळा उभारणी, मिनी लॅब उभारणी तसेच शासकीय मृद व खत चाचणी प्रयोगशाळेचे बळकटीकरण करणे इ. बाबींचा समावेश करण्यात आलेला होता. सन २०१८-१९ मध्ये या योजने अंतर्गत शासकीय मृद व खत चाचणी प्रयोगशाळांचे बळकटीकरण करणे या घटकासाठी केंद्र हिस्सा रु. ४६५.१२ लाख व राज्य हिस्सा रु. ३१०.०८ लाख एकूण रुपये ७७५.२० लाख चा कार्यक्रम मंजूर करणेत आला आहे.

सन २०२०-२१ मध्ये नविन आरोग्य व्यवस्थापन योजने अतंर्गत नवीन प्रयोगशाळा उभारणीकरिता रक्कम रु. ४५.९० केंद्र हिस्सा व क्र. ३०.६० लाख राज्य हिस्सा अशा एकूण रु. ७६.५० लाख निधीचा कृषी आराखडा मंजूर करण्यात आला आहे.

**(ड) इतर कार्ये : --**

**(अ) प्रमुख अन्नद्रव्याचा तालुकानिहाय व जिल्हानिहाय सुपीकता निर्देशांक व सुपीकता पातळी तयार करणे**

जिल्हा मृद सर्वेक्षण आणि मृद चाचणी प्रयोगशाळेमार्फत तसेच जिल्ह्यातील खाजगी मृद चाचणी प्रयोगशाळांमार्फत त्या वर्षामध्ये तपासण्यात आलेल्या मृद नमुन्यांवर आधारित तालुक्याचा तसेच जिल्ह्याचा सुपीकता निर्देशांक व सुपीकता पातळी तयार करण्यात येते. या सुपीकता निर्देशांकांचा उपयोग जिल्ह्यातील प्रमुख पीकांसाठी आवश्यक असणाऱ्या खताची मात्रा निश्चित करण्यासाठी तसेच तालुका, जिल्हास्तरावर तसेच राज्यस्तरावर आवश्यक असणाऱ्या सेंद्रिय, रासायनिक आणि जैविक खताचे नियोजन करण्यासाठी तसेच त्यानुसार खत पुरवठ्याचे धोरण ठरविण्यासाठी उपयोगात आणले जाते.

**(ब) सूक्ष्म मूलद्रव्यांची जिल्हानिहाय कमतरता पातळी निश्चित करणे**

राज्यातील सर्व म्हणजेच ३१ मृद सर्वेक्षण मृद चाचणी प्रयोगशाळांमध्ये तसेच काही खाजगी मृद चाचणी प्रयोगशाळांमध्ये मृद नमुन्यातील जस्त, लोह, तांबे आणि मंगल या सूक्ष्म मूलद्रव्याची पातळी तपासण्याची सुविधा निर्माण करण्यात आली आहे. त्या वर्षामध्ये प्रयोगशाळांमार्फत तपासणी करण्यात आलेल्या मृद नमुन्यांवर आधारित सूक्ष्म मूलद्रव्यांची जिल्हानिहाय कमतरता पातळी निश्चित करण्यात येते. सदर कमतरता पातळीचा उपयोग सूक्ष्म मूलद्रव्ययुक्त खतांचा वापर करणेबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी तसेच सूक्ष्म मूलद्रव्ययुक्त खतांचा पुरवठा हा तालुका, जिल्हा व राज्यस्तरावरुन नियोजन करण्यासाठी व खत पुरवठ्याचे धोरण ठरविण्यासाठी करण्यात येते.

# (२) प्रगती अहवाल

**विभागवार मृद व जल नमुने तपासणी अहवाल माहे मार्च २०२२ जिमृसमृचा. प्रयोगशाळांचा १ एप्रिल, २०२१ पासूनचा प्रगतीदायक अहवाल**

| अ. क्र. | जिल्हे | सर्वसाधारण मृद नमुने | | | सूक्ष्म मुलद्रव्ये नमुने | | | विशेष नमुने | | | पाणी नमुने | | | जमा महसूल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लक्ष्य | आवक | तपासलेले | लक्ष्य | आवक | तपासलेले | लक्ष्य | आवक | तपासलेले | लक्ष्य | आवक | तपासलेले | रुपये लाखात |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| एकूण राज्य | ३४ | २००००० | १६०९८५ | १६०९८५ | २००००० | १९४७ | १९४७ | २०००० | ९६८६ | ९६८६ | २०००० | ५२३० | ५२३० | ८९.४९ |

(सर्वसाधारण मृद नमुने सूक्ष्म मुलद्रव्ये नमुने लक्ष सारखे आहे. )

## राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत परंपरागत कृषी विकास योजना (सेंद्रिय शेती)

परंपरागत कृषी विकास योजनेंतर्गत केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा अनुक्रमे ६०:४० असा आहे. सदर योजना गट आधारित असून एका गटात २० हेक्टर क्षेत्र घेण्यात येते. प्रथम वर्षी निवड केलेल्या गटाला सलग तीन वर्षापर्यंत लाभ देण्यात येतो.

**योजनेचे उद्देश :-** शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती निविष्ठा तयार करून त्याचा पुरवठा करणे व त्याप्रमाणे त्यांना प्रोत्साहन देणे, सेंद्रिय प्रमाणिकरण, सेंद्रिय शेती ग्राम विकसित करणे, सेंद्रिय शेतीवर आधारित प्रशिक्षण व प्रात्यक्षिके घेणे, पॅकींग, लेबलींग, ब्रँडींग करणे, विक्री व्यवस्थापन करणे हे योजनेचे प्रमुख उद्देश आहेत.

**योजनेची सद्यस्थिती :-** योजनेअंतर्गत वर्षनिहाय प्रगती पुढीलप्रमाणे आहे.

| वर्ष | गट संख्या | लाभार्थी संख्या | क्षेत्र हेक्टर |
|---|---|---|---|
| २०१६-१७ | ९३२ | ४०७६२ | २०३४६ |
| २०१७-१८ | ३२६ | ११८०३ | ७१६० |
| २०२०-२१ | ३५० | ७३४१ | ७००० |
| २०२०-२१ | २० | ५६५ | ४०० |
| **एकूण** | **१६२८** | **६०४७१** | **३४९०६** |

* **सेंद्रिय प्रमाणिकरण :** राज्यात पीजीएस-इंडिया अंतर्गत १.६५ लाख हेक्टर व राष्ट्रीय सेंद्रिय शेती प्रकल्पांतर्गत ११.३४ लाख हेक्टर असे एकूण १२.९९ लाख हेक्टर क्षेत्र सेंद्रिय प्रमाणिकरणाचे आहे.

* जैविक खेती पोर्टलवर ३९२८१ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे.

**सन २०२२-२३ या वर्षाचे परंपरागत कृषी विकास योजनेंतर्गत घटकनिहाय नियोजन :**

| अ.क्र. | घटकाचे नाव | योजनेचे वर्ष | गट (संख्या) | आर्थिक कार्यक्रम (रु. लाख) केंद्र हिस्सा (६० टक्के) | राज्यहिस्सा (४० टक्के) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | परंपरागत कृषी विकास योजना | दुसरे वर्ष | ३५० गट | ३६४.३३ | २४२.८८ | ६०७.२१ |
| २. | परंपरागत कृषी विकास योजना | पहिले/दुसरे वर्ष | २० गट | ६१.८१ | ४१.२१ | १०३.०२ |
| ३. | परंपरागत कृषी विकास योजना | पहिले वर्ष | ५०० गट | १००९.८० | ६७३.२० | १६८३.०० |
| | **एकूण** | – | – | **१४३५.९४** | **९५७.२९** | **२३९३.२३** |

## डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन

डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन ही १०० टक्के राज्य पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहे. सदर योजना गट आधारित असून एका गटात शेतकऱ्यांचे २० हे. क्षेत्र घेण्यात येते. प्रथम वर्षी निवड केलेल्या गटाला सलग तीन वर्षापर्यंत लाभ देण्यात येतो. सदर योजना प्रथम टप्प्यात विदर्भातील आत्महत्याग्रस्त/नैराश्यग्रस्त अशा बुलडाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या सहा जिल्ह्यात राबविण्यात येत आहे.

**योजनेचे घटक :** शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती निविष्ठा तयार करून त्याचा पुरवठा करणे, सनियंत्रण पद्धती, दिर्घ मुदतीचे प्रशिक्षण, गट मार्गदर्शक पद्धती, तृतीय पक्ष प्रमाणिकरण, सेंद्रिय मालाचे समूह स्वरुपातील बाजार व विक्री व्यवस्थापन, शेतकरी उत्पादक कंपनी संकल्पना, प्राथमिक व दुय्यम प्रक्रिया उद्योग उभारणी, इत्यादी मुख्य घटक आहेत.

**योजनेची सद्यस्थिती :** योजने अंतर्गत सन २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये ३५५ गट निवडण्यात आले असून सन २०२२-२३ मध्ये नवीन ८० गटांची निवड करण्यात येणार आहे.

**सन २०२२-२३ मधील योजनेचा भौतिक व आर्थिक कार्यक्रम :**

| अ.क्र. | घटक | गट संख्या | आर्थिक कार्यक्रम (रु. लाखात) |
|---|---|---|---|
| १. | डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन (दुसरे वर्ष) | ३५५ | १०००.०० |
| २. | डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन (पहिले वर्ष) | ८० | |
| | **एकूण** | **४३५** | **१०००.००** |

## राष्ट्रीय कृषि विकास योजना--कॅफेटेरीया

राष्ट्रीय कृषी विकास योजना सन २००७ पासून एक विशेष अतिरिक्त केंद्र सहाय्यित योजना म्हणून कार्यान्वित करण्यात आली. यात राज्यांना त्यांचा एकात्मिक कृषी विकास साधण्याकरिता कृषी व कृषी संलग्न विभागाचे उपक्रम राबविण्याची तसेच सदर विभागांची जिल्हा व राज्याचे नियोजन करतांना समावेश करण्याची मुभा देण्यात आली.

राष्ट्रीय कृषी विकास योजना अकराव्या व बाराव्या पंचवार्षिक योजना मध्ये यशस्वीपणे राबविण्यात आली आहे. यात विविध प्रकारचे प्रकल्प राबविण्यात आले. यात प्रामुख्याने पीक उत्पादन, फलोत्पादन, कृषि यांत्रिकीकरण, नैसर्गिक साधन संप्पती, बाजार व्यवस्थापन तसेच काढणी पश्चात व्यवस्थापन, पशु संवर्धन, दुग्ध व्यवस्थापन, मत्स्यव्यवस्थापन, विस्तार इत्यादी विभागाचे प्रकल्प राबविण्यात आले. सन २००७-०८ ते २०१३-१४ पर्यंत अतिरीक्त केंद्र सहाय्यित योजना म्हणून राबविण्यात आली. त्यानंतर सन २०१४-१५ मध्ये केंद्र पुरस्कृत योजना १०० टक्के अर्थ सहाय्यित योजना म्हणून राबविण्यात आली. त्यानंतर सन २०१५-१६ पासून ६०:४० केंद्र : राज्य याप्रमाणे अर्थ सहाय्याने राबविण्यात येत आहे. सन २०१७-१८ पासून सर्वसाधारण, अ. जाती आणि अ. जमाती या प्रवर्गाच्या प्रमाणात निधी प्राप्त होत आहे.

बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये योजना राबवितांना किंवा राबविल्याने राज्याकडून आलेले अनुभव किंवा इतर यंत्रणांना आलेले अनुभव व त्याप्रमाणे योजना अधिक प्रभावीपणे राबविण्याकरीता सूचना प्राप्त झाल्या. त्याप्रमाणे राष्ट्रीय कृषि विकास योजना अधिक प्रभावीपणे राबविण्याकरिता व पुनर्ज्जीवन करण्याकरीता सुधारित कार्यक्रम निश्चित करण्यात आला व त्याप्रमाणे १४ व्या वित्त आयोगात त्याप्रमाणे योजना सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ पर्यंत राबविण्याबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना राष्ट्रीय कृषि विकास योजना-रफ्तार केंद्र शासनामार्फत देण्यात आल्या आहेत. सन २०२२-२३ पासून राष्ट्रीय कृषी विकास योजनेचे स्वरुप बदलून राष्ट्रीय कृषी विकास योजना-कॅफेटेरीया ही योजना केंद्र शासनाने कार्यान्वित केली आहे. यामध्ये डिपीआर (प्रकल्पाधारित) आणि एएपी (वार्षिक कृती आराखडा) असे दोन प्रकार आहेत. डिपीआर या प्रकाराची अंमलबजावणी रा.कृ.वि.यो-रफ्तार प्रमाणेच होणार असून एएपी अंतर्गत ५ योजनांचा समावेश करण्यात आला आहे.

**योजनेची ठळक उद्दीष्टे**

१. योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा शाश्वत विकास शेतकऱ्यांना अधिक स्वावलंबी बनविणे, शेतकऱ्यांना विकास करतांना जोखीम घेणे आणि कृषिला व्यवसायाभिमुख बनविणे हा मुख्य उद्देश आहे.

२. शेतकऱ्यांना काढणी पूर्व व काढणी पश्चात पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर देणे जेणेकरुन साठवणूक सुविधामध्ये वाढ होणे व उत्तम प्रतीचा माल उत्पादन होणे व विक्री करीता बाजार उपलब्ध करुन देणे.

३. राज्यांना नियोजन प्रक्रियेत कृषि व कृषि संलग्न विभागाचे प्रकल्प राबविण्यामध्ये पुरेसी स्वायत्तता व लवचिकता प्रदान करणे.

४. राज्यांना अधिक निधी पुरवून कृषि व कृषि संलग्न विभागात सार्वजनिक गुंतवणूक वाढविणे व उत्पादन ते विक्री व्यवस्थापनात प्रोत्साहन देणे.

५. शेतकऱ्यांना जोखीम व्यवस्थापनाद्वारे उत्पन्न वाढविण्यास मदत करणे यात एकात्मीक शेती व्यवस्थापनाद्वारे मशरुम उत्पादन, मधुमक्षीका पालन, सुवासिक वनस्पती लागवड, पुष्प लागवड यात उच्च तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यास प्रोत्साहीत करणे.

६. राष्ट्रीय पातळीवरील प्राधान्य क्रमवारीत असलेले प्रकल्प प्राधान्याने विशेष योजनेच्या माध्यमातून राबविणे.

७. राज्यातील युवकांना कुशल प्रशिक्षणाद्वारे नाविन्यपूर्ण आणि कृषी व्यवसायभिमुख आधार घेऊन कृषी व्यवस्थापन मॉडेल तयार करणे व त्याद्वारे युवकांना कृषिकडे आकर्षित करणे व बळ देणे.

### केंद्र शासनाच्या सुधारित सूचनेप्रमाणे प्रकल्प निधीचे वर्गीकरण

| अ.क्र. | राष्ट्रीय कृषी विकास योजना-कॅफेटेरिया-डिपीआर निधी वितरण तपशील | १००% पैकी | ७०% पैकी | ७०% च्या ५०% पैकी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | नियमीत राष्ट्रीय कृषी विकास योजना--कॅफेटेरिया | | | | |
| | **(अ)** पायाभूत सुविधा | | | | |
| | १ काढणीपूर्व पायाभूत सुविधा (PH) | | | २०(७%) | संरक्षित शेती, रोपवाटीका, यांत्रिकीकरण, पाणी साठवण साधने इ. |
| | २ काढणी पश्चात पायाभूत सुविधा (POH) | | ५०(३५%) | ३०(१०.५%) | कांदा साठवणूक संरचना, गोदाम पायाभूत सुविधा, प्रक्रिया संच शीतगृहे इ. |
| | ३ सर्वसाधारण पायाभूत सुविधा (GI) | ७० | | ५०(१७.५%) | प्रयोगशाळा, जेटी, फार्म मशीन चाचणी केंद्र, फीड मिल प्लांट इ. |
| | **एकूण (१+२+३)** | | | **१००(३५%)** | |
| | **(ब)** मुल्यवृद्धी उत्पादनवाढ प्रकल्प (पीपीपी आयएडी) (कृषी व्यवसाय) | | ३०(२१%) | | मूल्य साखळी आधारित प्रकल्प (खाजगी भागीदारीतील प्रकल्प) |
| | **(क)** लवचीक निधी (उत्पादन वृद्धी) | | २०(१४%) | | लवचिक निधी (उत्पादन वृध्दी) किंवा राज्याच्या गरजेनुसार इतर कोणत्याही उत्पादन आधारित प्रकल्पासाठी वापरला जाऊ शकतो. |
| | **एकूण (अ + ब + क)** | | **१०० (७०%)** | | |
| २. | विशेष योजना | २० | | | केंद्र शासनाद्वारे अधिसूचित केलेल्या प्राधान्यक्रमांवर आधारित (AFDP, RPS, Animal Health Sub Scheme, VIIDP) |
| ३. | नाविन्यपूर्ण व कृषी व्यवसाय वृद्धी प्रकल्प (केंद्र शासन स्तर) | १० | | | केंद्र शासनाकडून नाविण्यपूर्ण उपक्रम आणि उद्योजक विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य |
| | **एकूण राष्ट्रीय कृषी विकास योजना-कॅफेटेरिया (१+२+३)** | **१००** | | | |

राष्ट्रीय कृषी विकास योजनेमध्ये प्रथम प्रत्येक जिल्ह्यातील कृषी व कृषी संलग्न क्षेत्राच्या विकासासाठी सर्वकष जिल्हा कृषी आराखडा तयार करुन अनुषंगाने राज्य कृषी आराखडा तयार केलेला आहे. १२ व्या पंचवार्षिक योजनेत यामध्ये Infrastructure Development Plan समावेश करण्यात आलेला आहे. सदरहू आराखडा तयार करताना केवळ शेतीचा विचार न करता शेतीसह पशुसंवर्धन, मस्त्यव्यवसाय, दुग्धव्यवसाय, लघु पाटबंधारे, जलसंधारण व सहकार विभाग, रेशीम विकास विभाग इ. सर्व बाबींचा एकत्रित विचार केलेला आहे. यात आता सुधारित मार्गदर्शक सूचना सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ करीता राज्याच्या सुधारित प्रकल्प सादर करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

राष्ट्रीय कृषी विकास योजनांतर्गत सन २०१४-१५ पर्यंत १००% केंद्राचे अर्थसहाय्य देण्यात येत होते. त्यात सन २०१५-१६ पासून सुधारणा करुन केंद्र हिस्सा ६० टक्के व राज्य हिस्सा ४० टक्के असे देण्यात येत आहे. ४ टक्के कृषी व कृषी सलग्न क्षेत्राचा विकास दर वाढविण्याचे उद्दीष्ट देण्यात आलेले आहे. यात राज्यांना स्थानिक गरजेनुसार प्रकल्पाची निवड करण्याची मुभा देण्यात आलेली आहे. त्यासाठी राज्यांचा जिल्हा स्तरावर व राज्य स्तरावरील उपलब्ध साधन सामुग्रीचा विचार करावयाचा आहे.

सन २००७-०८ ते २०२२-२३ पर्यंत राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समितीने कृषी व कृषी संलग्न विभागांच्या विविध प्रकल्पांना मंजुरी दिलेली असून त्यासाठी निधीही उपलब्ध करुन दिलेला आहे. वर्षनिहाय व विभागनिहाय निधीचा तपशील खालीलप्रमाणे आहे (दि. २० सप्टेंबर, २०२२ अखेर)

सन २०२१-२२ पासून राकृवियोच्या निधीचे व्यवस्थापन सुधारित पीएफएमएस प्रणालीद्वारे होणार आहे. यामध्ये संपूर्ण निधी फक्त राज्यस्तरीय नोडल यंत्रणा (एसएनए) खात्यात राहणार असून, क्षेत्रीय स्तरावरील अंमलबजावणी यंत्रणांना (आय.ए.) फक्त निधी मर्यादा देण्यात येऊन, त्या मर्यादेतच ते खर्च करतील.

## सन २००७-०८ ते सन २०२२-२३ या वर्षातील निधीचा तपशील

(रक्कम रु. कोटी)

| अ. क्र. | वर्ष | राज्यस्तरीय प्रकल्प समितीने मंजूर केलेले (नवीन) प्रकल्प मूल्य | केंद्र शासनाने मंजूर केलेला निधी | केंद्र (६०% टक्के) | राज्य (४०% टक्के) | एकूण | खर्च | सादर केलेले उपयोगिता प्रमाणपत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००७-०८ | १३२.१० | १२८.२० | १२८.२० | .. | १२८.२० | १२८.२० | १२८.२० |
| २ | २००८-०९ | ३८८.८७ | २६१.७७ | २६१.७७ | .. | २६१.७७ | २६१.७७ | २६१.७७ |
| ३ | २००९-१० | ४०९.८१ | ४०४.३९ | ४०४.३९ | .. | ४०४.३९ | ४०४.३९ | ४०४.३९ |
| ४ | २०१०-११ | १०७४.३५ | ६५३.०० | ६५३.०० | .. | ६५३.०० | ६५३.०० | ६५३.०० |
| ५ | २०११-१२ | ११९८.५२ | ७२७.६७ | ७२७.६७ | .. | ७२७.६७ | ७२७.६७ | ७२७.६७ |
| ६ | २०१२-१३ | ७६३.७१ | १०५८.५८ | १०५८.५८ | .. | १०५८.५८ | १०५८.५८ | १०५८.५८ |
| ७ | २०१३-१४ | ८४९.७१ | १०१४.२२ | ९५९.६९ | .. | ९५९.६९ | ९५९.६९ | ९५९.६९ |
| ८ | २०१४-१५ | १०६३.४६ | १०२५.९९ | ९४२.०९ | .. | ९४२.०९ | ९४२.०९ | ९४२.०९ |
| ९ | २०१५-१६ | १२१२.२१ | ७३०.०० | ४३८.०० | २९२.०० | ७३०.०० | ७३०.०० | ७३०.०० |
| १० | २०१६-१७ | ४४२.३४ | ७०८.०० | २५०.९१ | १६७.२७ | ४१८.१८ | ४१८.१८ | ४१८.१८ |
| ११ | २०१७-१८ | १४०८.२६ | ६५०.०२ | ३९८.६१ | २६५.७४ | ६६४.३५ | ६६४.३५ | ६६४.३५ |
| १२ | २०१८-१९ | २९०.०८ | ४०६.७५ | २४४.०६ | १६२.७० | ४०६.७६ | ४०६.७६ | ४०६.७६ |
| १३ | २०१९-२० | ३३२.७० | ४१८.४४ | २५३.५७ | १६९.०४ | ४२२.६१ | ४२२.६१ | ४२२.६१ |
| १४ | २०२०-२१ | ८.१२ | ४७८.१० | १९९.६१ | १३३.०८ | ३३२.६९ | ३३२.६९ | ३३२.६९ |
| १५ | २०२१-२२ | १२८.३५ | ४०१.८२ | १२०.५५ | ८०.३६ | २००.९१ | २००.९१ | २००.९१ |
| १६ | २०२२-२३ | २१४.८३ | ३८२.८६ | .. | .. | .. | .. | .. |
| | **एकूण** | **९९१७.४२** | **९४४९.८१** | **७०४०.७०** | **१२७०.२०** | **८३१०.९०** | **८३१०.९०** | **८३१०.९०** |

**टीप :** १. सन २०१४-१५ पर्यंत १०० टक्के केंद्रीय सहाय्य

२. सन २०१५-१६ पासून केंद्र हिस्सा ६० टक्के व राज्य हिस्सा ४० टक्के

३. सन २०२१-२२ पासून सुधारित पीएफएमएस प्रणालीद्वारेच निधी व्यवस्थापन.

४. सन २०२२-२३ करीता निधी उपलब्ध झालेला नाही.

## RKVY Agency Wise Project on going in FY 2022-23

| Sr. No. | Name of Agency/Project | Sanction Year |
|---|---|---|
| 1. | Construction of new Irrigation Well for Scheduled caste and Scheduled Tribes farmer having annual income up to Rs. 1.50 lakh. | 2019-20 |
| 2. | Agriculture Awareness Programme 2021-22 | 2021-22 |
| **i Director ( Extension)** | | |
| 3. | Establishment of Biological Control Laboratory for mass production of bio-agents against sugarcane insect pests and diseases and dissemination of technology for enhanced cane and sugar productivity in Maharashtra (IISR, Lucknow). | 2017-18 |
| 4. | Agriculture Mechanization Project. | 2021-22 |
| 5. | Agriculture Mechanization. | 2022-23 |
| **ii Director ( Q. C.)** | | |
| 6. | Development of high tech (Govt nursery) | 2018-19 |
| **iii Director (Hort)** | | |
| 7. | Construction training/conference hall at Ghatked, Amravati | 2018-19 |
| 8. | Training Capacity Building Program for Officers, Staff and Atma Samiti Members at Vanamati and Rameti, Vanamati Nagpur | 2022-23 |
| **iv Director (ATMA)** | | |
| 9. | Turmeric mechanization and post-havest management project | 2017-18 |
| 10. | Develoment of multi chamber and multi commodity cold storage with export assisting infrastructure and processing unit as Vashi, Navi Mumbai (NAFED) | 2019-20 |
| **v Director (Planning & Processing)** | | |
| 11. | Low cost Onion Storage Structure | 2018-19 |
| 12. | Financial assistance for protected cultivation | 2018-19 |
| 13. | Value chain intervention in Onion through Building Storage Structure *(Nafed-Maha FPC) :* | 2018-19 |
| 14. | Value chain development for Fruits and Vegetables *(M/S. Sahyadri Farmers Producer Company Ltd. Nashik) :* | 2018-19 |
| 15. | Financial Assistance for Protected cultivation | 2019-20 |
| 16. | Grading, sorting and aseptic processing of fruits and vegetables linked with backward integration | 2019-20 |
| 17. | Punya Shlok Ahilyadevi Holkar Nursery Scheme. (NHM) | 2020-21 |
| 18. | Low cost Onion Storage Structure | 2021-22 |
| 19. | Individual Farm Pond linning | 2021-22 |
| 20. | Financial assistance for protected cultivation | 2021-22 |
| 21. | Punya Shlok Ahilyadevi Holkar Nursery Scheme (NHM) | 2021-22 |
| **vi MD (MSHMPB)** | | |
| 22. | Setting up of Biofertilizers, Biopesticide and micronutrients. Water soluble fertilizers 7 PGR manufacturing units, Malegaon Dist Nashik | 2021-22 |
| **vii MD (MAIDC)** | | |
| **1 Agriculture Department** | | |
| 23. | Irrigation water requirement advisory service (IWRAS) project | 2014-15 |
| 24. | Establishment of lift irrigation scheme for optimization of sustainable seed production programme at the university campus of MPKV, Rahuri. | 2017-18 |
| **i** | **MPKV, Rahuri** | |
| 25. | Facilitation & promotion cum training for production of bio-agents (Trichogramma Sp.) in six districts of Nagpur division and establishment of training center in bio-control laboratory at Agriculture College, Nagpur | 2019-20 |

| Sr. No. | Name of Agency/Project | Sanction Year |
|---|---|---|
| 26. | Transfer of integrated crop management and technologies developed by PDKV Akola | 2015-16 |
| 27. | Adoption of high yielding varieties of Mustard along with low cost production technology in Four District of Nagpur Division | 2021-22 |
| 28. | Establishment of Breeder Seed & Certified Seed Production Centre of Groundnut, Safflower & Sunflower at Dr. PDKV Akola | 2021-22 |
| ii) | **Dr PDKV, Akola** | |
| 29. | Silkworm hybrid cocoon production & transfer of Sericulture technology in Marathwada Region | 2017-18 |
| 30. | Strengthening of Tissue Culture laboratory at VNMAU, Parbhuni for micro-propagation of Banana Plantlets. | 2021-22 |
| 31. | Establishment of Model Genome Club (MGC) for Sustainable Agriculture Development | 2022-23 |
| iii) | **VNMKV, Parbhani** | |
| 32. | Innovative Water Resources development for enhancing the Agriculture productivity | 2014-15 |
| 33. | Strengthening of Laboratory at Khar Land Research Station. Panvel and capacity building of farmers in soil health and fish production. | 2017-18 |
| 34. | Production of Bioformulation using advance techniques on commercial scale for enhanced plant health and productivity | 2021-22 |
| 35. | Facilitation for value addition in Manga bamboo to generate bamboo entrepreneurs in Konkan region | 2021-22 |
| iv) | **Dr BSKKV, Dapoli** | |
| **2** | **MCAER (SAUS)** | |
| 36. | Setting up of grain cleaning unit in 31 APMCs including Civil work, Machinery & Electrical works | 2017-18 |
| 37. | Setting up of godowns in 108 APMCs for implementing agriculture produce pledge loan scheme in the state of Maharashtra. | 2017-18 |
| **3** | **MD (MSAMB)** | |
| 38. | Development of multi chamber cold storage with PHM infrastructure & processing unit at 8 centers in MSWC (Revised project cost 29 SLSC) | 2017-18 |
| 39. | Upgradation of Warehousing Infrastructure with replacement of A C sheet roofing by Galvanized sheet Roofing, grill, rolling shutter, approach road,compound wall, apron gutter and Warehousing Infrastructure for Direct Marketing for tribal area | 2018-19 |
| 40. | Upgradation of warehousing infrastructure by providing approach concrete road & apron gutter, compound wall, shelter shed for farmers/hamals in Vidarbh & Marathwada | 2019-20 |
| 41. | Development of Agro warehousing & logistic park at Jhamburgaon, Aurangabad. | 2021-22 |
| **4** | **MD (MSWC)** | |
| 42. | Creation of BSL-III Laboratory for Avian Influenza and other Zoonotic pathogens at Disease Investigation Section, Aundh, (DIS) (revision in project cost 29 SLSC Rs 5615 Cr)) | 2016-17 |
| 43. | Strengthening & Modernization of Teaching Veterinary Clinical Complex. Diagnostic Laboratory & Establishment of Training center at college of Veterinary & Animal Science (Parbhani. Rs. 4.59 Cr Nagpur.Rs. 6.91 Cr Mumbai Rs. 5.00 Cr) | 2016-17 |
| 44. | Strengthening of TVCC and diagnostic lab at Post Graduate Institute of Veterinary and Animal Science, Akola. | 2017-18 |

| Sr. No. | Name of Agency/Project | Sanction Year |
|---|---|---|
| 45. | Centre of excellence for Genetic improvement for KVK Baramati | 2017-18 |
| 46. | Dairy development programme in Vidharbha & Maratwada Region | 2017-18 |
| 47. | Improving A. I Delivery System | 2018-19 |
| 48. | PPP goat farming project at Solapur district by Srujan Organic commodities Pvt. Ltd. Solapur | 2019-20 |
| 49. | Improving A.I. Delivery System | 2021-22 |
| 50. | Construction of training centre & administrative building of Maharashtra state veterinary council Nagpur (For continuous education of registered veterinary practitioners of M.S.) | 2021-22 |
| 51. | Strengthening of 4 Regional Disease Diagnostic Laboratories in Maharashtra State for Diagnoiss of Animal Diseases with RT-PCR | 2021-22 |
| 52. | Ovum pick-up-In-Vitro Fertilization & Embryo Transfer Technologies for Conservation and propagation of Indigenous Cattle and Buffalo | 2021-22 |
| **5** | **Commissioner (AH)** | |
| 53. | Modernization and Capacity enhancement of dairy unit of Jalgaon district Co-op. milk union | 2016-17 |
| 54. | Modernization and Capacity enhancement of the milk processing and byproduct unit of Jalgaon district Co-Op. milk union | 2016-17 |
| 55. | Expansion & modernization of 50 TLPD milk processing plant to 1 LLPD and to set up 2 milk chilling centers of 10 TLPD of Sampatrao Deshmukh Co-op. Milk union, Kadepur, Sangli | 2017-18 |
| 56. | Expansion of existing Dairy Processing Plant from 30 TLPD to 1 LLPD, Marathwada Agro Process farmer Producer company Ltd. Kalamb Dist Osmanabad | 2019-20 |
| 57. | Construction of new Dairy Processing Unit of 10 TLPD, Dattasai Multi State Co-op. Milk & Milk Products Ltd., chilwadi Tal. & Dist. Osmanabad. | 2019-20 |
| 58. | Construction of new Dairy Processing Unit of 25 TLPD, Rajamrut Multistate Co.op. Milk Union Ltd., Phulambri, Dist. Aurangabad | 2019-20 |
| 59. | Financial assistance under the scheme of RKVY Yojana for establishment of Dairy unit and other allied items at shri. Tatyasaheb Korenagar, at Warnanagar Dist. Kolhapur. | 2019-20 |
| 60. | Accelerated Dairy Development Programme (Sinnar Taluka Co-op. Milk Production & processing Union) | 2019-20 |
| 61. | Setting up of BMC along with AMC & Milk Processing Plant 100 TLPD capacity M/S, Subhash Anna Kul Co-op dudhutpadak & processing Ltd, Galandwadi, Tal Daund, Dist. Pune | 2020-21 |
| 62. | M/s. Shree Chhatrapati Shahu Milk & Agro producer company Ltd, Vhannur, Dist- Kolhapur for expansion & modification of Main Dairy & Milk Products Manufacturing plant from 50 to 100 TLPD | 2021-22 |
| 63. | M/s. Vaijanath Milk & Milk product producer company Ltd, Shinoli, Tal. Chandgad, Dist Kolhapur for expansion of Main Dairy plant from 15 to 50 TLPD | 2021-22 |
| 64. | Main dairy expansion and installation of new chilling centre at Bhavan Tal. Sillod (Aurangabad jilha dudh sangh, Aurangabad) | 2015-16 |
| 65. | Dudh ganga Co-operative milk producer assoiation Taluka Indapur. Dist. Pune | 2013-14 |
| **6** | **Commissioner (DD)** | |
| 66. | Strengthening of Fishery Training institute, Exhibition Hall and Museum at Alibag Dist. Raigad. **(Resanction in 29 SLSC)** | 2020-21 |
| 67. | Providing infrastructure & post harvesting facility to fishermen at 6 fish landing centers | 2016-17 |
| 68. | Pilot Project of Fish Feed Mill Plant | 2017-18 |
| 69. | Assistance to the Fishermen Seed Production Centre & Portable Hatcheries | 2017-18 |
| 70. | Assistance to inland Fish farmer for Fingerling Rearing | 2017-18 |
| 71. | Mesh Size Regulation at Cod End for Sustainable Fishing in Marine Sector | 2017-18 |

| Sr. No. | Name of Agency/Project | Sanction Year |
|---|---|---|
| **7** | **Commissioner (Fisheries)** | |
| 72. | Development of Cocoon Market at Jalna | 2016-17 |
| 73. | Centre for Development of Reshim Park at Solapur. | 2016-17 |
| **8** | **Director (Sericulture)** | |
| 74. | Reclamation of problematic Soils (RPS) | 2018-19 |
| **9** | **Water Conservation Department** | |

**List of Schemes included in AAP stream of RKVY-Cafeteria 2022-23**

| **Sr. No.** | **Name Scheme** | **Sanction Year** |
|---|---|---|
| 1 | Per Drop More Crop (PDMC) | 2022-23 |
| 2 | Sub Mission on Agriculture Mechanisation (SMAM) | 2022-23 |
| 3 | Rainfed Area Development (RAD) | 2022-23 |
| 4 | Soil Health Card & Management | 2022-23 |
| 5 | Organic farming (Paramparagat Krishi Vikas Yojana | 2022-23 |

## केंद्र शासन सहाय्यित प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME)

केंद्र शासन सहाय्यित प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME) सन २०२०-२१ ते २०२४-२५ या पाच वर्षाच्या कालावधीत "एक जिल्हा एक उत्पादन" (ODOP-One District One Product) या आधारावर राबविली जात आहे. सदर योजना असंघटीत क्षेत्रासाठी राबविली जात आहे. योजनेंतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या खर्चाचे प्रमाण ६०:४० असे आहे.

योजनेंतर्गत नाशवंत शेतीमाल जसे फळे व भाजीपाला, तृणधान्ये, कडधान्ये, तेलबीया, मत्सोत्पादन, मसाला पिके, दुग्ध व पशुउत्पादन, किरकोळ वनउत्पादने इ. मध्ये सद्यस्थितीत कार्यरत उद्योगांचे विस्तारीकरण/आधुनिकीकरण/स्तरवृद्धी किंवा नवीन सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उभारणी इ. चा समावेश आहे. सदर योजनेमध्ये वैयक्तिक लाभार्थी, शेतकरी, बेरोजगार युवक, महिला, शेतकरी गट/कंपनी/संस्था, स्वयंसहाय्यता गट, उत्पादक सहकारी संस्था इ. सहभागी होणेसाठी पात्र आहेत. सदर योजनेस दि. २३-१२-२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाची मंजूरी प्राप्त झाली आहे.

सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगातील वैयक्तिक, शेतकरी उत्पादक, स्वयंसहाय्यता गट व सहकारी उत्पादक यांची पतमर्यादा वाढविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. सदर योजना महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये (मुंबई शहर व मुंबई उपनगर समाविष्ट) राबविण्यात येत आहे. योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्यास पाच वर्षाकरिता २२२३४ सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांचे सक्षमीकरणाचा भौतिक लक्षांक प्राप्त झाला आहे.

**अर्थसहाय्य**

१. वैयक्तिक सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना भांडवली गुंतवणूकीकरिता बँक कर्जाशी निगडीत एकूण पात्र प्रकल्प खर्चाच्या ३५% जास्तीत जास्त रु. १०.०० लाखाच्या मर्यादेत अनुदान दिले जाणार आहे. त्याकरिता www.pmfme.mofpi.gov.in या संकेतस्थळावरील PMFME MIS PORTAL वर Online अर्ज सादर केले जातात.

२. शेतकरी गट, शेतकरी उत्पादक संस्था/कंपनी, स्वयंसहाय्यता गट/उत्पादक सहकारी संस्था यांना सामाईक पायाभुत सुविधा साठी बँक कर्जाशी निगडीत एकूण पात्र प्रकल्प खर्चाच्या ३५% रु. ३०० लाखाच्या मर्यादीत अनुदान देय आहे. त्याकरिता www.pmfme.mofpi.gov.in या संकेतस्थळावरील PMFME MIS PORTAL वर Online अर्ज सादर केले जातात.

३. अन्न प्रक्रिया उद्योगांमध्ये कार्यरत स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांना खेळते भांडवल व छोटी मशिनरी घेण्याकरिता प्रती सदस्य रु. ४०,०००/- बीज भांडवल रक्कम देण्यात येणार आहे. सदर घटकाची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान (MSRLM) नवी मुंबई यांचेमार्फत केली जाते. त्यासाठी www.nrlm.gov.in या संकेतस्थळावरील NRLM व NULM PORTAL वर Online अर्ज सादर केले जातात.

४. गट लाभार्थ्यांना ब्रँडींग व मार्केटींगसाठी बँक कर्जाशी निगडीत एकूण पात्र प्रकल्प खर्चाच्या ५०% अनुदान दिले जाणार आहे. याकरिता कमाल आर्थिक मर्यादा केंद्र शासनाकडून विहीत करण्यात येईल.

५. अर्जदार व इच्छूक लाभार्थींना प्रशिक्षणाकरिता १००% अनुदान देय आहे.

### प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेसाठी २०२०-२१ व २०२१-२२ चा कार्यक्रम (रु. लाख)

| वर्ष | केंद्र शासनाने मंजूर कार्यक्रम | राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता | प्राप्त निधी | खर्च निधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| २०२०-२१ | ४४३१.५९ | ०.०० | २७५७.४६ | २१७४.१६ | सन २०२०-२१ मध्ये १००% निधी केंद्र शासनाकडून प्राप्त झाला असून राज्य हिश्याची रक्कम पुढील चार वर्षात समप्रमाणात समायोजित होणार आहे. |
| २०२१-२२ | २१२६६.०० | ६८०८.३५ | ४२४३.६१ | ३४४४.०२ | |
| २०२२-२३ | ३८६८९.०० | १७५९०.०० | ७१६९.४९ | ५४०६.०९ | |

## मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना

मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना दि. २० जून २०१७ च्या शासन निर्णय अन्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून पुढील पाच वर्षाकरिता लागू करण्यात आली असून राज्य शासनाद्वारे प्रतिवर्षी किमान ५०.०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद उपलब्ध करून देण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आलेले आहे. दिनांक १७ मे २०२२ चे शासन निर्णयान्वये ही योजना पुढील पाच वर्षे सुरू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत फळे, भाजीपाला, अन्नधान्ये, कडधान्ये, तेलबिया इत्यादीवर आधारित कृषी प्रक्रिया उद्योगांचा समावेश आहे.

योजनेमधील घटक - या योजनेंतर्गत खालीलप्रमाणे ३ घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

घटक क्र. १ - कृषी व अन्न प्रक्रिया प्रस्थापना, स्तरवृध्दी व आधुनिकीकरण

घटक क्र. २ - शीतसाखळी योजना

घटक क्र. ३ मनुष्यबळ निर्मिती व विकास योजना

मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजनांसाठी सन २०२१-२२ चे साध्य व सन २०२२-२३ साठी मंजूर कार्यक्रम व सन २०२३-२४ साठी प्रस्तावित कार्यक्रम.

रु. लाखात

| अ. क्र. | वर्ष | अनुदान मागणी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २०२१-२२ | ३७५०.०० | प्राप्त झालेला रु. ३७५०.०० लाख निधी मंजूर प्रकल्पावर संपूर्णपणे खर्च झाला आहे. |
| २ | २०२२-२३ | ११५००.०० | सन २०२०-२१ व २०२१-२२ मधील १०९ मान्य प्रकल्पांना निधी वितरण प्रस्तावित |
| ३ | २०२३-२४ | ११५००.०० | प्रस्तावित कार्यक्रम |

## सनियंत्रण व मूल्यमापन कक्ष

**(१) प्रास्ताविक :**

शासन निर्णय, क्र. कृषी व सहकार विभाग क्र. कृषी आ-४२८०/१८३०८-२/१४ अे, दिनांक ०९-०२-१९८१ तसेच शासन निर्णय क्र. कृषी व पदुम विभाग निर्णय क्र. आकृवि/१२९८/प्रक्र-६१/१५-अे, दिनांक २९ मे, १९९८ व कृषि, पदुम विभाग, शासन निर्णय क्र. आ. कृ. वि./१२०८/प्र. क्र.-७२/१५-अे/दि. २२ मे, २००९ अन्वये खात्याच्या पुनर्रचनेनुसार कृषी आयुक्तालयात, सनियंत्रण व मूल्यमापन कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. कृषी संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन) यांच्या नियंत्रणाखाली सदर कक्षाचे कामकाज पार पाडले जाते.

**(२) मंजूर पदांची माहिती :**

सदर कक्षाचे कामकाज पार पाडण्यासाठी खालीलप्रमाणे एकूण १४ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत.

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (रु.) | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रमुख, सनियंत्रण व मूल्यमापन (कृषी उपसंचालक म. कृ. से. गट अ) | .. | १ | १ | .. |
| २. | कृषी अधिकारी (गट ब कनिष्ठ) | .. | २ | २ | .. |
| ३. | कृषी पर्यवेक्षक | .. | ४ | २ | २ |
| ४. | लघुलेखक (निम्नश्रेणी) | .. | १ | .. | १ |
| ५. | वरिष्ठ लिपिक | .. | १ | .. | १ |
| ६. | कनिष्ठ लिपिक | .. | २ | १ | १ |
| ७. | वाहन चालक | .. | १ | .. | १ |
| ८. | नाईक | .. | १ | .. | १ |
| ९. | शिपाई | .. | १ | १ | .. |
| | एकूण पदे | .. | १४ | ७ | ७ |

**(३) सनियंत्रण व मूल्यमापनाचा उद्देश :**

एखाद्या चालू योजनेची अंमलबजावणी व लक्ष साध्य योग्यरित्या होत आहे की नाही ते पाहणे, योजना राबविताना योजनेची प्रगती पाहणे हा सनियंत्रणाचा मुख्य उद्देश आहे, तर योजना राबविल्यानंतर त्या योजनेचे लक्षांकानुसार काम झाले आहे किंवा कसे हे तपासणे, योजनेचा प्रभाव व परिणामकारकता तपासणे, योजना योग्य पध्दतीने राबविली गेली किंवा कसे ते तपासून अडचणींवर उपाय सुचविणे योजना किती प्रमाणात यशस्वी झाली हे पाहता येणे व लाभार्थ्यांच्या प्रतिक्रिया, अंमलबजावणी करणारे अधिकारी व कर्मचारी यांचे अभिप्राय जाणून घेऊन त्याप्रमाणे मार्गदर्शक सूचनांमध्ये आवश्यक ते बदल वेळीच करता यावे हा मूल्यमापनाचा मुख्य उद्देश आहे.

**(४) अंतर्गत मूल्यमापन :**

मूल्यमापन दोन प्रकारे पार पाडले जाते. अंतर्गत मूल्यमापन व बाह्य मूल्यमापन, यामध्ये सनियंत्रण व मूल्यमापन या कक्षाद्वारे अंतर्गत मूल्यमापन केले जाते. याकरिता कृषी आयुक्तालयात कार्यरत असलेले कृषी संचालक, (विस्तार व प्रशिक्षण), कृषी संचालक (मृद व जलसंधारण), कृषी संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषी संचालक (फलोत्पादन), कृषी संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन) यांच्या शिफारशी घेऊन मा. आयुक्त, कृषी यांचे मान्यतेने विविध कृषी योजनांचे मूल्यमापन केले जाते. क्षेत्रिय कर्मचाऱ्यांशी व अधिकाऱ्यांशी नियमित पाठपुरावा करून मूल्यमापनाचे क्षेत्रिय काम लवकरात लवकर पूर्ण करण्याकरिता प्रयत्न करण्यात येतात.

**(५)** सन २०२१-२२ पर्यंत सनियंत्रण व मूल्यमापन कक्षामार्फत एकूण ४८ मूल्यमापन अहवाल प्रसिध्द करण्यात आले आहेत.

**(६)** सन २०२२-२३ मधील Result Formework Document (RFD) ची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे.

**(७)** सन २०१७-१८ ते सन २०१९-२० या कालावधीतील मागेल त्याला शेततळे योजनेच्या मूल्यमापनाचे काम सुरू करून मूल्यमापना संदर्भातील प्रश्नावली, संकलन तक्ते जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (सर्व) यांना देण्यात आले आहेत. प्रश्नावलीच्या आधारे संकलन तक्ते भरून घेण्याचे काम सुरू आहे. तसेच जिल्ह्यांकडून प्राप्त होणारी माहिती संगणकावर एकत्रित करण्याचे काम सुरु आहे.

**(८)** सन २०१५-१६ ते सन २०१९-२० या कालावधीतील केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना प्रती थेंब अधिक पीक सूक्ष्म सिंचन या योजनेचे मूल्यमापन सुरू करण्यात आले असून प्रश्नावलीचे प्रारूप तयार करण्याचे काम सुरू आहे.

**(९)** कृषी विभागासाठी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता Key Result Area (KRA) राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आले आहे. KRA ची अंमलबजावणी सुरू आहे.

**(१०)** केंद्र शासनाच्या आकांक्षित जिल्हा कार्यक्रमाप्रमाणे आकांक्षित तालुका कार्यक्रम शासनस्तरावर घेणेचे प्रस्तावित आहे. आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत तुलनेने प्रगत नसलेल्या तालुक्याची निवड करावयाची असून याकरिता कृषी विभागाने Cropping intensity व Soil fertility index (organic carbon) हे दोन निर्देशक अंतिम करुन त्यांची तालुकानिहाय माहिती शासनास सादर करण्यात आली आहे.

## मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प

राज्यात अल्प व अत्यल्प भूधारकांची संख्या अधिक असल्याने त्यांना संघटीत करून शेतकऱ्यांचे गट व कंपन्या स्थापन करणे, गटशेतीवर भर देणे आणि त्या माध्यमातून शेतमालाचे एकत्रीकरण करून शेतकऱ्यांचा बाजार संपर्क वाढविणे यासाठी राज्यात सुमारे ५००० शेतकरी उत्पादक कंपन्या, महिलांचे ४०६ लोकसंचलीत साधन केंद्र व ११९६ प्रभाग संघ स्थापन करण्यात आलेले आहेत. महाराष्ट्रात पिकविल्या जाणाऱ्या विविध पिकांच्या कार्यक्षम मूल्यसाखळ्या विकसित करण्यामध्ये या संघटीत शेतकऱ्यांचा सहभाग घेण्यासाठी जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प राबविण्यात येत आहे.

**प्रकल्पाचे उदिष्ट :-** "राज्यात अल्प आणि अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून प्रमुख पिकांच्या स्पर्धाक्षम व समावेशी मूल्यसाखळ्या विकसित करणे"

**प्रकल्प गुंतवणूकआराखडा :-** प्रकल्पाचा कालावधी ७ वर्षे असून एकुण अंदाजित प्रकल्प खर्च रु. २१०० कोटी इतका आहे. त्यापैकी सुमारे रु. १४७० कोटी जागतिक बँक (आयबीआरडी) कडून अल्प व्याजदरांचे कर्ज व महाराष्ट्र शासनाचे रु. ५६० कोटी, तर ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन (व्हीएसटीएफ) च्या माध्यमातून खाजगी क्षेत्राचा सहभाग (सीएसआर) सुमारे रु. ७० कोटी इतका असणार आहे.

**प्रकल्प अंमलबजावणी संरचना :-** प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी कृषी विभाग हा नोडल विभाग असून त्यासह शासनाच्या सात विभागांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष (संलग्न यंत्रणांच्या माध्यमातून) सहभाग राहणार आहे. १) कृषी, २) कृषी पणन, ३) सहकार, ४) पशुसंवर्धन, ५) ग्राम विकास, ६) महिला व बाल विकास आणि ७) पुणे महानगरपालिका.

राज्यस्तरावर प्रकल्प संनियंत्रणासाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन करण्यात आली असून सर्व अंमलबजावणी यंत्रणांमध्ये योग्य समन्वयासाठी सचिव, कृषी यांच्या अध्यक्षतेखाली "स्मार्ट सोसायटी" स्थापन करण्यात आलेली आहे. या सोसायटीच्या अंतर्गत एक "प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष" आणि सर्व संलग्न विभागांमध्ये "प्रकल्प अंमलबजावणी कक्ष" स्थापन करण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर विभागीय आणि जिल्हा पातळीवरही प्रकल्प अंमलबजावणी कक्ष स्थापन करण्यात येत आहेत.

**प्रकल्पाची सद्यस्थिती :-** जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प राबविण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने दि. ११ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतलेला आहे. जागतिक बँकेसमवेत दि. २४ जानेवारी, २०२० रोजी विविध करार करण्यात आलेले आहेत. Project effectiveness date दि. २३ मार्च, २०२० आहे. जवळपास दोन वर्षापासून प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झालेली आहे.

मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पाकरिता नवीन ४६७ पदांच्या निर्मितीस मंजूरी प्रदान करणे, तसेच प्रकल्पाकरिता एकूण ५०४ पदांचा आकृतिबंध मंजूर करणेबाबतचा निर्णय दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ च्या शासन निर्णयाद्वारे घेण्यात आलेला आहे.

स्मार्ट प्रकल्पांतर्गत ३२ जिल्ह्यांतील ४२४ समुदाय आधारीत संस्थांचे उप प्रकल्प मंजूर करण्यात आलेले आहे. या पथदर्शी प्रकल्पाद्वारे अंदाजे ३ लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. समुदाय आधारीत संस्थांमध्ये शेतकरी उत्पादक कंपनी, महाराष्ट्र ग्रामीण जिवनन्नोती अभियानांतर्गत स्थापित झालेले महिला बचत गटांचे प्रभाग संघ, महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत स्थापित झालेले लोकसंचलित साधन केंद्र इ. समावेश आहे.

प्रकल्पास सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात रक्कम रु. १८.४१ कोटी अनुदान प्राप्त तसेच रु. ०.१२ कोटी मागील शिल्लक असे एकूण रु. १८.५३ कोटी अनुदानापैकी रु. ७.१६ कोटी विविध प्रकल्प घटकांवर खर्च झालेले आहेत.

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात रक्कम रु. १४२.५८ कोटीची तरतूद शासनाने केली होती त्यापैकी रु. ५०.८६ कोटी अनुदान प्राप्त तसेच रु. ११.३७ कोटी मागील शिल्लक असे एकूण रु. ६२.२३ कोटी अनुदानापैकी रु. १७.७६ कोटी विविध प्रकल्प घटकांवर खर्च झालेला आहे.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता रक्कम रु. ३२५.०० कोटीचे अंदाजपत्रक सादर करण्यात आलेले होते. त्यापैकी शासनाने रु. १००.०० कोटी श्वेतपुस्तिकेमध्ये अर्थसंकल्पीत केलेले आहेत. आज अखेर त्यापैकी रु. ७५.०० कोटी रक्कम प्राप्त झालेली असून मागील शिल्लक रु. ४४.४७ कोटी असे एकूण रु. ११९.४७ कोटींपैकी जानेवारी, २०२३ अखेर अंदाजित रु. १०१.८२ कोटी विविध प्रकल्प घटकांवर खर्च झालेले आहेत.

सन २०२२-२३ करिता रु. ३४.०० कोटी अनुदानाची पुरक मागणी शासनास सादर करण्यात आली होती, त्यास शासनाची मान्यता मिळाली आहे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता रक्कम रु. ४५२.०० कोटीचे अंदाजपत्रक शासनास सादर करण्यात आले आहे.

--------------------

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प
# Project on Climate Resilient Agriculture (PoCRA)

जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या अंमलबजावणीस दिनांक १८ मे, २०१८ पासून सुरूवात झालेली आहे. प्रकल्पाचा कालावधी सन २०१८ ते सन २०२४ पर्यंत ६ वर्षासाठी आहे. प्रकल्पाची एकूण किंमत रु. ४०००.०० कोटी असून यांमध्ये जागतिक बँकेचा वाटा रु. २८०० कोटी (७०%) व राज्य शासनाचा वाटा रु. १२०० कोटी (३०%) आहे. कृषि व पदुम विभागाकडील संदर्भीय शासन निर्णय दि. १८ जानेवारी, २०१८ अन्वये राज्यातील मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यातील ५१४२ गावे तसेच शासन निर्णय दि. १७ फेब्रुवारी, २०२२ अन्वये खान्देशातील नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यामधील सर्व गावांचा (१४२ गावे) समावेश प्रकल्पामध्ये करण्यात आलेला आहे. तसेच प्रकल्पातील ६४ गावे नगर पंचायत हद्दीत गेल्यामुळे, अन्य प्रकल्पात अधिग्रहीत झाल्याने तसेच वनग्राम घोषित झाल्यामुळे वगळण्यात आलेली आहेत. सद्यस्थितीत प्रकल्प अंमलबजावणी ५२२० गावात प्रकल्प अंमलबजावणी सुरू आहे. प्रकल्पाचा उद्देश हा "महाराष्ट्रातील निवडक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम करणे आणि शेती व्यवसाय किफायतशीर करण्यास सहाय्य करणे."

**प्रकल्पातील मुख्य घटक :**

अ. प्रकल्पाचे हवामान अनुकूल कृषी पद्धतीस प्रोत्साहन
ब. काढणी पश्चात व्यवस्थापन व हवामान अनुकूल मूल्य साखळी प्रोत्साहन
क. हवामान अनुकूल कृषी पद्धतीसाठी संस्थात्मक विकास, ज्ञान व धोरणे
ड. प्रकल्प व्यवस्थापन

**प्रकल्पातून राबविण्यात येणाऱ्या बाबी :**

प्रकल्पातून वैयक्तिक लाभाच्या बाबी तसेच शेतकरी उत्पादक कंपनी / शेतकरी गट / बचत गटांना अर्थसहाय्य, मृद व जलसंधारण कामे, शेतीशाळा, क्षमता बांधणी, कृषि-हवामान सल्ला सेवा, इ. या बाबी राबविण्यात येतात. लाभार्थी निवडीस मंजुरी निवडलेल्या गावाचे संबंधित ग्रामपंचायतीत स्थापन झालेल्या ग्राम कृषि संजीवनी समितीमार्फत देण्यात येते. प्रकल्पाचा लाभ घेणेकरिता अर्ज करणे व काम पूर्ण केल्यानंतर अर्थसहाय्याचे हस्तांतरण करणे याकरिता PoCRA-DBT हे पोर्टल कार्यरत आहे.

**प्रकल्पातून देण्यात आलेला लाभ :**

प्रकल्पातून सुमारे ४ लाख शेतकऱ्यांना रु. २६२५.६८ कोटी, सुमारे १९०५ मृद व जलसंधारण कामांकरिता रु. ३८.९५ कोटी व २६८२ कृषि व्यावसायिक प्रकल्पांना रु. २७७.८६ कोटी अर्थसहाय्य वितरित केले आहे.

जागतिक बँकेकडून मिळालेला शेरा:

जागतिक बँकेने मध्यावर्ती मूल्यमापन अहवाल व प्रकल्प प्रगतीला समाधानकारक शेरा दिला आहे.

**प्रकल्पाची वित्त विषयक माहिती :**

* सन २०२२-२३ साठी मूळ मंजूर तरतूद : रु. १२४२.५८ कोटी
* सन २०२२-२३ साठी प्राप्त निधी : रु. १११६.१६ कोटी
* सन २०२२-२३ मध्ये झालेला खर्च : रु. १०८८.७९ कोटी
* प्रकल्पावर आतापर्यंत झालेला खर्च (आज अखेर) : रु. ३३५७.११ कोटी
* जागतिक बँकेकडून आलेला परतावा (जाने. अखेर) : रु. २०१३.२० कोटी
* सन २०२३-२४ करिता प्रस्तावित अर्थसंकल्पीय तरतूद : रु. ४५०.०० कोटी

**प्रकल्पाची धोरणात्मक भागीदारी :**

ICAR IIT-Bombay, CSSRI, NBSS&LUP, TISS, YASHADA, GSDA, GIPE, कृषि विद्यापिठे, कृषि विज्ञान केंद्र.

-----------------

## महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (कृषि विद्यापिठे)

### (अ) प्रस्तावना

महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे हे चारही कृषि विद्यापीठांच्या संशोधन कार्याचा समन्वय साधण्याचे काम करते. विद्यापिठे संशोधन कार्यक्रम राबवित असतांना अधिनियम, परिनियम व राज्य शासनाचे निर्देश यांचे पालन होते किंवा नाही याचे संनियंत्रण करते. विद्यापिठांमध्ये नवीन संशोधन केंद्रे सुरू करण्यासाठी पुढाकार घेते. संशोधन प्रस्तावांची छाननी करून राज्य शासनाकडे सादर करणे तसेच विद्यापिठांच्या संशोधन परिषदांच्या बैठकांना निमंत्रित सदस्य म्हणून उपस्थित राहणे, इत्यादीबाबत कार्यवाही करते.

कृषि संचालक संशोधन समन्वय समिती विद्यापिठांच्या संशोधन कार्याचे मूल्यमापन करून अहवाल कृषि परिषदेत सादर होतो. संशोधनाशी निगडीत असलेल्या बाबींबद्दल कृषि विद्यापिठे, भारतीय कृषि अनुसंधान परिषद आणि राज्य शासन यांच्यामध्ये समन्वय संस्था म्हणून कृषि परिषद काम करते.

---

### (ब) महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संशोधन शिफारशी सन २०२०-२१

### महात्मा फुले कृषि विद्यापिठाच्या महत्त्वाच्या संशोधन उपलब्धी सन - २०२१

**प्रसारीत वाण**

**शेती पिके**

**१. ज्वारी - फुले यशोमती :** फुले यशोमती हा वाण पश्चिम महाराष्ट्रातील हलक्या जमिनीकरिता कोरडवाहू खाली फुले अनुराधाऐवजी प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

- धान्य उत्पादन - ९.२ क्विं./हे. (फुले अनुराधा पेक्षा १९.५ टक्के जास्त आणि मालदांडी (एम ३५-१) पेक्षा १७.९ टक्के पेक्षा जास्त)
- चारा उत्पादन - ४२.६ क्विं./हे. (फुले अनुराधा पेक्षा ९.८ टक्के जास्त आणि मालदांडी (एम ३५-१) पेक्षा ४.७ टक्के पेक्षा जास्त)
- शुभ्र पांढऱ्या आकाराचे गोलाकार दाणे
- पक्वता कालावधी - ११२ ते ११५ दिवस
- पश्चिम महाराष्ट्रातील जिरायत क्षेत्रातील उथळ जमिनींसाठी शिफारस

**२. गहू-फुले अनुपम (एन.आय.ए.डब्ल्यू-३६२४) :** गव्हाचा सरबती वाण फुले अनुपम (एन.आय.ए.डब्लू-३६२४) हा महाराष्ट्रात वेळेवर पेरणीसाठी, नियंत्रीत पाण्यावर पेरणीसाठी शिफारस करण्यात येत आहे.

- उत्पादन - ३०-३५ क्विं./हे. (एका ओलिताखाली) (तुल्य वाण एनआयएडब्लू - १४१५ पेक्षा २२% जास्त उत्पादन)
- चपातीसाठी उत्तम सरबती वाण, आकर्षक टपोरे दाणे, प्रथिने - ११.४%
- पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता
- तांबेरा रोगास प्रतिकारक
- पक्वता कालावधी - १०५ ते ११० दिवस
- महाराष्ट्रात एका ओलिताखाली, वेळेवर पेरणीसाठी शिफारसीत

**३. करडई : फुले गोल्ड (एस.एस.एफ.-१५-६५) :** करडईच्या फुले गोल्ड (एस.एस.एफ.-१५-६५) या वाणाची भारतातील विभाग-१ (महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तेलंगना) मधील करडई लागवड क्षेत्रात प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

- बियाण्याचे उत्पादन- १६६५ किलो/हे.
- सर्वाधिक तेलाचे प्रमाण- ३४.६ टक्के (ए १ तुल्य वाणापेक्षा २५ टक्के जास्त)
- मर रोगास मध्यम प्रतिकारक
- कालावधी- १२०-१२५ दिवस
- महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा राज्यांतील जिरायत तसेच ओलिताखालील करडई लागवड क्षेत्रासाठी देश पातळीवर प्रसारित

**४. करडई : फुले किरण (एस.एस.एफ.-१६-०२) :** करडईच्या फुले किरण (एस.एस.एफ.-१६-०२) या वाणाची भारतातील (महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तेलंगना, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड) या करडई लागवड क्षेत्रात लागवडीसाठी प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

- बियाण्याचे उत्पादन- २०५४ किलो/हे. (ए १ या तुल्य वाणापेक्षा १० टक्के जास्त)
- सर्वाधिक तेलाचे प्रमाण- ३०.५५ टक्के (ए १ या तुल्य वाणापेक्षा १९.९२ टक्के जास्त)
- कालावधी- १२५-१३० दिवस
- जिरायत तसेच ओलिताखालील करडई लागवड क्षेत्रासाठी देश पातळीवर प्रसारित

**५. तीळ : फुले पूर्णा (जे.एल.टी. ४०८-२) :** तीळ पिकाच्या, फुलेपूर्णा (जे.एल.टी. ४०८-२) या वाणाने उन्हाळी हंगामात अधिक उत्पादन दिले असून प्रचलितवाणापेक्षा सरस आढळून आला आहे. हा वाण महाराष्ट्रातील खानदेश, आणि लगतच्या विदर्भ आणि मराठवाडा विभागातील जिल्ह्यांसाठी उन्हाळी हंगामासाठी प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

- अधिक उत्पादन - ७०५ क्विं./हे. (तुल्य वाण जे.एल.टी. ४०८ आणि टी.के.टी. २२ पेक्षा अनुक्रमे २३% व १४% जास्त)
- तेलाचे अधिक प्रमाण- ४९.०२%
- टपोरे पांढरे दाणे
- महाराष्ट्रातील खानदेश आणि लगतच्या विदर्भ आणि मराठवाडा विभागातील जिल्ह्यासाठी उन्हाळी हंगामासाठी प्रसारित

**६. उडिद : फुले वसु (पियु-०६०९-४३) :** उडिदाचा फुले वसु (पियु-०६०९-४३) अधिक उत्पादन देणाऱ्या वाणाची महाराष्ट्रासाठी लागवडीकरिता प्रसारित करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

- उत्पादन - ८५९ क्विं./हे. (तुल्य वाण टी.पी.यु.-४ पेक्षा १६.३९% जास्त आणि बी.डी.यु.-१ पेक्षा २२.०३% जास्त)
- लवकर पक्व होणारा वाण (कालावधी ७३ दिवस), टपोरे दाणे
- भुरी व पिवळा विषाणू यांना साधारण प्रतिकारक
- महाराष्ट्र राज्यात लागवडीसाठी शिफारस

**७. सोयाबिन : फुले दुर्वा (केडीएस-९९२) :** फुले दुर्वा (केडीएस ९९२) हा सोयाबीन वाण दक्षिण महाराष्ट्रात खरीब हंगामात लागवडीसाठी प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे. हा वाण राष्ट्रीय पातळीवर दक्षिण महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा आणि तामिळनाडू या राज्यांसाठी प्रसारित करण्यात आला आहे.

उत्पादन : २५ ते ३० क्विं./हे.

(तुल्य वाण जेएस ९३०५ पेक्षा ३४% आणि फुले अग्रणी पेक्षा २५% जास्त)

- तेलाचे प्रमाण : १८.२५%
- कालावधी : १०० ते १०५ दिवस
- तांबेरा, जांभळे दाणे आणि जिवाणूजन्य ठिपके या रोगांस कमी बळी पडते.
- दक्षिण महाराष्ट्र, तेलंगणा, कर्नाटक, आंध्र व तामिळनाडू राज्यांसाठी शिफारस

**८. ऊस : फुले ११०८२ (कोएम ११०८२) :** उसाचा लवकर पक्व होणारा वाण कोएम ११०८२ (फुले ११०८२) महाराष्ट्र राज्यात सुरू आणि पूर्व हंगामात लागवडीसाठी प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

- अधिक उत्पादन - सुरु - १०७ टन/हे. पूर्व हंगामी - ११८ टन/हे. (तुल्य वाण- को. सी. ६७१ पेक्षा - १५.४०% जास्त)
- लवकर पक्व होणारा (कालावधी - १२ महिने)
- साखरेचे प्रमाण- १९.८७%
- मर आणि लाल कुज रोगांना मध्यम प्रतिकारी, चाबूक कानी, पाने पिवळी पडणाऱ्या (वाय.एल.डी.) रोगांना प्रतिकारक
- महाराष्ट्र राज्यासाठी सुरू आणि पूर्व हंगामात लागवडीसाठी प्रसारित

**उद्यानविद्या पिके**

**९. पेरू - फुले अमृत (जीकेजीएस-पी-०१-१०) :** चमकदार हिरवट पिवळसर फळे, लाल रंगाचा गर, मध्यम बियांची संख्या, मध्यम मऊ बी आणि अधिक उत्पादनासाठी निवड पद्धतीने विकसित पेरूचा फुले अमृत (जीकेजीएस-पी-०१-१०) हा वाण महाराष्ट्रात लागवडीसाठी प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

- उत्पादन- १२.७३ किलो/झाड, २१.२७ टन/हे. (झाडाचे वय-१२ वर्षे)
- मध्यम आकाराची फळे (२१०.६७-२२२.३३ ग्राम)

● लाल रंगाचा गर (लायकोपेन रंगद्रव - ४.८३ मि. ग्रॅम प्रती १०० ग्रॅम), फळाची साल चमकदार व गुळगुळीत, खाण्या योग्य पक्वतेची फळे हिरवट, फळांच्या सालीची जाडी- १.०३ से.मी., बियांचा कठीणपणा- मऊ, बियांची संख्या-मध्यम

● महाराष्ट्र राज्यासाठी प्रसारित

**१०. चिंच - फुलेश्रावणी (आरएचआरटी-१४) :** अधिक उत्पादन, फळांचा आकर्षक तपकिरी रंग, किंचित वक्र, चवीला मध्यम गोड आणि गराचे भरपूर प्रमाण अशी वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म असणारा चिंचेचा फुलेश्रावणी (आर.एच.आर.टी.-१४) हा वाण महाराष्ट्रात लागवडीसाठी प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

● उत्पादन- ७८.४४ कि./झाड, २९.७३ टन/हे. (झाडाचे वय - ३१ वर्षे)

● चवीला मध्यम गोड (३४.७८० ब्रिक्स)

● गराचे प्रमाण भरपूर (६२.२३ %)

● नियमित फळधारणा, फळांचा आकार मोठा (एका फळाचे वजन २६.८६ ग्राम), झाडे निमपसरी

● महाराष्ट्र राज्यासाठी प्रसारित

**कृषि यंत्रे औजारे - ०१**

**फुले ऑटोमॅटिक पलटी नांगर :** सुलभपणे नांगरणी करण्याकरिता श्रम, वेळ व पैशांची बचत करण्यासाठी ट्रॅक्टरचलित फुले ऑटोमॅटिक पलटी नांगर प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

● नांगर ४० व त्यापेक्षा जास्त अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरने चालविता येतो.

● ट्रॅक्टरच्या पोजिशन कंट्रोल लिव्हरने अटोमॅटिक पल्टी करता येतो

● प्रक्षेत्रिय कार्यक्षमता ८०.४५ % इतकी आहे

● हायड्रोलिक नांगराच्या किमतीपेक्षा २०% कमी किंमत

● हलक्या मध्यम व भारी जमिनीकरिता उपयुक्त

**पिक उत्पादन तंत्रज्ञान शिफारशी**

**नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापन**

१. महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण विभागातील लिंबू पिकावरील नाग अळीच्या प्रादुर्भावाची हवामान घटकावर आधारित एक आठवडा आधी पूर्वसुचना देण्यासाठी खालील प्रतिगमन सुत्राची शिफारस करण्यात येत आहे.

**सुत्र : मागील १० वर्षाच्या हवामान निरीक्षणानुसार**

नाग अळी (नागमोडी चट्टे/झाड) = २१३.१३ x ०.१५ x किमान तापमान - २.११ x दुपारची आर्द्रता + ०.२३ x पाऊसमान-१०.४१ x प्रखर सूर्यप्रकाशाचे तास

याठिकाणी,

नाग अळी = नागमोडी चट्ट्यांची संख्या/झाड (सूत्रामध्ये)

किमान तापमान (अंश सेंटीग्रेड)

दुपारची आर्द्रता (टक्के)

पाऊसमान (मीमी) आणि

प्रखर सूर्यप्रकाशाचे तास (तास)

२. पश्चिम महाराष्ट्रातील बटाटा पिकावरील माव्याच्या प्रादुर्भावाची हवामान घटकावर आधारित एक आठवडा आधी पूर्वसुचना देण्यासाठी खालील प्रतिगमन सुत्राची शिफारस करण्यात येत आहे.

**सूत्र: मागील १० वर्षाच्या हवामान निरीक्षणानुसार**

मावा (माव्याची संख्या/पान/झाड) = ६५९.१३- ८९.३२ x कमाल तापमान + १०.७४ x किमान तापमान + २०.७६ x सकाळची आर्द्रता + ६१.७८ x वाऱ्याची गती

याठिकाणी,

मावा + माव्याची संख्या/पान/झाड (सुत्रामध्ये)

कमाल तापमान (अंश सेंटीग्रेड)

किमान तापमान (अंश सेंटीग्रेड)

सकाळची आर्द्रता (टक्के) आणि

वाऱ्याची गती (कि.मी./तास)

३. पश्चिम महाराष्ट्रातील गहू पिकावरील माव्याच्या प्रादुर्भावाची हवामान घटकावर आधारित एक आठवडा आधी पूर्वसुचना देण्यासाठी खालील प्रतिगमन सुत्राची शिफारस करण्यात येत आहे.

**सुत्र: मागील १० वर्षाच्या हवामान निरीक्षणानुसार**

मावा (माव्याची संख्या/फांदी/झाड) = २००.७० - १५.६५ x कमाल तापमान + ३.१२ सकाळची आर्द्रता + ३८.२५ x वाऱ्याची गती - २.९१ x बाष्पीभवन

याठिकाणी,

मावा =माव्याची संख्या/फांदी/झाड (सुत्रामध्ये)

कमाल तापमान (अंश सें.)

सकाळची आर्द्रता (टक्के)

बायाची गती (कि.मी / तास) आणि

बाष्पीभवन (मिमी)

४. पश्चिम महाराष्ट्रातील मध्यम खोल काळ्या जमिनीत बागायती मारवेल गवताच्या अधिक उत्पादन व आर्थिक फायद्यासाठी खालील खतमात्रेची शिफारस करण्यात येत आहे.

- लागवडीपूर्वी शेणखत १० टन प्रती हेक्टरी द्यावे.
- एकूण खतमात्रा १६०:४०:२० किलो नत्र: स्फुरद: पालाश प्रती हेक्टरी प्रती वर्ष द्यावे.
- यापैकी संपूर्ण स्फुरद व पालाश लागवडीच्या वेळी व प्रती वर्षी द्यावे. नत्र आठ समान हप्त्यात २० किलो प्रती हेक्टर लागवडीच्यावेळी व प्रत्येक कापणीनंतर ४५ दिवसांच्या अंतराने द्यावे.

५. उत्तर महाराष्ट्रातील हमखास पावसाच्या प्रदेशात, खरीप भुईमुगाचे अधिक उत्पादन आणि आर्थिक फायदा मिळविण्यासाठी फुले मोरणा / फुले वारणा या वाणांची पेरणी ६७ किलो / हेक्टर बियाणे वापरुन ४५ x १० से. मी. या अंतरावर पेरणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

६. उत्तर महाराष्ट्रातील हमखास पावसाच्या प्रदेशात, खरीप भुईमुगाचे अधिक उत्पादन आणि आर्थिक फायदा मिळविण्यासाठी भुईमुग + तूर (४:२) आंतरपिक आणि भुईमुग-हरभरा या पीक पद्धतींची शिफारस करण्यात येत आहे.

७. पश्चिम महाराष्ट्रात, उन्हाळी भुईमुगाचे अधिक उत्पादन आणि आर्थिक फायदा मिळविण्यासाठी भुईमुगाला १०० टक्के शिफारशीत खत मात्रा (२५ किलो नत्र + ५० किलो स्फुरद / हेक्टर) पेरणीच्यावेळी देऊन बायोग्रोची (सुडोमोनास, बौसिलस व यिस्ट) ५० मिली / १० किलो बियाण्यास २०० मिली पाण्याबरोबर बीज प्रक्रिया करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

८. पश्चिम महाराष्ट्रात उन्हाळी भुईमुगाचे अधिक उत्पादन आणि आर्थिक फायदा मिळविण्यासाठी भुईमुगाला ७५ टक्के शिफारशीत खतमात्रा (२० किलो नत्र + ४० किलो स्फुरद / हेक्टरी) पेरणीच्यावेळी देऊन पेरणीनंतर ४५ आणि ६० दिवसांनी २ टक्के, १९:१९:१९ या विद्राव्य खताची फवारणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

९. पश्चिम महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण विभागतील मध्यम खोल काळ्या जमिनीमध्ये रब्बी सूर्यफुलाचे अधिक उत्पादन आणि आर्थिक फायद्यासाठी तसचे जमिनीचे आरोग्य टिकविण्यासाठी खरीप हंगामामध्ये उडीद हिरवळीचे खत म्हणून उडीद गाडावात्र पेरणीच्यावेळी पीक जमिनीनीमध्ये गाडून सूर्यफुल बियाण्यास अँझोटोबॅक्टर आणि अझोस्पिरीलीयम जिवाणू खताची प्रत्येकी २५ ग्रॅम प्रति किलो बिजप्रक्रिया करून शिफारशीत नत्र खताच्या अर्धे नत्र (२५ किलो), संपूर्ण स्फुरद (२५) किलो) व पालाश (२५ किलो) प्रति हेक्टरी पेरणीवेळी देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१०. पश्चिम महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण विभागामध्ये गंधकाची कमतरता असलेल्या मध्यम खोल काळ्या जमिनीत जवस पिकाच्या अधिक उत्पादन व आर्थिक फायद्यासाठी शिफारशीत नत्र:स्फुरद:पालाश (२५:५०:०० किलो/ हेक्टरी) खताबरोबर गंधक ४० किलो/ हेक्टर २.५ टन शेणखतामध्ये मिसळून पेरणीपूर्वी १५ दिवस अगोदर देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

११. पेरभातातील तणांच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी, अधिक धान्य उत्पादन व आर्थिक मिळकतीकरिता पेरणीनंतर २ ते ३ दिवसांत उगवणपूर्व प्रेटीलाक्लोर ३०.७ टक्के ई.सी. @ १.५ लिटर प्रती हेक्टर आणि पेरणीनंतर २५ दिवसांनी उगवण पश्चात बिसस्पॅरीबॅक १० टक्के एस.सी. @ २०० मिली प्रति हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१२. महाराष्ट्रातील उपपर्वतीय विभागात शाश्वत उत्पादन व आर्थिक फायदा तसेच जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी खरीप पुनर्लागवड भात पिकानंतर उपलब्ध ओलाव्यावर कमीत कती मशागत तंत्रज्ञान आधारित हरभरा या पिकाची लागवड करण्याची शिफारस करण्यात येते.

१३. महाराष्ट्राच्या उपपर्वतीय विभागात लागवड पद्धतीच्या भात शेतीमध्ये तणांच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी, अधिक धान्य उत्पादन व आर्थिक मिळकतीकरिता पुनर्लागवडीनंतर ३ ते ५ दिवसांनी उगवणपूर्व पायराझोसल्फुरोन इथाईल १० टक्के डब्ल्यू.पी. १०० ग्रॅम प्रती हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारण्याची आणि त्यानंतर ४५ दिवसांनी एक खुरपणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१४. पश्चिम महाराष्ट्रातील रब्बी कांदा पिकाचे अधिक उत्पादन, पाण्याचा कार्यक्षम वापर व साठवणुकीतील नुकसान कमी करण्यासाठी ठिबक सिंचन पद्धत वापरण्याची व पीक लागवडीनंतर १०० दिवसांनी पाणी बंद करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१५. पश्चिम महाराष्ट्रातील मध्यम खोल काळ्या जमिनीत अधिक कांदा बीजोत्पादन तसेच पाण्याचा व खताचा कार्यक्षम वापर होऊन आर्थिकदृष्ट्या फायदेशीर उत्पन्न मिळविण्यासाठी शिफारशीत खत मात्रेच्या ८० टक्के (९६ : ४८ : ४८, नत्र:स्फुरद:पालाश किलो/ हेक्टर) विद्राव्य स्वरुपातील खतामधून सोबत दिलेल्या तक्त्याप्रमाणे १५ हप्त्यात आठवड्याच्या अंतराने ठिबक सिंचनातून देण्याची शिफारस करण्यात येते.

| लागवडी नंतरचा | नत्राचे प्रमाण | | स्फुरदाचे प्रमाण | | पालाशचे प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|---|
| कालावधी (आठवडे) | टक्के | कि.प्रति हे. | टक्के | कि.प्रति हे. | टक्के | कि.प्रति हे. |
| १-२८ (४ आठवडे) | २५ | २४.० | ३० | १४.४ | १५ | ७.२ |
| २९-५६ (४ आठवडे) | ३० | २८.८ | ३५ | १६.८ | ३५ | १६.८ |
| ५७-८४ (४ आठवडे) | ३० | २८.८ | २५ | १२.० | ३० | १४.४ |
| ८५- १०५ (३ आठवडे) | १५ | १४.४ | १० | ४.८ | २० | ९.६ |
| | १०० | ९६ | १०० | ४८ | १०० | ४८ |

१६. पश्चिम महाराष्ट्रातील मध्यम खोल काळ्या जमिनीत उन्हाळी भेंडीचे अधिक उत्पादन तसेच पाण्याचा व खताचा कार्यक्षम वापर होऊन आर्थिकदृष्ट्या फायदेशीर उत्पन्न मिळण्यासाठी शिफारशीत खत मात्रेच्या ८० टक्के (८०:४०:४० किलो, नत्र : स्फुरद : पालाश / हेक्टर) विद्राव्य स्वरुपातील खतामधून सोबत दिलेल्या तक्त्याप्रमाणे १२ हप्त्यात आठवड्याच्या अंतराने ठिबक सिंचनातून देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

| लागवडी नंतरचा | नत्राचे प्रमाण | | स्फुरदाचे प्रमाण | | पालाशचे प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|---|
| कालावधी (आठवडे) | टक्के | कि.प्रति हे. | टक्के | कि.प्रति हे. | टक्के | कि.प्रति हे. |
| १-२१ (३ आठवडे) | २५ | २० | २० | ०८ | १५ | ०६ |
| २२-४२ (३ आठवडे) | ३५ | २८ | ४० | १६ | २५ | १० |
| ४३-६३ (३ आठवडे) | २५ | २० | २५ | १० | ३० | १२ |
| ६४-८४ (३ आठवडे) | १५ | १२ | १५ | ०६ | ३० | १२ |
| | १०० | ८० | १०० | ४० | १०० | ४० |

१७. पश्चिम महाराष्ट्रातील हलक्या ते खोल काळ्या जमिनीत कापूस, बाजरी, मका, गहू, मकाचारा, कडवळ, तूर, हरभरा, भुईमूग, कोबी, कांदा व भेंडी या बागायती पिकांसाठी अधिक उत्पादन, अन्नद्रव्याचे शोषण आणि आर्थिक फायद्यासाठी पिकाच्या शिफारसीत खत मात्रेच्या २५ टक्के नत्र है शहरी कंपोस्ट खताद्वारे पेरणी/ लागवडीपुर्वी एक आठवडा व उर्वरित ७५ टक्के नत्र युरीयामधून आणि स्फुरद व पालाश शिफारसीप्रमाणे पेरणीच्यावेळी रासायनिक खताद्वारे देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**टीप :** शेतीमध्ये विविध पिकाच्या उत्पादनासाठी शहरी कंपोस्टचा वापर करण्यापूर्वी प्रयोगशाळेत पृथ:करण करुन त्यामध्ये जड धातुचे प्रमाण खत नियंत्रण आदेशाच्या नियमावलीप्रमाणे पडताळणी करुनच वापरावे.

१८. पश्चिम महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण विभागामध्ये गंधकाची कमतरता असलेल्या मध्यम खोल काळ्या जमिनीत करडईच्या अधिक उत्पादन व आर्थिक फायद्यासाठी शिफारशीत नत्र: स्फुरद (५०:२५ कि./हे.) खताबरोबर मुलभूत गंधक ४० कि./हे. एक टन शेणखतामध्ये मुरवून पेरणीपुर्वी पंधरा दिवस अगोदर देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१९. पश्चिम महाराष्ट्रातील मध्यम काळ्या जमिनीमध्ये तुळस या औषधी वनस्पतीच्या वाळलेल्या झाडपाल्याच्या अधिक उत्पादन व आर्थिक फायद्यासाठी या पिकास १० टन/ हेक्टर शेणखतासह नत्र, स्फुरद आणि पालाश प्रत्येकी ४०:३०:२० कि./हेक्टर पैकी अर्धे नत्र आणि संपूर्ण स्फुरद, पालाश पुनर्लागवडीच्यावेळी आणि उर्वरित अर्धे नत्र लागवडीनंतर ३० दिवसांनी देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२०. पश्चिम महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण विभागातील मध्यम खोल काळ्या जमिनीत करडईचे अधिक उत्पादन आणि आर्थिक फायद्यासाठी शिफारशीत खत मात्रेसोबत नत्र व स्फुरद (५०:२५ कि./हे.) आणि दोन टक्के १९:१९:१९ विद्राव्य खताची फवारणी, रोझेट अवस्था (पेरणीनंतर २५-३० दिवसांनी), कळी अवस्था (पेरणीनंतर ४५-५० दिवसांनी) यावेळी ओलावा ताण अवस्थेत देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२१. महाराष्ट्रातील पश्चिम घाट विभागात जस्त व बोरॉनची कमतरता असलेल्या जमिनीत पुनर्लागवड भात पिकाचे अधिक उत्पादन व आर्थिक फायद्यासाठी, भात लागवडीच्या एक महिना आधी हेक्टर १० टन शेणखत व लागवडीच्या वेळेस हेक्टरी ६० किलो नत्र, ३० किलो स्फुरद, ४.२ किलो जस्त (२० किलो झिंक सल्फेट) व ०.६६ किलो बोरॉन (६ किलो बोरॅक्स) खतांच्या ब्रिकेट्स ग्रॅम गवार डिंक प्रति किलो ब्रिकेट्स लावलेले आणि ५० किलो पालाश देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२२. पश्चिम महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण विभागामध्ये मध्यम खोल काळ्या जमिनीत हरभरा पिकाच्या अधिक उत्पादन व आर्थिक फायद्यासाठी शिफारशीत खत मात्रा नत्र: स्फुरद (२५:५० कि./हे.) आणि ५ टन शेणखत तसेच ५० टक्के घाटे लागण्याच्या अवस्थेत २.० टक्के डायअमोनियम फॉस्फेट द्रावणाची फवारणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**उद्यानविद्या**

२३. महाराष्ट्रातील केशर जातीच्या आंब्याच्या जुन्या, कमी उत्पादन देणाऱ्या, घन पद्धतीने (५ x ५ मीटर) लागवड केलेल्या बागाची झाडे अधिक उत्पादनाकरिता नोव्हेंबर - डिसेंबर महिन्यात जमिनीपासून १.५ मीटर उंचीवर छाटण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२४. खरीप कांद्याचे अधिक उत्पादन आणि आर्थिक फायद्यासाठी रोपवाटीकेत कांदा बियाणे पेरणीनंतर ३० दिवसांनी व कादा पुनर्लागवडीनंतर अनुक्रमे २०, ४०, ६० दिवसांनी सिलीसिक ॲसिड २.० मिली प्रती लिटर याप्रमाणे शिफारशीत खतमात्रे सोबत (१०० : ५० : ५० कि./हे. नत्र:स्फुरद: पालाश + २० टन/हे. शेणखत) फवारणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**मुलभूत शास्त्रे, अन्नशास्त्र व जैव तंत्रज्ञान**

२५. हवामान बदलास प्रतिरोधक सोयाबीन वाणांचा पैदास कार्यक्रम गतीशील होण्याकरिता सोयाबीन पिकाची वाढ संपूर्ण झाल्यानंतरच फुलोरा येणे या गुणधर्माची अचुक चाचणी सॅट १९७$_{१७९बीपी}$ आणि सॅट ०६३$_{११६बीपी}$ या एसएसआर मार्करच्या सहाय्याने घेण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२६. कापणीस उशीर झालेल्या ७० दिवसाच्या आतील फुले गुणवंत या संकरीत नेपियर बाणाच्या चाऱ्यात २ टक्के गुळाच्या द्रावणाचा वापर करून उत्तम प्रतीचा मुरघास तयार करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२७. रसाची गाळप क्षमता व २ तासांच्या कालावधीतील रसाच्या टिकवण गुणवत्तेचे जैव रासायनिक घटकाच्या आधारे विश्लेषण केले असता, पीडीएन-१५०१२ हे जीनप्रारूप विशेषत: रसवंतीसाठी योग्य असल्याची शिफारस करण्यात येत आहे.

२८. औषधी वनस्पतीच्या पावडर पासून अधिक तंतुमय पदार्थ असणारी कुकीज तयार करण्यासाठी शतावरी ६ टक्के किंवा अश्वगंधा ६ टक्के किंवा पुदिना ४ टक्के किंवा आवळा ५ टक्के किंवा बेहडा ५ टक्के, मैद्यामध्ये मिसळून, मैदा १००० ग्रॅम, ५०० ग्रॅम साखर, ५०० ग्रॅम वनस्पती तूप, ५ ग्रॅम अमोनियम बायकार्बोनेट व ५ ग्रॅम सोडियम बायकार्बोनेट वापर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२९. कोद्रा तृणधान्यांच्या पिठापासून पोषणमूल्ययुक्त अधिक तंतुमय पदार्थ असणारी उत्तम प्रकारच्या कुकीज किंवा बिस्कीट तयार करण्यासाठी कोद्राचे पीठ ५०० ग्रॅम व मैदा ५०० ग्रॅम, ५०० ग्रॅम साखर, ५०० ग्रॅम वनस्पती तूप, ५ ग्रॅम अमोनियम बायकार्बोनेट, ५ ग्रॅम सोडियम बायकार्बोनेट वापर करण्याची शिफारस करण्यात येत आहे..

**पीक संरक्षण**

३०. कांदा पिकावरील अल्टरनेरीया बुरशीमुळे उद्‌भवणाऱ्या करपा रोगाच्या परिणामकारक व्यवस्थापनासाठी आणि किफायतशीर उत्पादनासाठी कांदा रोपांची मुळे पुनर्लागवडीच्यावेळी सिलिसिक ॲसिड २.० मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून पाच मिनीटे बुडवून रोपाची लागवड करावी तदनंतर पिक २०, ४० आणि ६० दिवसाचे असताना सिलिसिक ॲसिडची फवारणी २ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून करावी.

३१. महाराष्ट्राच्या अवर्षणप्रवण विभागातील कोरडवाहू रब्बी ज्वारीचे आणि कडब्याचे किफायशीर उत्पादन घेण्यासाठी आणि ५० टक्के नत्र व २५ टक्के स्फुरद या रासायनिक खताची बचत करण्यासाठी बियाणे पेरणीपूर्वी प्रती लिटर पाण्यात ३० मिली मफुकृवि द्रवरुप सिटोबॅक्टर आणि ३० मिली मफुकृवि द्रवरुप स्फुरद विघटक जीवाणू (पीएसबी) या प्रमाणात मिसळून तयार केलेल्या द्रावणात १२ तास बुडवून पेरणी करावी आणि शिफारशीच्या ५० टक्के नत्र (२५ किलो/हेक्टर), ७५ टक्के स्फुरद (१८ किलो/हेक्टर) आणि १०० टक्के पालाश (२५ किलो/हेक्टर) वापरावे.

**कृषि अभियांत्रिकी**

३२. महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यासाठी धुप सुत्राने जमिनीची धुप काढण्यासाठी तालुका निहाय धुप गुणांक नकाशाची शिफारस करण्यात येत आहे.



३३. जमिनीची धुप मोजण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या सुधारीत धुप मोजमाप समीकरण $Sy = K_1 (Qq_p)^m$ KLSCP मधील $K_1$ आणि m च्या अमेरिकेतील निरिक्षणाद्वारे ठरविलेल्या ११.८ mm आणि ०.५६ या गुणांका ऐवजी सलग उतारासाठी ०.०३९ व ०.१३५, बर्हिगोल आंतरगोल उताराकरिता ०.०७६ ब ०.०३ आणि आंतरगोल बर्हिलगोल उतारासाठी ३५.४९ व १.३२ अशा - बदलाव्यात अशी शिफारस करण्यात येत आहे.

३४. सोलापूर जिल्ह्यासाठी पावसाची तीव्रता वारंवारिता आणि कालावधी यातील संबंध दर्शविणारे समीकरण,

$$\text{पावसाची तीव्रता (सें.मी. / तास)} = \frac{\text{के (परतीचा कालावधी, वर्षे)}^{\text{ए}}}{\text{(पावसाचा कालावधी, तास + बी)}^{\text{डी}}}$$

या समीकरणातील के,ए,बी, आणि डी या गुणांकामध्ये संवेदनशीलता विश्लेषणानुसार दर पाच वर्षांनी सुधारणा करण्याच्या शिफारशीनुसार या गुणांकामध्ये अनुक्रमे ४.५७, ०.१९३४, ०.४० आणि ०.९१८७ अशी सुधारणा करण्याची शिफारस करण्यात येत आहेत.

३५. वर्तमान कृषी यांत्रिकीकरणाचे सर्वेक्षण करणे आणि पिके, कार्य आणि प्रकारानुसार कृषी यंत्राची माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी "फुले-सन्मान" या मोबाईल ॲपचा वापर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३६. शेतकरी आणि कृषी यांत्रिकी सेवा पुरवठादारांचा भाडे तत्वावर यंत्रे, दुरुस्ती आणि विक्रीसाठी समन्वय करुन देण्याकरिता "फुले-सॅम" या मोबाईल ॲपचा वापर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३७. सिंचनाचे वेळापत्रक ठरविण्यासाठी लागणाऱ्या प्रत्यक्ष-वेळ व विशिष्ट स्थानाचे बाष्पपर्णोत्सर्जन जाणून घेण्यासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठाने विकसीत केलेले "Spatial ETr" या वेब आणि मोबाईल आधारित प्रणाली वापर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३८. पश्चिम महाराष्ट्रातल्या तालुक्यांसाठी भुईमुग व वांगी पिकाला, प्रवाही व ठिबक सिंचन पद्धतीद्वारे ठराविक ठिकाणची आठवडानिहाय पाण्याची व सिंचनाची गरज काढण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसित केलेले तक्ते आणि भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) मध्ये विकसित केलेले नकाशे वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३९. सोयाबीन पिकाची पाण्याची गरज निश्चित करण्यासाठी खालील तक्त्यात नमूद केलेल्या पीक गुणांकाचा वापर करण्याची शिफारस देण्यात येत आहे.

| पेरणी नंतरचा आठवडा | पीक गुणांक |
|---|---|
| १ | ० ५६ |
| २ | ०.६१ |
| ३ | ०.६८ |
| ४ | ०.७७ |
| ५ | ०.८७ |
| ६ | ०.९७ |
| ७ | १.०५ |
| ८ | १.१० |
| ९ | १.१२ |
| १० | १.०९ |
| ११ | १.०१ |
| १२ | ०.९० |
| १३ | ०.७६ |
| १४ | ०.६२ |
| १५ | ०.५० |
| १६ | ०.४५ |

वरील तक्त्याला पर्याय म्हणून खालील सूत्राची शिफारस करण्यात येते.

पीकगुणांक

$$\text{१०.८४}\left(\frac{\text{ट}}{\text{ठ}}\right)\text{५+१७.०६३}\left(\frac{\text{ट}}{\text{ठ}}\right)\text{४+२.३९४९}\left(\frac{\text{ट}}{\text{ठ}}\right)\text{३+३.४९११}\left(\frac{\text{ट}}{\text{ठ}}\right)\text{२+०.२३६९}\left(\frac{\text{ट}}{\text{ठ}}\right)\text{+०.५४८२}$$

ट = पेरणीपासूनचा दिवस

ठ = पीक कालावधी

४०. राहुरी भागासाठी फुलकोबी, लसूण, टरबूज व काकडी या पिकाची पाण्याची गरज निश्चित करण्यासाठी खालील तक्त्यात नमूद केलेले एफएओचे सुधारित पिक गुणांक वापर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

| फुलकोबी | | लसूण | | टरबूज | | काकडी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| लागवडी नंतरचा आठवडा | सुधारीत पीक गुणांक | पेरणी पश्चात आठवडा | सुधारीत पीक गुणांक | पेरणी पश्चात आठवडा | सुधारीत पीक गुणांक | पेरणी पश्चात आठवडा | सुधारीत पीक गुणांक |
| १ | ०.७२ | १ | ०.७३ | १ | ०.७८ | १ | ०.७७ |
| २ | ०.७५ | १ | ०.७४ | २ | ०.८० | २ | ०.७८ |
| ३ | ०.७८ | ३ | ०.७६ | ३ | ०.८३ | ३ | ०.८१ |
| ४ | ०.८२ | ४ | ०.७७ | ४ | ०.८७ | ४ | ०.८४ |
| ५ | ०.८६ | ५ | ०.७९ | ५ | ०.९० | ५ | ०.८७ |
| ६ | ०.९० | ६ | ०.८१ | ६ | ०.९४ | ६ | ०.९० |
| ७ | ०.९४ | ७ | ०.८३ | ७ | ०.९८ | ७ | ०.९४ |
| ८ | ०.९८ | ८ | ०.८५ | ८ | १.०१ | ८ | ०.९८ |
| ९ | १.०१ | ९ | ०.८८ | ९ | १.०३ | ९ | १.०१ |
| १० | १.०३ | १० | ०.९० | १० | १.०४ | १० | १.०३ |
| ११ | १.०४ | ११ | ०.९३ | ११ | १.०३ | ११ | १.०५ |
| १२ | १.०४ | १२ | ०.९५ | १२ | १.०१ | १२ | १.०७ |
| १३ | १.०२ | १३ | ०.९८ | १३ | ०.९८ | १३ | १.०७ |
| १४ | ०.९८ | १४ | ०.९९ | १४ | ०.९४ | १४ | १.०६ |
| | | १५ | १.०० | १५ | ०.८९ | १५ | १.०४ |
| | | १६ | ०.९९ | १६ | ०.८४ | १६ | १.०१ |
| | | १७ | ०.९७ | | | १७ | ०.९७ |
| | | १८ | ०.९३ | | | १८ | ०.९२ |
| | | १९ | ०.८६ | | | १९ | ०.८७ |
| | | २० | ०.७६ | | | १९ | ०.८७ |

वरील तक्त्याला पर्याय म्हणून खालील सूत्राची शिफारस करण्यात येते.

| पीक | बहुपद सूत्र |
|---|---|
| फुलकोबी | पीकगुणांक = ३.४४४६ $\left(\frac{ट}{ठ}\right)$५-८.७६८३$\left(\frac{ट}{ठ}\right)$४+६.४६६९ $\left(\frac{ट}{ठ}\right)$ ३-१.४४१७ $\left(\frac{ट}{ठ}\right)$ २+०.५९९८ $\left(\frac{ट}{ठ}\right)$+०.६४८३ |
| लसूण | पीकगुणांक = २.६४६६ $\left(\frac{ट}{ठ}\right)$४+३.१०८९$\left(\frac{ट}{ठ}\right)$३-०.८२५५ $\left(\frac{ट}{ठ}\right)$ २+०.३५८३ $\left(\frac{ट}{ठ}\right)$-०.७१८ |
| टरबूज | पीकगुणांक = ३.०२६९$\left(\frac{ट}{ठ}\right)$५ - ५.७७$\left(\frac{ट}{ठ}\right)$४+ २.०२८१ $\left(\frac{ट}{ठ}\right)$३+ ०.४९७६ $\left(\frac{ट}{ठ}\right)$ २+ ०.२७०६$\left(\frac{ट}{ठ}\right)$ + ०.७७०९ |
| काकडी | पीकगुणांक = १.४२२४ $\left(\frac{ट}{ठ}\right)$ ५-२.३८०७ $\left(\frac{ट}{ठ}\right)$ ४-०.६५७१ $\left(\frac{ट}{ठ}\right)$ ३+१.५६८१ $\left(\frac{ट}{ठ}\right)$ २+०.१२५८$\left(\frac{ट}{ठ}\right)$+०.७६४ |

(ट = पेरणी / टोकण पश्चात दिवस, ठ = पीक कालावधी)

४१. ठिबक सिंचन पद्धतीद्वारे वेगवेगळ्या पिकास खताची मात्रा किती खते किती द्यावी व ते देण्याचा कालावधी काढण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या फुले फर्टिगेशन शेड्यूलर" या मोबाईल ॲपचा वापर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४२. पाणी कमतरता नसलेल्या सुरु हंगामी उसाची नॉर्मलायझड डीफरन्स व्हेजिटेटिव्ह इंडेक्स (एनडीव्हीआई) निश्चित करण्यासाठी पुढील सुत्रांचा शिफारस करण्यात येत आहे.

एनडीव्हीआई (ट) = ट दिवसाचा एनडीव्हीआई

ट = " लागवडीपासूनचे दिवस (५० दिवसांच्या पुढे)

ठ = पीक कालावधी (३६५ दिवस)

एनडीव्हीआई (२) = - ०.४३६ (८/ठ )$^{३}$ -०.७१६ (ट / ठ )$^{२}$ २+१.७७५ (ट/ठ) + ०.१९८ तसेच पुढील सूत्रांचा वापर करुन एनडीव्हीआई पासून पीक गुणांक काढण्याची शिफारस करण्यात येत आहे. जेणेकरुन पाहिजे त्यावेळी सुरु हंगामी उसाची पाण्याची गरज निश्चित करता येईल.

पीक गुणांक (ट) = ३.५२५ (एनडीव्हीआई (ट)) २ + ६.७४९ (एनडीव्हीआई (ट)) - १.९९५ परिपक्व (लागवडीपासून १ ते २९४ दिवसांपर्यंत)

परिपक्व अवस्थेनंतर (लागवडीपासून २९५-३६५ दिवसांपर्यंत)

पीक गुणांक (ट) १२.२५ (एनडीव्हीआई (ट)) २-१६.७९ (एनडीव्हीआई (ट)) + ६.०५६

पीक गुणांक (ट) = ट दिवसाचा पीक गुणांक

४३. पश्चिम महाराष्ट्रातील मध्यम खोल काळ्या जमिनीत सुरु उसाचे आर्थिकदृष्ट्या अधिक उत्पन्न घेण्यासाठी ५ फुटी सऱ्यांमध्ये सुरु उसाची रोपे ४५ सें.मी. अंतरावर लागवड करुन त्यामध्ये भूमीगत ठिबक सिंचन प्रणालीचा अवलंब करुन प्रत्येक सरीत एक उपनळी वापरुन दिवसाआड बाष्पोत्सर्जनाच्या ८० टक्के पाणी द्यावे. तसेच ठिबक सिंचनाद्वारे ८० टक्के शिफारशीत खतमात्रा (२००:९२:९२, नत्र:स्फुरद:पालाश किलो/हे.) एकूण ३० सुलभ हप्त्यात विभागून देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**सामाजिक शास्त्रे**

४४. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने कांदा पिकाच्या विकसित केलेल्या वाणाच्या (बसवंत ७८०, एन २-४-१, एन-५३, फुले सफेद, फुले सुवर्णा व फुले समर्थ) लागवडीमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना १८ वर्षांत (२००२-०३ ते २०१९-२० ) एकूण ४४,९५७ कोटी रूपये तर ४,६८६ कोटी रुपयांचा निव्वळ उत्पन्न मिळाले आहे. कांदा पिकाच्या संशोधन आणि विस्तार कार्यामध्ये १ रुपयाची गुंतवणूक केली असता ३० रुपये उत्पन्न व अंतर्गत परतावा दर ३२ टक्के मिळतो. म्हणून कांदा पिकाच्या संशोधन व विस्तारासाठी शासनाने वाढीव निधी उपलब्ध करून देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४५. उडीद पीक उत्पादनातून मिळणाऱ्या रोजगारामध्ये अनुक्रमे ११ व १४ टक्के, उत्पादनात २७ व २९ टक्के आणि उत्पन्नामध्ये ३४ व २८ टक्क्याची वाढ तसेच प्रति क्विंटल उत्पादन खर्चामध्ये झालेली ७ व १० टक्क्यांची घट ही अनुक्रमे कमीपेक्षा मध्यम व मध्यमपेक्षा उच्च या दोन अवलंबन गटामध्ये आढळून आलेली आहे. पीक उत्पादन खर्चातील प्रति क्विंटल घट व उत्पादनातील वाढ ही शेतकऱ्यांनी विद्यापीठाने शिफारसीत केलेल्या तंत्रज्ञानाच्या अवलंबनामुळे झालेली आहे. म्हणून, खर्च कपात आणि उत्पादनातील वाढीसाठी, शेतकऱ्यांनी उडीद पिकासाठीच्या तंत्रज्ञानाचा परिपूर्ण अवलंब करावा, अशी शिफारस करण्यात येते.

४६. पारंपारिक प्रवाही सिंचन पद्धती ऐवजी ठिबक पद्धतीचा सिंचनासाठी वापर केल्याने ऊस आणि कापूस पिकाच्या उत्पादनामध्ये अनुक्रमे ३३ आणि ४३ टक्के वाढ, प्रति, हेक्टरी ४१ आणि ४४ टक्के पाण्याची बचत व त्यामुळे प्रति हेक्टरी १६ आणि ४२ टक्के कार्बन उत्सर्जन प्रति हेक्टरी कमी होत, म्हणून व्यापक प्रमाणात हवामान बदल अनुकूल शेतीसाठी ठिबक सिंचनाचा ऊस आणि कापूस पिकांसाठी उवलंब करण्यास प्रोत्साहित करण्याची शिफारस करण्यात येते.

४७. मागील दहा वर्षामध्ये (२०१०-११ ते २०१९-२०) भारतातून ७३ टक्के केळीची निर्यात ही संयुक्त अरब अमिरात, सौदी अरेबिया, बहरीन व नेपाळ या चार देशांना होत असून कुवेत, कतार, ओमान आणि इराण या देशामध्ये निर्यात झालेल्या केळीस रु. ४२ प्रति किलोचे दर मिळाले जे बहरीन व नेपाळ (रु. २२ प्रति किलो) यांच्या पेक्षा जास्त होता, म्हणून शिफारस करण्यात येते की, अधिक उत्पन्न मिळण्यासाठी कुवेत, कतार, ओमान आणि इराण या सारख्या जास्त किंमत देणाऱ्या देशांकडे निर्यात करण्यावर भर देण्यात यावा.

४८. आळिंबी प्रशिक्षणाचा प्रशिक्षणार्थीवर झालेला परिणाम या प्रकल्पाच्या संशोधनाअंती धिंगरी आळिंबी उत्पादनासाठी खर्च : नफा गुणोत्तर १:४:४ (ताजी अळिंबी) व १:१:२ ते १:१:७ या दरम्यान (प्रक्रियायुक्त अळिंबी) असल्याने हा उपक्रम लघु व सीमांत शेतकरी तसेच भूमिहीनांसाठी उपजीविकेचा उत्तम स्त्रोत असल्याने निदर्शनास आले. तसेच, ५४ टक्के पशिक्षणार्थीनी अळिंबी प्रशिक्षणाचा कालावधी वाढविणेबाबत सूचित केले आहे. लोकांमधील कमी जागरुकता (८७ टक्के) व अळिंबीस बाजारात असणारी कमी मागणी (८४ टक्के) या मुख्य कारणांमुळे तीन-पंचमाश प्रशिक्षणार्थीनी अळिंबी प्रकल्प सुरू करुन बंद केल्याचे निदर्शनास आले.

त्यामुळे अशी शिफारस करण्यात येते की, राज्य शासन कृषि विभाग आणि कृषि विज्ञान केंद्र यांनी लघु व सीमांत शेतकरी तसेच भूमिहीन यांचेमध्ये अळिंबी उत्पादनाबद्दल जागृती निर्माण करून त्याच्यामध्ये या उपक्रमाला जास्तीत जास्त चालना द्यावी व भारतीय कृषि अनुसंधान परिषद व महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांनी अळिंबी उत्पादन प्रशिक्षणाचा कालावधी वाढवावा. असेही शिफारशीत करण्यात येते की राज्याचे कृषि व संबंधित विकास विभाग, अशासकीय संस्था व कृषि विज्ञान केंद्र याच्या मदतीने बाजार व प्रक्रिया प्रकल्पांबरोबर मजबूत साखळी, लोकामध्ये अळिंबीचे आरोग्य विषयक फायदे या बद्दल जागरूकता व अळिंबी उत्पादक संघ याची निर्मिती करण्यात यावी.

४९. गटशेतीच्या अभ्यासाअंती असे निदर्शनास आले की गट शेती योजनेमधील गटांनी मिळविलेल्या आर्थिक पाठिंब्याच्या आधारे लघु व सीमांत शेतकऱ्यांना वैयक्तिकरित्या शक्य नसलेले मोठ्या गुंतवणुकीचे प्रकल्प उभारणे शक्य झाले आहे. कोणताही गट गटशेतीच्या संकल्पनेप्रमाणे एकत्रित शेती / पशुपालन करीत नव्हता. असेही निदर्शनास आले की ८० टक्क्यांपेक्षा जास्त गटशेती सदस्यानी बँक कर्ज मिळविण्यामध्ये अडचणी व कृषि प्रक्रिया प्रकल्पांसाठी कृषि दराऐवजी औद्योगिक दरानुसार शुल्क आकारणी या समस्या नोंदविल्या.

त्यामुळे, अशी शिफारस करण्यात येते की, राज्य शासनाच्या कृषि विभागाने गटशेती योजनेखालील गटातील शेतकऱ्यांना गटशेती/ पशुपालन करणेसाठी प्रोत्साहित करावे, लघु व सीमांत शेतकऱ्याच्या सबलीकरणासाठी यशोगाथांद्वारे गटशेतीस मोठ्या प्रमाणावर चालना द्यावी व प्रक्रिया अधिक सुलभ करावी. कृषि प्रक्रिया प्रकल्पाकरिता औद्योगिक दराऐवजी कृषि दराने विद्युत पुरवठा करावा.

५०. मध्यम ते भारी काळ्या पाणथळ क्षारयुक्त चोपण जमीन सुधारणेसाठी भूमिगत निचरा प्रणाली तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य तसेच सामाजिकदृष्ट्या स्वीकार्य असल्याचे दिसून आले असले तरी, हिरवळीच्या खताचा तसेच जिप्समच्या वापराबद्दलचे शेतकऱ्यांचे अवलंबन कमी आढळून आले आहे. याशिवाय जमीन

सुधारणेपश्चात १० ते १५ मी., १६ ते २० मी. व २१ ते ३० मी. या निचरा पाईपच्या तिन्ही अंतरावरील ऊस पिकाचे उत्पादन व नफा-खर्च गुणोत्तरामध्ये लक्षणीय फरक दिसून येत नसल्याने, असे शिफारशीत करण्यात येते की, मध्यम ते भारी काळ्या पाणथळ क्षारयुक्त चोपण जमिनी सुधारण्यासाठी शेतकऱ्यांद्वारे कमी अंतरावर निचरा पाईप बसविल्यामुळे येणारा वाढीव खर्चाचा बोजा आणि पाण्याचा अतिरिक्त निचरा टाळण्यासाठी २१ ते ३० मीटर अंतरावर निचरा पाईप टाकण्याचे अवलंबन करण्यास, हिरवळीच्या खतांचा तसेच जिप्समच्या (५ टन प्रती हेक्टरी) वापरासाठी विस्तार यंत्रणांनी (कृषि विज्ञान केंद्र, कृषि विद्यापिठे व कृषि विभाग) गट चर्चा व परिणाम प्रात्याक्षिके यांच्याद्वारे शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे.

५१. अमेरिकन लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी मका उत्पादक शेतकऱ्याद्वारे केल्या जाणाऱ्या उपाययोजनांबाबत केलेल्या अभ्यासाअंती असे निदर्शनास आले की, बहुतांश प्रतिसादार्थी शेतकरी हे सरासरी विस्तार संपर्क आणि उच्च प्रसार माध्यमांचा वापर करणारे आहेत. अमेरिकन लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी ते फक्त रासायनिक नियंत्रणावर अवलंबून आहेत आणि ते मशागत, भौतिक व जैविक पद्धतींचा अवलंब अत्यंत कमी प्रमाणात करत आहेत. परंतु मका लागवडीमध्ये अमेरिकन लष्करी अळीच्या शाश्वत व्यवस्थापनासाठी रासायनिक, मशागत, भौतिक आणि जैविक नियंत्रण पद्धतींचा एकत्रित अवलंब करणे आवश्यक आहे. त्यामुळे अशी शिफारस करण्यात येते की, कृषि विभागाने कृषि विज्ञान केंद्रांच्या सहाय्याने अमेरिकन लष्करी अळीच्या एकात्मिक नियंत्रणासाठी शेतकऱ्यांना ज्ञान व कौशल्ये प्रदान करण्यासाठी तसेच अवलंबन वाढविण्यासाठी शेतकरी शेती शाळा स्थापित करण्यासाठी प्रोत्साहीत करावे.

५२. सदर संशोधन अभ्यासातून असे दिसून येते की, पेरू उत्पादकांना घन लागवड पद्धतीमधील छाटणी व वळण देणे (८०% आणि ८५%), पुनर्जीवनतंत्र (६९% आणि ७५%), खत व्यवस्थापन (६८% आणि ८३%), फळ माशी आणि सुत्रकृमीचे नियंत्रण (५८% आणि ७६%) आणि काढणीपश्चात तंत्रज्ञान (५२% आणि १००%), या बाबींचे कमी ज्ञान तसेच कमी अवलंबन आहे. त्यामुळे अशी शिफारस करण्यात येते की, कृषि विभागाने कृषि विद्यापीठांच्या आणि कृषि विज्ञान केंद्राच्या समन्वयाने पेरू उत्पादकांसाठी वरील बाबींवर प्रशिक्षण कार्यक्रम आणि प्रात्यक्षिकांचे आयोजन करावे.

५३. कापूस पिकाच्या अभ्यासावरुन असा निष्कर्ष काढला आहे की, कापूस पिकाची फेरपालट, आंतरपिकाचे उत्पादन करणे आणि ट्रायकोकार्ड स्थापित करणे ही गुलाबी बोंडअळीवर नियंत्रण ठेवण्याची शिफारस केलेली होती. परंतु असे आढळले आहे की फारच कमी शेतकरी पिकाची फेरपालट (२८%), आंतरपीक (५१%) आणि ट्रायकोकार्ड (५%) आणि इतर बायो एजंटचे अनुसरण करतात.

या अभ्यासामधून असे निदर्शनास येते की, कापसावरील गुलाबी बोंड अळीच्या नियंत्रणासाठी कृषि विज्ञान केंद्र व कृषि विभाग महाराष्ट्र शासन यांनी शेतकऱ्यांसाठी पिकाची फेरपालट व कापूस पिकात आंतरपीक घेण्यासाठी प्रोत्साहन द्यावे आणि ट्रायकोकार्ड व इतर जैविक कीटकनाशके उपलब्ध करून द्यावीत अशी शिफारस करण्यात येते.

५४. या अभ्यासातून असे निदर्शनास आले की, ज्याअर्थी ९० टक्के लिंबू उत्पादक शेतकरी उत्पादीत लिंबू मोजक्या स्थानिक व्यापाऱ्यांना विकतात, त्याअर्थी या भागातील लिंबू विपणानामध्ये मोजक्या स्थानिक व्यापाऱ्यांची मक्तेदारी निर्माण झाली आहे. तसेच लिंबू उत्पादक शेतकऱ्यांना शीतगृह सुविधांचा अभाव (८७%), कमी किंमत व बाजार भावात चढउतार (८६%) व उशीरा पैसे मिळणे (७४%) या अडचणी येतात.

अशी शिफारस करण्यात येते की, वरिल समस्यावर मात करण्यासाठी या भागातील लिंबू उत्पादक शेतकऱ्यांनी लिंबू उत्पादक "गट" स्थापन करुन या गटामार्फत शीतगृह सुविधा निर्माण कराव्यात व लिंबू विपणन करावे.

५५. अन्नद्रव्याच्या योगदानासाठी केलेल्या पाथ विश्लेषणाच्या आधारे हळद पिकाच्या उत्पादनात, शेणखताच्या वापराचे योगदान ४३ टक्के तसेच त्या खालोखाल नत्र खताचे योगदान २६ टक्के आढळून आले. रिग्रेशन विश्लेषणानुसार शेणखताचे हळद पिकामध्ये लक्षणीय योगदान आढळून आले आहे. म्हणून हळद पिकाचे लक्षित उत्पादन मिळविण्यासाठी खत मात्रेसोबत (लक्षित उत्पादन समीकरणानुसार) शेणखत वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.

५६. भविष्यात भारतातील निर्यात व मुल्य यांचा तंतोतंत अंदाज वर्तविण्याकरिता, कांद्यासाठी हॉल्ट व ब्राऊन्स एक्सपोनेन्शिल स्मुदींग मॉडेल, द्राक्षासाठी: ब्राऊन्स एक्सपोनेन्शिल स्मुदींग, केळीसाठी: आरीमा (३,१,६) व ब्राऊन्स एक्सपोनेन्शिल स्मुदींग, आंब्यासाठी हॉल्ट एक्सपोनेन्शिल स्मुदींग आणि डाळींबासाठी आरीमा (०,१,०) व ब्राऊन्स एक्सपोनेन्शिल स्मुदींग मॉडेल वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**जैविक ताण सहन करणारे स्त्रोत नोंदणी प्रस्ताव**

५७. वनस्पती शरीरक्रिया व जैवरासायनिक घटकांच्या आधारे, हरभरा प्रजोत्पादन कार्यक्रमामध्ये देशी हरभऱ्याच्या जेएससि ५५ (आरव्हीजी २०२), जेजी १४ (आयसिसिव्ही ९२९४४) आणि विजय या वाणांची उष्णता सहनशील कार्यक्षम दाते म्हणून शिफारस करण्यात येत आहे.

५८. तुडतुड्यांचा प्रादुर्भाव, बाह्यगुणधर्म व जैवरासायनिक गुणधर्मावरून ए.के.एच. २००६-२ हा कपाशीचा वाण तुडतुडे किडीस प्रतिकारक्षम स्त्रोत म्हणून शिफारस करण्यात येत आहे.

-----------

## (क) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## संशोधन शिफारसी २०२०-२१

(कृषि संशोधन आणि विकास समिती- २०२१ मध्ये मंजूर केलेल्या शिफारशी)

**विकसित वाण**

| अ.क्र. | पीक | वाण | प्रमुख वैशिष्ट्ये | |
|---|---|---|---|---|
| **(अ) प्रसारित झालेले वाण (शेती पिके)** | | | | |
| १ | भात | पीडीकेव्ही साधना (एसकेएल-३-१ ४१-८-३३-१५) | ● कमी कालावधी : ११८ ते १२० दिवस.<br>● ठेंगणा वाण ऊंची ९९ सेंमी. (ऊंची ९१ ते १०६ सेंमी)<br>● लांब बारीक दाणा (१००० दाण्याचे वजन २५.७ ग्रॅम).<br>● पानावरील करपा, खोड किडी व तुडतुड्यांना साधारण प्रतिकारक.<br>● उत्पादन ४५ ते ५० क्विं./हे.<br>● खाण्यास योग्य मध्यम अमायलोज (२८.२८ टक्के)<br>● विदर्भात लागवडीकरिता प्रसारीत वाण. | <br> |
| २ | रबी हुरडा ज्वारी | टीएकेपीएस-५ (ट्रॉम्बे अकोला सुरूची) | ● रब्बी हंगामाकरिता प्रसारीत<br>● हुरडा उत्तम, चवदार व गोड<br>● हेक्टरी हुरडा उत्पादन ४० ते ४१ क्विंटल.<br>● हिरव्या कडब्याचे वजन प्रति हेक्टरी ११५ क्विंटल.<br>● लवकर येणारा: ९० ते ९५ दिवस.<br>● खोडकिड व खोडमाशीस प्रतिकारक. | <br> |

| अ.क्र. | यंत्र / अवजार | प्रमुख वैशिष्ट्ये | |
|---|---|---|---|
| **(ब) प्रसारित झालेले कृषि अवजारे/यंत्रे** | | | |
| १ | पंदेकृवि विकसीत ट्रॅक्टर चलित गवत कापणी यंत्र | ● रस्त्यालगतचे गवत, तण, अनावश्यक झुडपे व शेतातील गवत कापण्यासाठी उपयुक्त.<br>● कापणी कार्यक्षमता : ९० ते ९३ टक्के.<br>● इंधन खपत : ४.२० ते ४.३० लि/तास.<br>● गती : २.१० ते २.२५ कि. मी. प्रती तास.<br>● क्षेत्र कार्यक्षमता : ७५ ते ८४ टक्के.<br>● १० ते १५ सें. मी. जाडीची झाडे व झुडपे कापता येतात. |  |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | पं.दे.कृ.वि.<br>विकसित बैल<br>चलीत<br>चिखलणी यंत्र | ● या चिखलणी यंत्राने धान शेतीमध्ये चिखलणी समपातळीत आणि चांगल्या प्रतीची होते.<br>● हिरवळीचे खते किंवा तणे चिखलणी करतेवेळेस संपूर्णपणे गाडली जातात.<br>● हे यंत्र बैलजोडीच्या सहाय्याने चालते व चिखलणी वेळेस यंत्र चिखलामध्ये फसत नाही.<br>● कार्यक्षमता : ०.१७६ हे. प्रती तास व क्षेत्रक्षमता : ७०.४५%.<br>● चिखलणी निर्देशांक : ३९.५०% |  |
| ३ | पंदेकृवि चारोळी<br>बीज प्रतवारी व<br>फोडणी यंत्र | ● एकाच मशीनच्या साहाय्याने चारोळी प्रतवारी व फोडणी करता येते<br>● चारोळी प्रतवारी क्षमता : ९८ टक्के<br>● चारोळी फोडणी क्षमता : ९३ टक्के<br>● वजन : ७५ किलो, चाकाच्या सहाय्याने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेता येते.<br>● एका मजुराच्या सहाय्याने यंत्र सहज चालवता येते. |  |
| ४ | पंदेकृवि ओली<br>लाल मिरची<br>बिज काढणी<br>यंत्रे | ● बिज काढणी क्षमता : ३०० किलो प्रती तास.<br>● बिज काढणी कार्यक्षमता : ९५ ते ९७ टक्के.<br>● बिज काढणी  यंत्र बियाणे उत्पादकांकरिता उपयुक्त आहे.<br>● काढणी दरम्यान हातांचा स्पर्श होत नसल्यामुळे दाह होत नाही.<br>● संपूर्ण बिज काढणी (९४-९९%) एकाच पास मध्ये शक्य. |  |
| ५ | पंदेकृवि ज्वारी<br>हुरडा काढणी<br>यंत्र | ● वारीचा हुरडा काढण्यासाठी उपयुक्त<br>● हुरडा काढण्यासाठी क्षमता : १८० किलो कणसे प्रती तास<br>● एक अश्वशक्तीच्या विद्युत मोटारवर चालते.<br>● हुरडा काढणी कार्यक्षमता : ९३ टक्के.<br>● हुरडा काढतांना दाण्यांची फूट होत नाही.<br>● कणसांच्या आकारानुसार दोन बेल्ट मधील अंतर कमी किंवा जास्त करण्याची व्यवस्था.<br>● देखभालीचा खर्च कमी व हाताळण्यास सोपे. |  |

## उत्पादन तंत्राज्ञान

### अ) शेती पिके

१. विदर्भातील जस्त तथा गंधकाची कमतरता असलेल्या मध्यम खोल काळ्या जमिनीमध्ये करडई पिकाचे हेक्टरी अधिक उत्पादन, आर्थिक मिळकत आणि जमिनीची सुपीकता टिकविण्यासाठी शेणखत ५ टन प्रती हे. किंवा जागच्या जागी मूगपिकाचे अवशेष जमिनीत गाडावे तसेच उत्पादन उद्दीष्ट समीकरण यांच्यानुसार नत्र, स्फुरद, पालाश अधिक २५ कि./हे. झिंक सल्फेट आणि १० कि./हे. गंधक देण्याची शिफारस करण्यात येते.

अपेक्षित उत्पादन समीकरण (जवाहरलाल नेहरू कृषि विश्व विद्यालय, जबलपूर)

खतामधून द्यावयाचे नत्र, किलो/हेक्टर =

(९.११ अपेक्षित उत्पादन, क्विं/ हे. ) - (०.४५x जमिनीतील उपलब्ध नत्र कि/हे.)

खतामधून द्यावयाचे स्फुरद, किलो/हेक्टर =

(६.२७ अपेक्षित उत्पादन, क्विं/हे.) - (२.१९४x जमिनीतील उपलब्ध स्फुरद कि/हे.)

खतामधून द्यावयाचे पालाश, किलो/हेक्टर =

(९.२७ x अपेक्षित उत्पादन, क्विं/हे.) - (०३८x जमिनीतील उपलब्ध पालाश कि/हे.)

२. सोयाबीन कांदा पीक पद्धतीमध्ये अधिक उत्पादकता व आर्थिक मिळकतीकरीता सोयाबीन पिकाला जैविक खताची (रायझोबियम जापोनीकम अ पीएसबी अ ट्रायकोडर्मा) बीज प्रक्रिया करून शिफारशीत खत मात्रेच्या ७५ टक्के रासायनिक खत (२५:६०:२५ किलो नत्र: स्फुरद: पालाश / हे.) अधिक ५ टन शेणखत प्रती हेक्टर तसेच रबी हंगामात कांदा पिकाला शिफारसीत खत मात्रा (१००:५०:५० किलो नत्र: स्फुरद: पालाश / हेक्टर) देण्याची शिफारस करण्यात येते.

३. पश्चिम विदर्भात लोह व मँगनीजयुक्त धान पिकाचे अधिक उत्पादन, आर्थिक मिळकत तसेच धानाच्या दाण्यातील प्रथिने व कर्बोदके यांचे प्रमाण वाढविण्याकरिता अविष्कार या वाणाची सिंचनाखाली पेरिव पद्धतीने पेरणी करून शिफारसीत खत मात्रेबरोबर (१००:५०:५० नत्र: स्फुरद: पालाश / हेक्टर) फेरस सल्फेट २५ किलो अधिक मॅगेनीज सल्फेट ५ किलो प्रती हेक्टर देण्याची शिफारस करण्यात येते.

४. सूर्यफुलाचे अधिक समतुल्य उत्पादन व आर्थिक मिळकतीकरिता पीक पद्धतीमध्ये खरीप हंगामात मूग हे पीक १०० टक्के शिफारशीत खत मात्रेसह (२०:४०:२० किलो नत्र:स्फुरद: पालाश / हे.) किंवा सोयाबीन हे पीक १०० टक्के शिफारशीत खत मात्रेसह (३०:७५:३० किलो नत्र:स्फुरद:पालाश / हे.) आणि रब्बी हंगामात अपेक्षित उत्पादन समीकरणानुसार सूर्यफुल हे पीक घेण्याची शिफारस करण्यात येते.

सूर्यफुलासाठी अपेक्षित उत्पादन समिकरण (मफुकृवि, राहुरी)

खतामधून द्यावयाचे नत्र = किलो/हेक्टर

(१३.९४ अपेक्षित उत्पादन, विव/हे.) - (०.६१X जमिनीतील उपलब्ध नत्र कि/हे.)

खतामधून द्यावयाचे स्फुरद, किलो/हेक्टर =

(७.१८ अपेक्षित उत्पादन क्विं ) - (०.८२x जमिनीतील उपलब्ध स्फुरद कि/हे.)

खतामधून द्यावयाचे पालाश, किलो/हेक्टर =

(३.५३ x अपेक्षित उत्पादन, क्विं/हे. ) - (०.०५x जमिनीतील उपलब्ध पालाश कि/हे.)

५. सेंद्रीय शेती पद्धतीत, मूग पिकाच्या अधिक उत्पादन, आर्थिक मिळकत व जमिनीच्या शाश्वत सुपीकतेसाठी २.५ टन पोषक द्रव्यांनी समृद्ध पंदेकृवि कंपोस्ट खतासोबत रायझोबियम व पीएसबी ४.० किलो प्रति हेक्टर जमिनीत देऊन पिकावर द्रवरूप सेंद्रीयखताच्या (नत्र:स्फुरद:पालाश) स्रोत्रातून ३० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पेरणीनंतर २० आणि ४० दिवसांनी दोन फवारण्या तसेच जैविक कीड व्यवस्थापनासाठी वनस्पतीजन्य कीटकनाशक (दशपर्णी अर्क किंवा ५ टक्के निंबोळी अर्क) आणि जैविक कीडनाशक (बिव्हेरिया व मेटारायझीयम) ची फवारणी करण्याची शिफारस करण्यात येते.

६. सेंद्रीय शेती पद्धतीत, गहू पिकाच्या अधिक उत्पादन, आर्थिक मिळकत व जमिनीच्या शाश्वत सुपीकतेसाठी ८० टन पोषक द्रव्यांनी समृद्ध पंदेकृवि कंपोस्ट खतासोबत ॲझोटोबॅक्टर व पीएसबी ४.० किलो प्रति हेक्टर जमिनीत देऊन पिकावर द्रवरूप सेंद्रीयखताच्या (नत्र: स्फुरद: पालाश) स्रोत्रातून ३० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पेरणीनंतर २०, ४० आणि ६० दिवसांनी तीन फवारण्या तसेच जैविक कीड व्यवस्थापनासाठी वनस्पतीजन्य कीटकनाशक (दशपर्णी अर्क किंवा ५ टक्के निंबोळी अर्क) आणि जैविक कीडनाशक (बिव्हेरिया व मेटारायझीयम) ची फवारणी करण्याची शिफारस करण्यात येते.

७. विदर्भातील मध्यम खोल काळ्या कोरडवाहू जमिनीत अधिक धान्य उत्पादन, आर्थिक उत्पन्न आणि पावसाच्या पाण्याचा कार्यक्षम वापरासाठी मध्यम कालवधीच्या तूर पिकाची पेरणी १२० x ३० सें.मी. अंतरावर करून पेरणीनंतर ४५ दिवसांनी शेंडा खुडण्याची शिफारस करण्यात येत आहे.

८. जस्त आणि बोरॉनची कमतरता असलेल्या जमिनीमध्ये जवस पिकाचे अधिक उत्पादन व आर्थिक मिळकतीकरिता शिफारसीत खत मात्रेसह (६०:३०:०० नत्र स्फुरद व पालाश कि/हे.) झिंक सल्फेट ०.५ टक्के (५ ग्रॅम / लिटर पाण्यात) बोरॉक्स ०३ टक्के (३ ग्रॅम/लीटर पाण्यात) यांची पेरणीनंतर ४५ दिवसांनी फवारणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

### ब) मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र

९. गंधकाची कमतरता असलेल्या जमिनीमध्ये हरभरा पिकाची अधिक उत्पादकता, आर्थिक मिळकत दाण्यांची चांगली प्रत आणि जमिनीची सुपीकता सुधारण्याकरिता पेरणीच्या वेळेस गंधक ३० किलो प्रती हेक्टर बेन्टोनाइट गंधक (३५ किलो प्रती हेक्टर) किंवा जिप्समद्वारे (१३० किलो प्रती हेक्टर) शिफारशीत खत मात्रेसोबत (२५:५०:३० किलो प्रती हेक्टर नत्र, स्फुरद व पालाश) देण्याची शिफारस करण्यात येते.

१०. खोल काळ्या जमिनीतील स्फुरदाची कार्यक्षमता, जमिनीतील उपलब्धता आणि स्थिर होण्याचे प्रमाण लक्षात घेता तसेच सोयाबीन पिकाचे जास्तीत जास्त उत्पादन व आर्थिक मिळकतीकरिता प्रति हेक्टरी ३०:६०:३० कि.ग्रॅ. नत्र, स्फुरद व पालाश वापरण्याची शिफारस करण्यात येते.

११. गांडूळ खतामधून जास्तीत जास्त अन्नद्रव्य तसेच क्रियाशील घटक असलेल्या ह्युमिक पदार्थांचा अधिक उतारा मिळण्यासाठी अल्कधर्मी पद्धत वापरण्याची शिफारस करण्यात येते.

१२. गव्हाच्या काडाचे कमी वेळेत नत्र, स्फुरद, गंधकयुक्त कंपोस्ट खत तयार करण्याकरिता त्यामध्ये गिरीपुष्पाची पाने, रॉक फॉस्फेट, गंधक पावडर व पं. दे. कृ. वि. काडी कचरा कुजविणाऱ्या बुरशीचा वापर करण्याबाबत पिडीकेव्ही समृद्ध एनपीएस कपोस्ट पद्धतीची शिफारस करण्यात येते.

**क) उद्यान विद्या**

**१) भाजीपाला शास्त्र**

१३. मधूमका पिकाच्या अधिक उत्पादन व आर्थिक मिळकतीसाठी हेक्टरी ५ टन शेणखतासोबत १७५ किलो नत्र, ८० किलो स्फुरद व ८० किलो पालाश या खतांच्या मात्रेची शिफारस करण्यात येते.

१४. मटारू कंदाचे अधिक पौष्टीक व रुचकर कुकीज बनविण्यासाठी गव्हाच्या पिठामध्ये ६० टक्के मटारू पीठ घालून प्रति १००० ग्रॅम पिठाच्या मिश्रणामध्ये ६०० ग्रॅम साखर + ५०० ग्रॅम वनस्पती तूप + १० ग्रॅम सोडियम बायकार्बोनेट वापरुन कुजीज बनविण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**२) औषधी व सुगंधी वनस्पती**

१५. अश्वगंधाच्या गुणवत्तापुर्ण अधिक उत्पादन आणि आर्थिक मिळकतीकरिता मूग-अश्वगंधा या पीक पद्धतीची शिफारस करण्यात येते.

१६ सफेद मुसळी या पिकाच्या गुणवत्तापूर्ण उत्पादन आणि अधिक आर्थिक मिळकतीकरिता सफेद मुसळी-मका (३:१) किंवा सफेद मुसळी-तूर (३:१) या आंतरपीक पद्धतीची शिफारस करण्यात येत आहे.

१७ कवचबीज या पिकाच्या गुणवतापूर्ण अधिक उत्पादन आणि आर्थिक मिळकतीकरिता कवचबीज- गवार या पीक पद्धतीची शिफारस करण्यात येत आहे.

**ड) पिक संरक्षण**

१८ भातावरील तुडतुड्यांच्या प्रभावी आणि किफायतशीर व्यवस्थापनाकरिता बांधीत दोरीने ओळीमध्ये रोवणीच्या (२० x १५ से.मी.) प्रत्येक १० ओळी (किंवा २ मीटर) नंतर ३० सें.मी. अंतराचा पट्टा सोडावा. तसेच तुडतुड्यांचा प्रादुर्भाव दिसताच फ्लोनिकॅमिड ५० टक्के डब्लू. जी. ३ ग्रॅम व त्यानंतर १५ दिवसांनी फिप्रोनील ५ टक्के एस. सी. २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१९. भात पिकावरील तपकिरी तुडतुड्यांच्या प्रभावी आणि किफायतशीर व्यवस्थापनाकरिता किडींनी आर्थिक नुकसानीची पातळी (फुटव्याच्यावेळी १० तुडतुडे किंवा लोंबिच्या पुढील अवस्थेत ५-१० तुडतुडे प्रती चुड गाठताच फ्लोनिकॅमिड ५० टक्के डब्लू. जी. ३ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पहिली फवारणी व त्यानंतर १५ दिवसांनी पायमेट्रोझीन **५०** टक्के डब्लू. जी. या रासायनिक किटकनाशकाची ६ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून दुसरी फवारणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२०. कपाशीवरील गुलाबी बोंडअळीच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी आणि अधिक आर्थिक मिळकतीसाठी ट्रायकोग्रामाटॉयडी बॅक्ट्री हा परोपजीवी किटक कपाशी उगवल्याच्या ५५ दिवसानंतर हेक्टरी १ लाख अंडी याप्रमाणे १० दिवसांच्या अंतराने ६ वेळा शेतात प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२१. ज्वारीवरील मिजमाशीचे व्यवस्थापन करण्यासाठी ५० टक्के कणसे बाहेर पडल्यानंतर ५ टक्के निंबोळी अर्क व १ टक्के डिटर्जंट पावडर आणि त्यानंतर १० दिवसांनी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १६ मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करण्याची शिफारस करण्यात येते.

२२. पेरू बागेच्या मातीमधुन विलगीकरण केलेले तीन परोपजीवी सुत्रकृमी: स्टेनरनेमा बायकोरनॅटम *(Steinernema bicornatum)*, हेटिरोरॅब्डीस इंडीका *(Heterorhabditis indica)* व स्टेनरनेमा सियामकाई *(Steinernema siamkayi)* दिसुन आले असुन प्रयोगशाळेतील चाचण्यांमध्ये हेलिकावर्पा आरमीजेरा, सेमीलुपर, कॉरसायरा सेफॅलोनिका व गॅलेरीया मेलोनेला या पतंगवर्गीय किडीविरूद्ध रोगकारक आढळुन आल्यामुळे सादर आहेत. तीनही परोपजीवी सुत्रकृमींची किडींविरूद्ध रोगकारक क्षमता लक्षात घेता त्यांची "उपयुक्त सुक्ष्मजीव" या गटात तसेच किड नियंत्रणविषयक पुढील अभ्यासासाठी वापर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२३ नागपुरी संत्र्यावरील डिंक्या रोगाच्या व्यवस्थापनासाठी झाडाच्या बुंध्यावर बोर्डोमलम (२.१.१०) दोन वेळा (मे) आणि (ऑक्टोबर) मध्ये नियमित लावावा. डिंक्या रोगाची लागण दिसताच प्रती झाड ट्रायकोडर्मा हर्जियानम अधिक सुडोमोनास फ्लूरोसन्स अधिक मायकोरायझा प्रत्येकी १०० ग्रॅम १ किलो शेणखतात मिसळून झाडाच्या परिघात जमिनीतून द्यावा यानंतर ८ दिवसाच्या अंतराने फेरस सल्फेट अधिक झिंक सल्फेट प्रत्येकी २०० ग्रॅम झाडाच्या परिघात जमिनीतून देण्याची शिफारस करण्यात येते.

**इ) कृषि अभियांत्रिकी**

२४. संत्र्यांच्या रसाची पावडर तयार करण्याकरिता रसामध्ये सोया प्रथीने २.१० टक्के, ग्लिसरील मोनोस्टेरेट २.७५ टक्के, कारबोकजील मिथायल सेलूलोज १.७५ टक्के आणि साखर ५.५० टक्के घालून ८ मिनिटे फेटुन फोम तयार करणे व तयार केलेला फोम मायक्रोवेव्ह वाळवणीत ३ मी. मी. जाडीचा थर व ५४० वॅट पावरला वाळविण्याची शिफारस करण्यात येत आहे.

तथापी, नैसर्गिक तत्वांचा वापर करून संत्र्याच्या रसाची पावडर तयार करण्याकरिता रसामध्ये सोया-प्रथीने ३.३० टक्के, गवारगम ०.४५ टक्के आणि साखर १० टक्के घालून, ६ मिनिटे फेटून फोम तयार करणे व तयार केलेला फोम ३ मी.मी. जाडीच्या थरामध्ये व ५४० वॅट पावरला मायक्रोवेव्हमध्ये वाळविण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२५. गव्हाच्या १०० ग्रॅम पिठामध्ये ३ ग्रॅम अश्वगंधा, ३ ग्रॅम शतावरी, १.०० ग्रॅम कानडवेल, १.०० ग्रॅम गुडवेल व .५ ग्रॉम ब्राम्हीचे पावडर वापरून पौष्टीक बिस्किट तयार करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२६. विदर्भातील धानशेतीमध्ये चिखलणी, रोवणी व तण नियंत्रणाच्या खर्चात बचत करुन उत्पादन वाढविण्याकरिता ४० मायक्रान जाडीची चंदेरी प्लॉस्टीक मल्चींग वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२७. डॉ. पंदेकृवि, अकोला येथे १९५ किलो वॅट विकेंद्रीत पारेषण संलग्न सौर पीव्ही उर्जा प्रकल्पावर केलेल्या अभ्यासानुसार, आर्थिक वर्षे २०२१-२२ मध्ये अंदाजे २२ लाख रुपये विज खर्चात बचत झाली, करिता हरित ऊर्जेचा वापर, ऊर्जासंवर्धन, महसूल निर्मिती आणि पर्यावरण संरक्षण करण्यासाठी संस्थात्मक इमारतींवर विकेंद्रीत पारेषण संलग्न सौर पीव्ही ऊर्जा प्रकल्प स्थापित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**क) पशु संवर्धन व दुग्ध शास्त्र**

२८. सरासरी ३०० (+५०) किलो वजनाच्या संकरीत जर्सी गायीपासून तंदुरुस्त वासरांची पैदास तसेच गायीच्या दुधामध्ये वाढ होण्यासाठी ३ किलो खुराक प्रती दिन (>१८ % प्रथिने) संभावित विण्याच्या दिवसाच्या ८ आठवडे अगोदरपासून देण्याची शिफारस करण्यात येते.

२९. बंदीस्त कुक्कुटपालन पद्धतीमध्ये गिरीराज कोंबड्यांच्या मांसात ओमेगा-३ घटकाच्या समावेशासह वजन वाढ होण्यासाठी खाद्यात ३ टक्के जवस तेलाचा समावेश करण्याची शिफारस करण्यात येते.

३०. गायीच्या दुधापासून तयार केलेल्या छन्न्यामध्ये पक्व कवठाचा गर १५ टक्के (दुधाच्या २.५ टक्के) या प्रमाणात मिसळुन वातावरणीय तापमानाला ५ दिवसांची आणि रेफ्रिजरेशन तापमानाला २० दिवसांची
टिकवण क्षमता असलेले मुल्यवर्धीत कलाकंद तयार करण्याची शिफारस करण्यात येते.

**ग) सामाजिक शास्त्र**

**अ. कृषि अर्थशास्त्र**

३१. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या तूर पिकाच्या पी. के. व्ही तारा ह्या वाणामुळे मागील ६ वर्षात शेतकऱ्यांना एकूण रुपये ८४१.६८/- कोटीचा आर्थिक फायदा झालेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सुधारित वाणाच्या पुढील संशोधन आणि विस्तारासाठी शासनाने विद्यापीठातील संशोधनास सक्षम करण्याची शिफारस करण्यात येते.

३२. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या मूग पिकाच्या कोपरगाव व उडीद पिकाच्या टी.ए.यू. १ ह्या वाणामुळे मागील १५ वर्षात शेतकऱ्यांना एकुण रुपये १,३८३.२०/- कोटी व रुपये ३९०४.७२/- कोटीचा अनुक्रमे आर्थिक फायदा झालेला आहे. शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेता वरील वाणांचे बीजोत्पादन वाढविणे गरजेचे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी वा सुधारित वाणाच्या पुढील संशोधन आणि विस्तारासाठी शासनाने विद्यापीठातील संशोधनास सक्षम करण्याची शिफारस करण्यात येते.

३३. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या भूईमुग पिकाच्या TAG - २४ ह्या वाणामुळे मागील १५ वर्षात शेतकऱ्यांना एकूण रुपये २१७४.२२ कोटीचा आर्थिक फायदा झालेला आहे. शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेता बीजोत्पादन वाढविणे गरजेचे आहे. त्यामुळे शेतक-यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी, सुधारीत वाणाच्या पुढील संशोधन आणि विस्तारासाठी शासनाने विद्यापीठातील संशोधनास सक्षम करण्याची शिफारस करण्यात येते.

**ब. विस्तार शिक्षण आणि कृषि अर्थशास्त्र विभागाची एकत्रित शिफारस**

३४. धान शेतीच्या पारंपारिक रोपण, एसआरआय आणि धूळ पेरणी या पद्धतींमध्ये पेरीव धान पीक लागवड पद्धत आर्थिकदृष्ट्या अधिक फायदेशीर आढळून आली. पेरीव धान पीक लागवड पद्धतीचा अवलंब करण्यामध्ये पेरणीच्यावेळी धान पेरणी यंत्राची उपलब्धता नसणे (८२ %) पेरीव धान पेरणी यंत्राकरिता अनुदान नसणे (७४ %) आणि पेरीव धान पेरणी यंत्राची जास्त किंमत (७१ %) प्रमुख अडथळे असल्याचे आढळून आले. त्यामुळे पेरीव धान पेरणी क्षेत्र वाढविण्यासाठी राज्याच्या कृषि विभागाच्या कृषि यांत्रिकिकरण योजनेंतर्गत शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात धान पेरणी यंत्र उपलब्ध करुन देण्यात यावे, अशी शिफारस करण्यात येते.

## (ड) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी ४९ वी संयुक्त कृषि संशोधन आणि विकास समिती बैठक संशोधन शिफारशी २०२०-२१ मध्ये पारित करण्यात आलेले वाण, यंत्र व शिफारशी

**अ) वाण प्रसारण :**

**१. ज्वारी (रब्बी हुरडा) : परभणी वसंत (पीव्हीआरएसजी-१०१)** परभणी वसंत (पीव्हीआरएसजी-१०१) : हा रब्बी ज्वारीचा हुरडा वाण इतर वाणापेक्षा हुरडा व हिरवा चारा उत्पादनात सरस आढळून आला आहे. या वाणाचे दाणे मऊ गोड असून कणसापासून सहज वेगळे होतात. हा वाण खोडमाशी, खोडकिडा या किडीस व खडखड्या रोगास मध्यम प्रतिकारक्षम आढळुन आला आहे. त्यामुळे परभणी वसंत (पीव्हीआरएसजी-१०१) या वाणाची रब्बी ज्वारीचा हुरडा म्हणून मराठवाडा विभागासाठी प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येते.

**२. सोयाबीन एम ए यु एस-७२५ :** सोयाबीन पिकाचा वाण एम. ए.यु एस. ७२५ हा स्थानिक व राष्ट्रीयतुल्यबळ वाणांपेक्षा उत्पादनात सरस आढळून आला आहे. हा वाण विविध कीड व रोगास मध्यम प्रतिकारक आढळून आला म्हणून एम ए यु एस- २५ या वाणाची मराठवाडा विभागात लागवडीसाठी प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**३. करडई : पीबीएनएस-१५४** करडईचा पी बी एन एस-१५४ हा वाण पीबीएनएस-१२ व शारदा या तुल्यबळ वाणापेक्षा अनुक्रमे २३.६२ व २७.६९ टक्के दाण्याच्या उत्पादनात अधिक सरस आढळून आला. या वाणामध्ये ३०.९० टक्के तेलाचे प्रमाण असुन हा वाण मररोग, पानावरील ठिपके (अल्टरनेरीया) तसेच मावा किडीस सहनशील आढळुन आला आहे. या वाणाची मराठवाडा विभागासाठी शिफारस करण्यात येत आहे.

**ब) कृषि यंत्रे प्रसारण :**

**१. वनामकृवि विकसित ट्रॅक्टर चलित आंतरमशागत व फवारणी यंत्र वनामकृवि विकसीत ट्रॅक्टर चलित आंतरमशागत व फवारणी यंत्राची आंतरमशागत, सऱ्या मोकळ्या करणे व किटकनाशकाची फवारणी असे एकत्रित कामे करण्यासाठी (कमी रुंदीचे टायर वापरून) प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.**

**वैशिष्टे :**

१. एकाचवेळी आंतरमशागत, सऱ्या मोकळ्या करणे व फवारणीचे काम करता येते.

२. पिकाच्या ओळीतील अंतराप्रमाणे पास बदलता येते.

३. कमी रुंदीचा टायर वापरल्यामुळे पिकाचे नुकसान होत नाही आणि ट्रॅक्टरद्वारे यांत्रिक पद्धतीने एकाचवेळी तीन कामे करता येतात.

४. फक्त फवारणीचे कामाकरिता सुद्धा उपयुक्त .

५. ट्रॅक्टरचा अधिकतम उपयोग करता येतो.

६. **कार्यक्षमता:** १.५ एकर प्रति तास असून लागणारे श्रम, वेळ व पैसा यामध्ये १५ ते ३० टक्के बचत होते.

२. **वनामकृवि विकसित बैलचलित गादी वाफा तयार करणे यंत्र वनामकृवि विकसीत बैलचलित गादी वाफा तयार करणारे अवजार ६० ते १५० से.मी. रुंद गादी वाफा तयार करण्यासाठी प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.**

**वैशिष्टे**

१. ६० ते १५० से.मी. रुंदीचे गादी वाफे तयार करता येतात.

२. यंत्राची कार्यक्षमता १.३ हेक्टर प्रति दिवस आहे.

३. मृद व जलसंधारणासाठी उपयुक्त आहे.

४. वनामकृवि विकसीत एक बैलचलित सरी यंत्र

३. **वनामकृवि विकसीत एक बैलचलित सरी यंत्र सर्व प्रकारच्या पिकांमध्ये सरी व वरंबा पाडण्याकरिता प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे**

**वैशिष्टे :**

१. ३० ते ५० सेंमी रूंदीच्या

२. १५ सेंमी खोलीच्या सऱ्या पाडता येतात.

३. पारंपारीक पद्धतीपेक्षा ३० ते ४० टक्के खर्चात बचत होते.

४. **कार्यक्षमता :** एक एकर प्रति दिवस

**४. वनामकृवि विकसीत स्वयंचलितफ्लैल मुवर वनामकृवि विकसीत स्वयंचलितफ्लैल मुवर, रिकामी मैदाने, पडीक जमिनीतील तसेच शेतातील जास्त उंचीचे गवत कापण्यासाठी प्रसारीत करण्याची शिकारस करण्यात येत आहे.**

**वैशिष्टे :**

१. ५ एच. पी. डिझेल इंजिनच्या साहयाने चालते.

२. रिकामी मैदाने, पडीक जमिनी व बांध रस्ताच्या बाजुचे गवत कापता येते.

३. मनुष्यचलित असून एरगॉनॉमीकली वापरण्यास योग्य

४. **कार्यक्षमता :** २ एकर प्रतिदिवस असून गवत कापण्याची क्षमता ९० टक्के इतकी आहे.

५. ९० सेंमी उंचीपर्यंतचे गवत कापता येते.

**५. वनामकृवि विकसीत मनुष्यचलित रोपे लागवड यंत्र : वनामकृवि विकसीत मनुष्यचलित भाजीपाला रोपे लागवड यंत्राची प्रसारणाकरिता शिफारस करण्यात येत आहे.**

**वैशिष्टे :**

१. भाजीपाला रोपाची लागवड करता येते.

२. पारंपारीक पद्धतीमध्ये होणारा त्रास कमी होतो.

३. मनुष्याच्या शारीरिक मापानुसार विकसित असल्यामुळे वापरण्यास सुलभ

४ **कार्यक्षमता :** ०.०२३ हेक्टर प्रति तास

५. वजनाने हलके

**६. वनामकृवि विकसीत मधुमक्याच्या कणसाचे दाणे काढणारे हस्तचलीत यंत्र वनामकृवि विकसीत ताज्या मधुमक्याच्या कणसाचे दाणे काढणारे हस्तचलीत यंत्र प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.**

**वैशिष्टे :**

१. वजन : ४.७ किलो

२. क्षमता : ८ किलो प्रती तास

३. **कार्यक्षमता :** ९७ टक्के

**७. वनामकृवि विकसित बैलचलित बहुउद्देशीय फिरती सौर ऊर्जा गाडी**

वनामकृवि विकसित बहुउद्देशीय बैलचलित फिरत्या सौर ऊर्जा गाडीची विविध शेती कामे जसे की १८० सें.मी. उंची पर्यंतच्या विविध पिकांवर किटकनाशके/ तणनाशके फवारणी करणे, ७ मी. पर्यंतच्या खोलीपासून पाणी उपसणे व ५०० वॅट पर्यंतची घरगुती विद्युत उपकरणे चालविणे या साठी प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**वैशिष्टे :**

१. प्रदूषण विरहीत बैलचलित सौर गाडी

२. १८० सें. मी. उंची पर्यंतच्या विविध पिकासाठी फवारणी करता येते.

३. ७ मी. पर्यंतच्या खोलीपासून पाणी उपसता येते.

४. ५०० वॅट पर्यंतची घरगुती उपकरणे चालवता येतात.

५. इंधनविरहीत असून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहजपणे वापरता येते.

**क) पीक उत्पादन तंत्रज्ञानावर आधारीत शिफारशी**

१. उन्हाळी हंगामात हुरडा ज्वारीपासून हुरड्याचे व हिरव्या चाऱ्याचे अधिक उत्पादन व नफा मिळण्यासाठी मराठा विभागामध्ये जानेवारीच्या पहिल्या पंधरवाड्यात पेरणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२. उन्हाळी भेंडीवरील हळद्या रोगाचा (यलो व्हेन मोझॅक) प्रादुर्भाव हवामानातील घटकांचा परस्पर संबंध दर्शविणाऱ्या खालील सूत्राची हळद्या रोगाच्या प्रादुर्भावाची हंगामात एक आठवडा आधी पूर्वसूचना देण्याकरिता मराठवाडा विभागासाठी शिफारस करण्यात येत आहे.

३. सूत्र : मागील १० वर्षाच्या हवामान निरीक्षणानुसार हळद्यारोग (टक्के) = -२५.१८१ - ४.२५५ x किमान तापमान- १.०४० X सकाळची सापेक्ष आर्द्रता अ ६.५६७ X हवेचा वेग

याठिकाणी,

हळद्या हा रोग टक्के = भेंडीवरील हळद्या रोगाचा (यलोव्हेनमोझॅक) प्रादुर्भाव (किमान तापमान अंश सेल्सीअस) सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) आणि हवेचा वेग (किमी/तास)

४. मराठवाड्यामध्ये चिंचेचे अधिक उत्पादन घेण्याकरिता जमिनीमध्ये मुक्त चुन्याचे प्रमाण १५ टक्क्यापेक्षा कमी असलेल्या मध्यम खोल ते खोल जमिनीची निवड करावी. जर मुक्त चुन्याचे प्रमाण १५ टक्यापेक्षा (१५ ते २५ टक्के) जास्त असल्यास उत्पादन वाढीसाठी शेणखत व सिंचनाचा उपयोग करावा अशी शिफारस करण्यात येते.

५. तूर पिकाचे अधिक उत्पादन, अधिक नफा व जमिनीचे गुणधर्म सुधारण्यासाठी सुडोमोना स्ट्रायटा या जस्त विरघळणाऱ्या द्रवरुप जीवाणू संवर्धनाची १०० मिली लीटर प्रती दहा किलोप्रमाणे बीज प्रक्रिया व शिफारशीत खत मात्रेसह ३० किलो जस्त सल्फेट देण्याची शिफारस करण्यात येते.

६. मराठवाड्यातील खोल काळ्या जमिनीसाठी खरीप हंगामातील तूर पिकाच्या अधिक उत्पादनासाठी आणि आर्थिक फायद्यासाठी शिफारशीत खत मात्रेसोबत (२५:५० किलो नत्र व स्फुरद) २५ किलो पालाश व २५ किलो सुक्ष्म अन्नद्रव्य ग्रेड-१ जमिनीतून द्यावी किंवा सूक्ष्म अन्नद्रव्य ग्रेड-२ ची ०.५ टक्के पिकाच्या फुल धारणेच्या अवस्थेमध्ये फवारणीची शिफारस करण्यात येते. (टीप : सुक्ष्म अन्नद्रव्य ग्रेड-१ मधील सुक्ष्म अन्नद्रव्याचे प्रमाण ५ टक्के जस्त, २ टक्के लोह, १ टक्के बोरॉन, ०.५ टक्के तांबे, १ टक्के मँगनीज तसेच अलद्रव्ये ग्रेड-२ मधील सुक्ष्म अन्नद्रव्याचे प्रमाण : ३ टक्के जस्त, २.५ टक्के लोह, ०.५ टक्के बोरॉन, १ टक्के तांबे, ०.१ टक्के मॉलिब्डेनम आणि १ टक्के मँगनीज.)

७. मराठवाडा विभागात पेरसाळ पिकाचे अधिक उत्पादन आणि निव्वळ आर्थिक फायदा मिळविण्यासाठी प्रती हेक्टरी शिफारस केलेल्या रासायनिक खत मात्रेसोबत (८०:५०:५० नत्र:स्फुरद: पालाश किलो/ हे.) सुक्ष्म अन्नद्रव्ये ग्रेड-१ (२५ किलो/हे.) या प्रमाणे जमिनीतून द्यावे किंवा शिफारस केलेल्या रासायनिक खत मात्रेसोबत (८०:५०:५० नत्र:स्फुरद:पालाश किलो/हे.) सुक्ष्म अन्नद्रव्ये ग्रेड-२ ची (०.५%) प्रमाणे दोन वेळा (पेरणीनंतर अनुक्रमे ३० व ५० दिवसांनी) फवारणी करावी अशी शिफारस करण्यात येते. **(टीप:** सुक्ष्म अन्नद्रव्य ग्रेड-१ मधील सुक्ष्म अन्नद्रव्याचे प्रमाण ५ टक्के जस्त, २ टक्के लोह, १ टक्के बोरॉन, ०.५ टक्के तांबे, १ टक्के मँगनीज तसेच अन्नद्रव्ये ग्रेड-२ मधील सुक्ष्म अन्नद्रव्याचे प्रमाण ३ टक्के जस्त, २.५ टक्के लोह, ०.५ टक्के बोरॉन, १ टक्के तांबे, ०१ टक्के मॉलिब्डेनम आणि १ टक्के मँगनीज )

८. मराठवाडा विभागात पेरसाळ पिकाचे अधिक उत्पादन व आर्थिक फायदा मिळविण्यासाठी ७५ टक्के शिफारशीत खत (६०:४०:४० नत्र: स्फुरद:पालाश किलो/हे.) मात्रेसोबत हेक्टरी ५ टन शेणखत द्यावे तसेच अधिक पेरसाळ समतुल्य उत्पादन आणि आर्थिक फायदा मिळविण्यासाठी पेरसाळ + सोयाबीन (३:२) किंवा पेरसाळ + उडीद (३:२ याप्रमाणे) आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा अशी शिफारस करण्यात येते.

९. मराठवाडा विभागात ज्वारीच्या खरीप चारा पिकाचे अधिक उत्पादन आर्थिक नफा मिळवण्यासाठी खताची १००:५०:५० नत्र:सुफरद:पालाश कि. ग्रॅ. प्रती हेक्टर मात्रा (५०:५०:५० नत्र:सुफरद:पालाश कि. ग्रॅ. प्रती हेक्टर पेरणीच्यावेळी व ५० कि. ग्रॅ. नत्र प्रति हेक्टर पेरणीनंतर ३० दिवसांनी) देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१०. मराठवाडा विभागातील कोरडवाहू शेतीकरिता अधिक उत्पादन व उत्पन्न मिळण्यासाठी सोयाबीन + तूर (४:२) आणि कापूस + सोयाबीन (१:१) या आंतरपीक पद्धतींची एक वर्ष आड घेण्याची शिफारस करण्यात येत आहे, अधिक उत्पादन तसेच जमिनीचा पोत सुधारण्यासाठी आणि सेंद्रीय कर्बाची वाढ होण्यासाठी, सोयाबीन + तूर या आंतरपीक पद्धतीकरिता प्रचलित मशागत पद्धतीसोबत रासायनिक खतांची मात्रा (५० टक्के) + शेणखत (२.५ टन/हे.) आणि कापूस + सोयाबीन या आंतरपीक पद्धतीकरीता प्रचलित मशागत पद्धतीसोबत शिफारसीत रासायनिक खताची मात्रा यांची शिफारस करण्यात येत आहे.

११. सोयाबीन-करडई या पीक पद्धतीपासून अधिक उत्पादन व उत्पन्न मिळवण्यासाठी तसेच पावसाच्या पाण्याचे सुयोग्य संधारण होण्यासाठी संपूर्ण यांत्रिकीकरणासोबत (जमिनीच्या पूर्व मशागतीपासून ते कापणीपर्यंत टॅक्टर अवजाराद्वारे) रुंद वरंबा सरी पद्धतीने पेरणी करण्याची शिफारस करण्यात येते.

१२. लागवड ६०-१२० मी. २० १२. तूरीचे अधिक उत्पादन तथा आर्थिक नफा मिळण्यासाठी तूरीची सें.मी. (जोडओळ) किंवा ९० सें.मी. x २० सें.मी. अंतरावर करण्याची तसेच ब्रासीनोस्टिरॉइड ०.१ पी.पी.एम. ब्रासीनो-स्टिरॉइड ०.०४ टक्के @२.५ मिली /१० लीटर पाणी) किंवा एनएए ४० पी.पी.एम. (एनएए ४.५ टक्के @ ८.८ मिली/१० लीटर पाणी) ची कळी व फुलोरा अवस्थेत फवारणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१३. मराठवाडा विभागात उन्हाळी कांदा पिकाचे अधिक उत्पादन व आर्थिक फायद्यासाठी रुंद वाफ्यावर १५x७.५ सें.मी. याप्रमाणे पिकाच्या सहा ओळीची लागवड करून मध्यभागी इनलाईन ठिबक नळीने दिवसाआड एकत्रित पीक बाष्पोत्सर्जनाच्या ६० टक्के प्रमाणे, पाणी देवून विद्राव्य खताद्वारे ८०:४०:४० नत्र: स्फुरद:पालाश कि/हे: एकुण मात्रेच्या नत्र ८ किलो व पालाश ४ किलो या प्रमाणे १० समान मात्रेत लागवडीच्या दिवसापासून ७० दिवसापर्यंत तसेच स्फुरद ८ किलो ५ समान मात्रेत लागवडीच्या ७ दिवसापासुन ते ३५ दिवसापर्यंत देण्याची शिफारस करण्यात येते. ड्रिपद्वारे २.४ लिटर प्रती तास ३० सें.मी. अंतरावरील इनलाईन ड्रिपर असलेल्या १६ मि.मी. इनलाईन उपनळी ठिबक संचातून उन्हाळी कांदा पिकास पीक बाष्पोत्सर्जनाच्या ६० टक्के प्रमाणे प्रती झाड (लीटर) पाणी देण्याचे वेळापत्रक :

| हवामान संबंधीचा आठवडा | सिंचन देण्यासाठी लागवडीनंतरचे आठवडे | ठिबक संच चालु ठेवण्याचा कालावधी (मिनीटे) | साप्ताहिक तापमान (अंश सेल्सिअस) | |
|---|---|---|---|---|
| | | | कमाल | किमान |
| ३ | पेरणीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत | १४ | ३०.३ | १२.२ |
| ४ | दुसऱ्या आठवड्यात | १४ | ३०.४ | १२.१ |
| ५ | तिसऱ्या आठवड्यात | १६ | ३०.० | ११.१ |
| ६ | चौथ्या आठवड्यात | १५ | ३०.१ | १२.९ |
| ७ | पाचव्या आठवड्यात | २६ | ३२.० | १३.४ |
| ८ | सहाव्या आठवड्यात | ४१ | ३४.९ | १५.१ |
| ९ | सातव्या आठवड्यात | ४२ | ३४.५ | १४.७ |
| १० | आठव्या आठवड्यात | ४० | ३५.२ | १६.३ |
| ११ | नवव्या आठवड्यात | ४४ | ३५.४ | १८.६ |
| १२ | दहाव्या आठवड्यात | ४२ | ३७.२ | १७.८ |
| १३ | अकराव्या आठवड्यात | ४७ | ३९.५ | १९.२ |
| १४ | बाराव्या आठवड्यात | ४१ | ३९.५ | २०.७ |
| १५ | तेराव्या आठवड्यात | ३७ | ४०.१ | २१.५ |
| १६ | चौदाव्या आठवड्यात | २८ | ४०.३ | २२.२ |
| १७ | पंधराव्या आठवड्यात | ३० | ४२.० | २२.५ |

टिप : लागवडीनंतर पहिल्या आठवड्यापर्यंत दररोज पाणी देणे आणि लागवडीनंतर दुसऱ्या आठवड्यापासून एक दिवसाआड पाणी देणे.

**उन्हाळी कांदा पिकास खते देण्याचे वेळापत्रक :**

| अ.क्र. | खते देण्याचा कालावधी | खताची मात्रा (८०:४०:४० कि/हे.नत्र:स्फुरद:पालाश) | | | विद्राव्य खते कि/हे. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नत्र | स्फुरद | पालाश | युरीया | १२:६१:०० | ०:०:५० |
| १. | लागवडी नंतर ०-७ दिवसानी | ८ | ८ | ४ | १३.९५ | १३.११ | ८ |
| २. | लागवडी नंतर ८-१४ दिवसानी | ८ | ८ | ४ | १३.९५ | १३.११ | ८ |
| ३. | लागवडी नंतर १५-२१ दिवसानी | ८ | ८ | ४ | १३.९५ | १३.११ | ८ |
| ४. | लागवडी नंतर २२-२८ दिवसानी | ८ | ८ | ४ | १३.९५ | १३.११ | ८ |
| ५. | लागवडी नंतर २९-३५ दिवसानी | ८ | ८ | ४ | १३.९५ | १३.११ | ८ |
| ६. | लागवडी नंतर ३६-४२ दिवसानी | ८ | - | ४ | १७.३६ | - | ८ |
| ७. | लागवडी नंतर ४३-४९ दिवसानी | ८ | - | ४ | १७.३६ | - | ८ |
| ८. | लागवडी नंतर ५०-५६ दिवसानी | ८ | - | ४ | १७.३६ | - | ८ |
| ९. | लागवडी नंतर ५७-६३ दिवसानी | ८ | - | ४ | १७.३६ | - | ८ |
| १०. | लागवडी नंतर ६०-७० दिवसानी | ८ | - | ४ | १७.३६ | - | ८ |
| | एकूण | ८० | ४० | ४० | १५६.४४ | ६५.५५ | ८० |

१४. मराठवाडा विभागात तुर पिकाचे अधिक उत्पादन व अधिक फायद्यासाठी पिकाची लागवड १५० x ३० सें.मी. अंतरावर करुन प्रत्येक ओळीस ठिबक नळीने एक दिवसाआड, एकत्रित पीक बाष्पोत्सर्जनाच्या ८० टक्के प्रमाणे, पाणी देवुन विद्राव्य खताद्वारे २०:४०:२० नत्र:स्फुरद: पालाश कि/हे. एकुण मात्रेच्या नत्र २० टक्के व पालाश ४० टक्के दोन समान मात्रेत पेरणीनंतर ० - ३० दिवसामध्ये ३०, टक्के नत्र, स्फुरद व २५ टक्के पालाश तीन समान मात्रेत ३१-६० दिवसामध्ये ३० टक्के नत्र, स्फुरद व ४० टक्के पालाश तीन समान मात्रेत ६१-९० दिवसामध्ये आणि २० टक्के नत्र व ३५ टक्के पालाश दोन समान मात्रेत ९१-१२० दिवसामध्ये देण्याची शिफारस करण्यात येते. ड्रिपद्वारे २.४ लीटर प्रती तास व ३० सें.मी. अंतरावरील इनलाईन ड्रिपर असलेल्या १६ मि.मी. इनलाईन उपनळी ठिबक संचातून तूर पिकास पीक बाष्पोत्सर्जनाच्या ८० टक्के प्रमाणे प्रती झाड (लीटर) पाणी देण्याचे वेळापत्रक :

| हवामान संबंधीचा आठवडा | सिंचन देण्यासाठी लागवडीनंतरचे आठवडे | ठिबक संच चालू ठेवण्याचा कालवधी (मिनीटे) | साप्ताहिक तापमान (अंश सेल्सिअस) | |
|---|---|---|---|---|
| | | | कमाल | किमान |
| २६ | पेरणीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत | १२ | ३३.२ | २२..८ |
| २७ | दुसऱ्या आठवड्यात | १२ | ३२.३ | २२.९ |
| २८ | तिसऱ्या आठवड्यात | १५ | ३१.२ | २२.६ |
| २९ | चौथ्या आठवड्यात | १६ | ३१.९ | २२.६ |
| ३० | पाचव्या आठवड्यात | ३४ | ३०.६ | २२.४ |
| ३१ | सहाव्या आठवड्यात | ३५ | ३१.१ | २२.१ |
| ३२ | सातव्या आठवड्यात | ३३ | ३०.२ | २२.२ |
| ३३ | आठव्या आठवड्यात | २९ | २९.५ | २१.७ |
| ३४ | नवव्या आठवड्यात | ५१ | ३०.६ | २१.४ |
| ३५ | दहाव्या आठवड्यात | ५९ | ३०.७ | २१.४ |
| ३६ | अकराव्या आठवड्यात | ६४ | ३१.७ | २१.२ |
| ३७ | बाराव्या आठवड्यात | ७४ | ३१.५ | २१.४ |
| ३८ | तेराव्या आठवड्यात | ५८ | ३१.५ | २१.८ |
| ३९ | चौदाव्या आठवड्यात | ८६ | ३२.२ | २१.३ |
| ४० | पंधराव्या आठवड्यात | १०० | ३३.२ | २०.६ |
| ४१ | सोळाव्या आठवड्यात | ९७ | ३२.७ | १९.३ |
| ४२ | सतराव्या आठवड्यात | १०७ | ३२.३ | १९.१ |
| ४३ | अठराव्या आठवड्यात | ९६ | ३२.१ | १८.९ |
| ४४ | एकोणिसाव्या आठवड्यात | ९१ | ३१.९ | १६.९ |

| हवामान संबंधीचा आठवडा | सिंचन देण्यासाठी लागवडीनंतरचे आठवडे | ठिबक संच चालू ठेवण्याचा कालवधी (मिनीटे) | साप्ताहिक तापमान (अंश सेल्सिअस) | |
|---|---|---|---|---|
| | | | कमाल | किमान |
| ४५ | विसाव्या आठवड्यात | ७८ | ३२.० | १५.० |
| ४६ | एकविसाव्या आठवड्यात | ६४ | ३२.० | १४.१ |
| ४७ | बाविसाव्या आठवड्यात | ५८ | ३१.१ | १५.२ |
| ४८ | तेविसाव्या आठवड्यात | ४९ | ३०.० | १३.७ |
| ४९ | चोविसाव्या आठवड्यात | ३३ | ३०.५ | १२.७ |
| ५० | पंचविसाव्या आठवड्यात | १९ | २९.९ | १४.८ |
| ५१ | सव्विसाव्या आठवड्यात | १९ | २८.१ | ११.२ |

**तूर पिकास खते देण्याचे वेळापत्रक :**

| कालावधी (दिवस) | खत विभागणी संख्या | खतेदेण्याची वेळ | खत मात्रा (२०:४०:२० कि/हे.नत्र:स्फुरद:पालाश | | | | विद्राव्य खते कि/हे. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | नत्र: | स्फुरद: | पालाश | युरीया | १२:६१:१० | ०:०:५० |
| ०१-३० | २ | पेरणीनंतर १० आणि २० दिवसानी | ४ | १६ | - | १.८६ | १३.११ | - |
| ३१-६० | ३ | पेरणीनंतर ३१, ४० आणि ५० दिवसानी | ६ | १२ | ५ | ७.८९ | ११.६७ | १० |
| ६१-९० | ३ | पेरणीनंतर ६१, ७० आणि ८० | ६ | १२ | ८ | ७.८९ | १९.६७ | १६ |
| ९१-१२० | २ | पेरणीनंतर ९१ आणि ११० | ४ | - | ७ | ८.६८ | . | १४ |
| **एकूण** | **१०** | **.** | **२०** | **४०** | **२०** | **२६.३२** | **५२.४५** | **४** |

१५. रब्बी हंगामात ओवा पिकापासून अधिक उत्पादन आणि निव्वळ नफा मिळविण्यासाठी एए -२ या वाणाची मराठवाडा विभागात लागवड करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१६. रबी हंगामात बडीशेप पिकापासुन अधिक उत्पादन आणि निव्वळ नफा मिळविण्यासाठी एएफ-१ या वाणाची मराठवाडा विभागात लागवड करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१७. उन्हाळी हंगामात वांगी पिकापासून अधिक उत्पादन आणि निव्वळ नफा मिळवण्यासाठी चंदेरी काळ्या पॉलीथीन आच्छादनाची मराठवाडा विभागात शिफारस करण्यात येत आहे.

१८. आरोग्यदायी श्रीखंड बनविण्यासाठी चक्क्याच्या ०.०४ टक्के या प्रमाणात कुरकुमीन पावडरचा (सोडीयम अल्जीनेटमध्ये न्कॅप्सुलेटेड स्वरूपात) वापर करून रेफ्रिजरेशन तापमानाला २१ दिवस टिकवण क्षमता असलेले मुल्यवर्धीत श्रीखंड तयार करण्याची शिफारस करण्यात येते.

१९. पनीर व्हे च्या द्रावणात गव्हाला ४ दिवस वातावरणाच्या तापमानाला भिजवुन मुल्यवर्धीत कुरडई तयार करण्याच्या तंत्रज्ञानाची शिफारस करण्यात येते.

२०. चॉकलेट खजुर मटकी बार तयार करण्यासाठी ५० टक्के गडद चॉकलेट, ४० टक्के खजुर गर व १० टक्के मटकी सत्व वापरण्याची आणि ५ अंश सेल्सीयस तापमानास तीन तास ठेवून दोन महिन्यांपर्यंत वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे

२१. उत्तम पौष्टिक आहार तयार करण्यासाठी तांदुळपीठ, हुलगा सत्व, साखर, गाजर भुकटी व दुध भुकटी  ६०:२०:१०:५:५ या प्रमाणात तयार करुन तीन महिन्यांपर्यंत वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२२. गाजर आणि टोमॅटोचा रस (७०:३० प्रमाणात १६ डिग्री ब्रिक्स) घेऊन उत्तम प्रतिचे प्रजैविक पेय तयार करण्यासाठी त्यात लैक्टोबेसिलस ॲसीडोफिलस व सॅकरोमायसेस बोलार्डी (१:१ प्रमाणात) १० टक्के मिश्रणाचे घेऊन २० तास किण्वन करून एक महिन्यापर्यंत वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२३. उत्तम प्रतिचे इन्स्टंट ब्रोकोली टोमॅटो सूप मिश्रण तयार करण्याकरिता १५ टक्के ब्रोकोली आणि ४५ टक्के टोमॅटो भुकटीचा वापर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२४ उत्तम प्रतिची गुणवत्ता असलेले जवस युक्त  पौष्टीक कुकीज तयार करण्याकरिता मैदा आणि भाजलेले जवस पीठ ९०:१० या प्रमाणात १००० ग्रॅम, ५२० ग्रॅम साखर, ४८० ग्रॅम वनस्पती तूप, २० ग्रॅम बेकिंग पावडर, १० ग्रॅम अमोनियम बायकार्बोनेट वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२५. उत्तम प्रतिचे शित पेय तयार करण्यासाठी किवी फळाचा रस १० टक्के आणि गवती चहाचा अर्क २ टक्के (१ ग्रॅम गवती पावडर +५ मि.ली. पाणी) या प्रमाणात वापर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२६. गहु आणि ज्वारीच्या ९० टक्के मिश्रीत पीठ (७० टक्के गाचे पीठ व ३० टक्के ज्वारीचेपीठ) १० टक्के चिया बियांची पावडर वापरुन पोषणोत्तम व उत्तम प्रतिच्या शेवया तयार करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२७. चव चाचणीनुसार उत्तम स्वीकार्यता असलेल्या प्रथिने युक्त  क्रॅकर्समध्ये विलगीकरण केलेले १५ टक्के गवार मील प्रथिनेचा वापर करून प्रौढ श्वानासाठी खाद्य तयार करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२८. उत्तम गवार प्रतिचा तंतुमय पदार्थ युक्त  पिझ्झा सॉस तयार करण्यासाठी ७ टक्के पार्शियल हॉयड्रोलाइज्ड डिंक (पीएचजीजी) वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२९. नातवंडाच्या संगोपनातील आजी आजोबांच्या सहभागाचे अधिक फायदे आढळून आल्यामुळे बालसंगोपनात आजी आजोबांच्या सहभागासाठी पालकांनी सकारात्मक राहण्याची शिफारस करण्यात येते.

३०. अंगणवाडी कार्यकर्त्यांसाठी बालकाच्या शिक्षणासाठी उत्तेजनात्मक वातावरणाचे महत्त्व, बालकांच्या विकासाचे घटक, प्रभावी अंगणवाडी सेविकांची गुणवैशिष्ट्ये, मुलामध्ये वाचन आणि लेखन कौशल्ये विकसित करणे तसेच अंगणवाडी केंद्रामध्ये दैनंदिन कृती उपक्रम राबवणे या घटकांद्वारे अंगणवाडी सेविकांचे बालविकासाचे ज्ञान वृद्धिंगत होण्यासाठी आणि त्यांची भूमिका प्रभावीपणे राबविण्यासाठी अंगणवाडी कार्यकर्त्यांचे सक्षमीकरण करणाऱ्या कार्यशाळेची शिफारस करण्यात येते.

३१. ग्रामीण तरुण महिलांच्या सक्षमीकरणासाठी "प्रजनन, माता आणि बालकांच्या आरोग्याची काळजी" या विषयी प्रशिक्षण कार्यक्रम महिला आणि बालकल्याण विभागाने प्रभावीपणे वापरात आणावा अशी शिफारस करण्यात येत आहे.

३२. प्रथिने (२५.११ ग्रॅ./ १०० ग्रॅ.) आणि उर्जा समृद्ध (४४६ कि. कॅलरीज / १०० ग्रॅ.) १०० ग्रॅ. वापरासाठी तयार मिश्रण (अनुक्रमे गव्हाचे पीठ, सोयाबीनचे पीठ, शेंगदाणे, सूर्यफूलाच्या बिया, दूधाची भुकटी आणि पीठी साखर २०:२०:१०:२०:२०:१०) वजन वाढविण्यासाठी कृशमहिलांच्या दैनंदिन आहारात पोळी, लापशी आणि बिस्कीटे या स्वरूपात समाविष्ट करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३३. गृहिणीचा वेळ, पैसा आणि मानवी ऊर्जा विषयक व्यवस्थापकीय कौशल्याचे मूल्यांकन करण्यासाठी विकसित वस्तुनिष्ठ चाचण्यांचा संच वापरण्याची शिफारस करण्यात येते.

३४ वाळलेल्या आणि टाकाऊ लाल गुलाबाच्या पाकळ्यांचा, पर्यावरणस्नेही रंग बनवून सुती कापड रंगविण्याकरिता वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३५. तुरीवरील शेंगा पोखरणाऱ्या अळ्यांचे किफायतशीर व्यवस्थापनाकरिता पिक ५० टक्के कुलोरा अवस्थेत असताना बॅसिलस थुरिनजीएन्सीस २० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यामध्ये मिसळून पहिली फवारणी करावी आणि दुसरी फवारणी शेंगा वाढीच्या अवस्थेत करण्याची शिफारस करण्यात येत आहे

३६. प्लास्टिक आच्छादनाच्या प्रकाशीय गुणधर्मावर आधारीत भारी जमिनीचे तापमान व तण नियंत्रित करण्याकरिता ३० माइक्रॉन चंदेरी - काळया प्लास्टिक आच्छादनाची उन्हाळी भाजीपाला पिकासाठी शिफारस करण्यात येत आहे.

३७. वनामकृवि विकसीत कमी खर्चिक वेष्टणीकरण तंत्राद्वारे सोयापनीरची टिकवण क्षमता २२ दिवसापर्यंत वाढविण्यासाठी सोयापनीरला ६ टक्के व्हे प्रोटीन कॉन्सन्ट्रेट, ५ टक्के ग्लीसरॉल आणि १ टक्का पोटॅशियम सॉरबेट, इ. पासून बनवलेल्या खाण्यायोग्य द्रावणाचे आवरण देऊन व निर्वायु वेष्टणीकरण करुन (एल डी पी ई २०० गेज) शीतगृहात (तापमान ५ $\pm$ १ अंश से. ) साठवणूक करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३८. वनामकृवि विकसित प्रक्रियेद्वारे उत्तम प्रतीचे आर.टी.ई. केशरी रंगाच्या गाजराचे काप (जाडी ३ मी.मी.) ब्लाचिंग फ्रीज-थॉ पूर्व प्रक्रिया (२ मिनिटे स्टिम ब्लॉचिंग, -२५ अंश से. फ्रीजींग तापमान व ५ अंश से. तापमानावर ८ तास थॉईंग) करुन ऑस्मो कन्व्हेक्टीव वाळवणी तंत्रज्ञानाद्वारे बनविण्यासाठी गाजराचे काप साखरेच्या पाकात (५०$^{\circ}$ ब्रिक्स, ५० अंश से. तापमान) ४ तास बुडवून ट्रे ड्रायरमध्ये ६० अंश से. तापमानावर वाळविण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३९. मराठवाडयातील सर्व तालुक्यांसाठी हवामान आठवडानिहाय सिंचनाची गरज काढण्याकरिता वनामकृवि विकसित संदर्भिय बाष्पोत्सर्जन सारणी तसेच भौगोलिक माहिती प्रणालीद्वारे (जी.आय.एस.) विकसित केलेले स्थानिक वितरण नकाशे, सिंचन नियोजन व व्यवस्थापनासाठी वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४०. शिफारस करण्यात येते की, आदिवासी उप-प्रकल्पाच्या लाभार्थी शेतकऱ्यांना हळद उत्पादन वाढीकरिता एकात्मिक कीड व अन्नद्रव्य व्यवस्थापन तसेच हळद पिकापासुन अधिकतम मिळकतीच्या दृष्टीने हळद प्रक्रिया उद्योग याबद्दल कृषि विद्यापीठाने प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करावे.

४१. मराठवाडा विभागातील कृषी विस्तारकांमध्ये विस्तारकार्याकरिता समाज माध्यमांचा वापर वाढत असल्याने कृषि तंत्रज्ञानावर आधारीत समाज माध्यमाद्वारे प्रसार करण्यासाठी उपयुक्त  व शेतकऱ्यांच्या मागणीनुसार व्हिडीओ निर्मिती करण्यासाठी विद्यापीठ स्तरावर माध्यम प्रयोगशाळेची (मिडिया लॅब) स्थापना करण्याची शिफारस करण्यात येते.

४२. मराठवाडा विभागातील कृषी विस्तारकांमध्ये विस्तारकार्याकरिता समाज माध्यमांचा वापर वाढत असल्याने वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने कृषि तंत्रज्ञानाच्या प्रसाराकरिता समाज माध्यमांचा प्रभावी वापर आणि स्थानिक भाषेत ई-सामुग्री विकास यावर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याची शिफारस करण्यात येते.

४३. वनामकृवि, परभणी अशी शिफारस करते की, लातूर कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये सोयाबीन पिकाच्या किमतीचा कमी कालावधीसाठी भविष्यातील अंदाज बांधण्यासाठी SARIMA (०,१,३) $(०,१,१)_{१२}$ या मॉडेलचा शास्त्रज्ञांनी उपयोग करावा.

४४ महाराष्ट्रातील सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये तूर व हरभरा या पिकांच्या भविष्यातील किमतीचा अंदाज वर्तवणारी यंत्रणा असावी, ज्यामुळे शेतकऱ्यांना आलेल्या मालाचे विक्री व्यवस्थापन करणे व पिकाखालील क्षेत्र ठरविणे शक्य होईल अशी शिफारस करण्यात येते.

# (इ) डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ

दापोली ४१२ ७१२, जि. रत्नागिरी

## संशोधन शिफारशी २०२१

### पीक उत्पादन तंत्रज्ञानावर आधारीत शिफारशी

### यंत्रे व अवजारे

**१) कोकण कल्प खेकडा पक्कड**

जिवंत खेकड्याच्या सुरक्षीत हाताळणीसाठी डॉ. बासाकोकृ विद्यापीठाने विकसीत कोकण कल्प खेकडा पक्कड प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**वैशिष्टे :**



१. जिवंत खेकड्यांची सुलभ आणि सुरक्षितपणे हाताळणी.

२. विविध आयुर्मान / वयोगटांसाठी उपयुक्त.

३. निरनिराळ्या प्रकारच्या जातीच्या आणि आकाराच्या (समुद्री /गोड्या पाण्यातील ) जिवंत खेकड्यांसाठी उपयुक्त

४. दिर्घकाळ टिकणारे

५. सहजरित्या हाताळणी करता येते.

**२) डॉ. बासाकोकृवि हस्त व पदचलीत इंधन वडी यंत्र**

डॉ. बासाकोकृवि विकसित हस्त व पदचलीत इंधन वडी यंत्राची स्थानिक जैवइंधनापासून इंधन वडी बनविण्यासाठी प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.



**वैशिष्टे :**

१. या यंत्राद्वारे जैव अवशेषापासून (पालापाचोळा) एकावेळेस चार त्रिकोणी आकाराच्या इंधन वड्या तयार होतात.

२. या यंत्रामध्ये हाताने व पायाने एकसारखा दाब मिळतो व समान घनतेच्या इंधन वड्या तयार होतात.

३. यंत्राची क्षमता : १७० इंधन वड्या प्रती तास (१०.५ कि. ग्रॅ./तास).

४ या यंत्राद्वारे बनविलेल्या इंधन वडीची ज्वलन क्षमता ३६४८ किलो कॅलरी / कि. ग्रॅ. व घनता ४४६ कि.ग्रॅ./घनमीटर आहे.

५. हे यंत्र सुलभ व वापरास सोपे असून स्त्रीया सुद्धा सहजपणे वापरु शकतात.

### पीक उत्पादन तंत्रज्ञानावर आधारीत इतर शिफारशी

**अ) नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापन**

१. कोकण विभागात बदलत्या पर्जन्यमानामध्ये खरीप भात पिकाच्या चांगल्या वाढीसाठी आणि स्थिर उत्पादनासाठी कर्जत-२ आणि कर्जत-७ या वाणांची शिफारशीत पुनर्लागवड पद्धतीने किंवा १५ दिवस वयाच्या रोपांची पुनर्लागवड करण्याची शिफारस करण्यात येते.

### जमिनीची सुपिकता व पीक अन्नद्रव्य व्यवस्थापन

१. दक्षिण कोकण किनारपट्टीत खरीप हंगामात भुईमूग पिकापासून अधिक उत्पादन व नफा मिळविण्यासाठी शिफारशीत खताच्या ७५ टक्के मात्रा (२० कि. नत्र अधिक ४० कि. स्फुरद) तसेच बायो-ग्रो ज्यामध्ये सुडोमोनास, बॅसीलस आणि यिस्ट या जैव संवर्धकाची ५ मिली प्रती किलो बियाणे या प्रमाणे बीज प्रक्रिया करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२. उत्तर कोकण किनारपट्टी विभागात भात हरभरा पीक पद्धतीपासून अधिक उत्पादन, आर्थिक नफा मिळविण्यासाठी आणि २५ टक्के रासायनीक नत्र खताची बचत करण्यासाठी एकात्मिक खत व्यवस्थापन पद्धतीने ७५ टक्के शिफारशीत रासायनिक खत मात्रा (७५:४०:४० किलो नत्र:स्फुरद:पालाश /हेक्टर) + २५ टक्के शिफारशीत नत्र शेणखतातून (५ टन /हेक्टर) खरीप भात पिकास आणि ७५ टक्के शिफारसीत रासायनिक खत मात्रा (२०:४०:०० किलो नत्र स्फुरदः पालाश /हेक्टर) + २५ टक्के शिफारसीत नत्र शेणखतातून (१.२५ टन/हेक्टर) रबी हरभरा पिकास देण्याची शिफारस करण्यात येते.

**सुक्ष्म अन्नद्रव्ये**

१. कोकणातील जांभ्या जमिनीत काजूचे अधिक उत्पन्न व नफा मिळविण्यासाठी चौथ्या वर्षापासून प्रती झाड ३ किलो सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त कोकण अन्नपुर्णा ब्रिकेट्स (नत्र: स्फुरद: पालाश: कॉपर: बोरॉन: मॉलीब्डेनम, ३३:१३:६:०. ६०:०. २६:०.०१४) आणि ४० किलो शेणखत जून महिन्यात देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२. कोकण किनारपट्टी विभागात खरीप हंगामात भात पिकापासून अधिक उत्पादन व नफा मिळण्यासाठी १०० किलो नत्र + ४० किलो स्फुरद + ४० किलो पालाश + २० किलो झिंक सल्फेट प्रती हेक्टर खत मात्रे सोबत अतीसुक्ष्म खताद्वारे (नॅनो - फर्टीलायझर) स्फुरद, पालाश आणि झिंक ०.८० मि.ली., ०.८० मि.ली. व २ ग्रॅम प्रती हेक्टर २०० लिटर पाण्यामध्ये (४०, ४० १० पी.पी.एम. तिव्रता) द्रावणाची एक फवारणी पूनर्लागवडीनंतर १५ दिवसांनी करण्याची शिफारस करण्यात येत आहे..

**बागायती पिके**

१. कोकण विभागातील जांभ्या जमिनीत रताळी-मधुमका पिक पद्धतीपासून अधिक उत्पादन व आर्थिक फायदा मिळवण्यासाठी रताळी व मधुमका पिकास ठिबक सिंचनाद्वारे एक दिवसाआड बाष्पोत्सर्जनाच्या १०० टक्के पाणी द्यावे आणि १०० टक्के शिफारशीत खताची मात्रा (अनुक्रमे १० टन शेणखत + ७५:५०:७५ आणि २००:६०:६० नत्र:स्फुरद:पालाश किलो/हेक्टर) विद्राव्य खताद्वारे द्यावी अशी शिफारस करण्यात येते.

**एकात्मिक शेती पद्धती**

